# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 30 ) 15th August 2005 ( No : 05


# A G E N D A

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION to be held at 12.00 noon on *SUNDAY, the* *28 th August, 2005 at* Savitri Jyotirao Social Work College, Yavatmal**

Agenda of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association to be held at 12.00 noon on Sunday, the 28 th August, 2005 at Savitri Jyotirao Social Work College, Yavatmal is as follows :-

## ITEM NO. 409 :
## *CONFIRMATION OF MINUTES :*

TO CONFIRM the minutes of the General Body meeting of Nagpur University Teachers' Association held at 12.00 noon on Sunday, the 22nd May, 2005 at the Auditorium of Sant Gadge Baba Amravati University, University Campus, AMRAVATI.

*Notes :- 1) Copy of the minutes is Circulated on pages 49 to 53 of 2005 NUTA Bulletin.*

*2) Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, the 22nd May, 2005 at the Auditorium of Sant Gadge Baba Amravati University, University Campus, AMRAVATI, vide No.CIM/19 Dated 30th June, 2005 published on page 50 of 2005 NUTA Bulletin. No correction is received.*

## विषय क्रमांक ४१० :
## *संघटनेचे जेष्ठ नेते प्रा. डॅडी देशमुख यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव*

*(प्रस्ताव स्वतंत्रपणे पृष्ठ ७४ वर प्रसृत केलेला आहे)*

## ITEM NO. 411 :
## *APPROVAL TO THE AUDITED STATEMENT.*

**To consider and approve** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2005.

***Notes*** *: (i) The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year is circulated on page 62 & 63 of 2005 NUTA Bulletin.*

*(ii) The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account will be placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

*(iii) If any honourable member has a querry, regarding the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account, he should make it, within a week from the date of posting of this Bulletin, to Prof. S.A.Tiwari, Treasurer, NUTA, 42, Shankar Nagar, Amravati-444 606, specifying the exact point on which he seeks information/ clarification. A copy of the querry also be sent to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.*

## ITEM NO. 412 :
## *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**To Note** the Statement no. 16 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2005.

***Note*** *: (i) Statement no.16 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2005, is circulated on page 64 of 2005 NUTA Bulletin.*

*(ii) The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2005, will be placed before the General Body by Prof. S.A.Tiwari, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

## विषय क्रमांक ४१३ :
## *सहाव्या वेतन आयोगाची नियुक्ती करण्याबाबत*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा. अनिल ढगे हे पुढील प्रस्ताव मांडतील.:-

"वेतन पुनर्निर्धारणासाठी दर पाच वर्षांनी वेतन आयोगाची नियुक्ती करणे आवश्यक असतांना सुध्दा मागील अनुभवावरुन हे लक्षात आले आहे की हे वेतन पुनर्निर्धारण दर १० वर्षांनी करण्यात आलेले आहे. यापूर्वीचे वेतन पुनर्निर्धारण १९९६ पासून लागू करण्यात आले आहे. दहा वर्षांनी म्हणजे २००६ पासून वेतन पुनर्निर्धारण अमलात आणावयाचे असल्यास सहाव्या वेतन आयोगाची नियुक्ती त्वरित करणे आवश्यक आहे. केंद्र शासन कर्मचारी महासंघाने यापूर्वीच सहाव्या वेतन आयोगाच्या नियुक्ती संदर्भात मागणी केंद्र शासनाकडे सादर केलेली आहे. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने (AIFUCTO) ऑक्टोंबर २००३ मध्ये मुंबई येथे घेण्यात

---

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

**MEETING NOTICE : 2**

**Date : 08.08. 2005**

From
**Dr.E.H.Kathale,**
Secretary, **NUTA,**
N-162, Reshim Bagh, Nagpur-440 009.

To,
**All the members**
of the Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that in exercise of the powers conferred on it by Article VIII of the Constitution of NUTA, the Executive Committee has decided to have the meeting of General Body at **12.00 Noon** on the date and at the place mentioned below.

2. Agenda of the General Body meeting is printed in this NUTA Bulletin. If you propose to suggest any amendments to any of the proposals/Resolutions included in the Agenda, you may send it to me within a period of one week from the date of the posting of this Bulletin. It will not be possible for the amendments received after the due date to be included in the additional agenda. Please send one copy of your amendment to Prof. B.T.Deshmukh, President, NUTA, 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati-444 604.

3. Rules for proposing amendments to the proposals/ resolutions are printed on page 97 of 1977 NUTA Bulletin. You are requested to kindly make it convenient to attend the meeting.

Yours faithfully,
Sd/- **Dr. E.H.Kathale**
Secretary, NUTA

***Date and Place of the meeting***

**at 12.00 Noon on, Sunday, the**
***28 th August, 2005 at***
**Savitri Jyotirao Social Work College,**
**Yavatmal**

---

आलेल्या वैधानिक परिषदेत सहाव्या वेतन आयोगाच्या नियुक्ती संदर्भात मागणी केलेली आहे.

नुटाची ही आमसभा या मागणीशी सहमती व्यक्त करुन केंद्र शासनाने सहावा वेतन आयोग त्वरीत नियुक्त करावा अशी केंद्र शासनास विनंती करीत आहे."

## विषय क्रमांक ४१४ :
## *केंद्र शासनाने प्रस्तावित केलेल्या नव्या "निश्चित योगदान पण अनिश्चित पेन्शन" योजनेला विरोध*

कार्यकारी मंडळाच्या वतीने प्रा.डॉ.एकनाथ कठाळे हे पुढील प्रस्ताव मांडतील.:-

सध्या अस्तित्वात असलेली पेन्शन योजना रद्द करुन 'पेन्शन फंड रेग्युलेटरी ॲन्ड डेव्हलपमेंट फंड ॲथॅरिटी' च्या देखरेखीखाली नवीन "निश्चित योगदान पण अनिश्चित पेन्शन योजना" राबविण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे. "Pension Fund Regulatory & Development Authority ordinance 2004" वित्तखात्याच्या स्थायी समितीकडे शिफारशी करिता संदर्भीत करण्यात आलेला आहे. राज्य कर्मचाऱ्यांच्या अखिल भारतीय महासंघाने या प्रस्तावित पेन्शन योजनेला विरोध दर्शविला आहे.

प्रस्तावित योजनेमुळे निवृत्तीकाळामध्ये सामाजिक सुरक्षिततेच्या भूमिकेतून निश्चित पेन्शन देणाऱ्या सध्याच्या पेन्शन योजनेपासून कर्मचाऱ्यांना वंचित केले जाईल, पेन्शन फंडामध्ये सरळ विदेशी गुंतवणूकीचा प्रवेश असंख्य संभाव्य संकटांना निमंत्रण देणारा ठरेल, नविन योजनेच्या संदर्भात पेन्शन योजनेच्या स्थिर वा अस्थिरतेचा प्रश्न तर महत्वाचा आहेच पण त्याचबरोबर ही पेन्शन योजना व कायद्यातील तरतुदी आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या 'वर्किंग पेपर ऑन पेन्शन रिफॉर्मस् इन इंडिया' या विचारांशी बांधील असल्याचे दिसून येते, ही योजना कर्मचाऱ्यांच्या हिताची नसून ती जागतिकीकरणाच्या प्रक्रियेच्या दबावाखाली घेतलेला एक निर्णय अशा स्वरुपाची आहे, या योजनेअंतर्गत मिळणारे लाभ शेअर मार्केटच्या चढउतारावर अवलंबून राहणार आहे. कर्मचाऱ्यांच्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना या योजनेमध्ये गुंतवणूक करण्याची मुभा राहणार आहे. इतर व्यक्तींच्या संदर्भात शासनाचे ह्या योजनेत बरोबरीचे अंशदान राहणार नसल्यामुळे ते या योजनेत सहभागी कशाला होतील? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करुन महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने (MFUCTO) आपल्या २६ जून २००५ च्या कार्यकारिणीच्या मुंबई येथे झालेल्या सभेत या योजनेला विरोध दर्शविला आहे.

नुटाची ही आमसभा या प्रस्तावित पेन्शन योजनेच्या अम्मलबजावणीला आपला तिव्र विरोध नोंदवित असून कर्मचाऱ्यांची सामाजिक सुरक्षितता धोक्यात आणणारी प्रस्तावित योजना ताबडतोब मागे घेण्यात यावी. अशी विनंती केंद्र शासनाला करीत आहे."

## ITEM NO. 415 :
## *TO INCREASE LIFE MEMBERSHIP FEE :*

On behalf of the Executive Committee Prof. S.A.Tiwari will move the following resolution. :-

**That the life membership Fee of NUTA be increased from Rs. 4001 to Rs. 10001/-**

*Notes : **(A)** The provision in the Constitution of the Association is in para 3, which reads as follows :*

*"The Life Membership Fee may be increased at any time by a resolution passed by the General Body''.*

*__(B)__ The Executive Committee of NUTA at its meeting held on 7th August 2005 (Vide Item No. 18) resolved to Approve the following arrangement :-*

*(1)From the date of the publication of this Bulletin till 27th August 2005 Life Membership Fee or the partial payment towards Life Membership Fee shall be accepted by the Treasurer only in the form of crossed Demand Draft. During this period, under no circumstances, the Treasurer will accept the Life Membership Fee by cheque or cash.*

*(2) However Crossed Demand Draft issued by any Scheduled Bank in Vidarbha on or before 27th August 2005 for Rs. 4001 or 2001/- in favour of **"Treasurer NUTA L.M. Fund"** will be received by the Treasurer on 28th August 2005 at the venue of the General Body Meeting before the said item is resolved and the said payment will be treated as a payment made by the concerned teacher towards Life Membership Fee of NUTA, as if paid on or*

SCHEDULE VIII (VIDE RULE 17 /1) :- TRUST REG. NO. F-1594

### NAME OF THE PUBLIC TRUST : NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Place : Nagpur -- Taluka : Nagpur -- District : Nagpur

### BALANCE SHEET AS AT : 31ST MARCH 2005

| FUNDS & LIABILITIES | Amount Rs. | Amount Rs. | PROPERTY & ASSETS | Amount RS. | Amount RS. |
|---|---|---|---|---|---|
| **1 TRUST FUND OR CORPUS** | | | **I FIXED ASSETS** (Sch.C) | 81,658.71 | 74,811.44 |
| **Life membership fee** | | | Less : Depriciation | 6,847.27 | |
| Balance as per Last B/S ... | 39,87,410.32 | | | | |
| Adjustment during the year ... | 1,96,059.00 | 41,83,469.32 | **II INVESTMENTS** (Sch.D) | | 41,85,980.00 |
| **II OTHER EARMARKED FUND** | | | | | |
| Depreciation Fund ... ... ... | | | **III LOANS & ADVANCES** | | |
| Sinking Fund ... ... ... | | | Other Loans ... ... ... | | |
| Reserve Fund ... ... ... | | | | | |
| Any other Fund (Schedule 'A') | | 29,30,550.75 | **B) Advances** (Sch.E) ... ... | | 26,796.64 |
| **III LOANS Secured or unsecured** | | | | | |
| From Trustees ... ... ... | | | To trustess ... ... ... | | |
| From Others ... ... ... | | | To employees ... ... ... | | |
| **IV LIABILITIES** | | | To contractors ... ... ... | | |
| As per schedule 'B' ... ... | | 2,731.00 | To lawyers ... ... ... | | |
| For expenses Audit fees payable | | | To Other TDS ... ... ... | | |
| For advances ... ... ... | | | **IV INCOME OUTSTANDING** | | |
| For rent/ other deposits ... ... | | | House Rent ... ... ... ... | | |
| For Sundry credit balances ... | | | Land Rent ... ... ... ... | | |
| **V INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | | Interest ... ... ... ... ... | | |
| Balance as per Last B/S ... ... | (7,07,918.10) | | Other Income ... ... ... | | |
| Less appropriation if any | (1,06,875.51) | | **V CASH AND BANK BALANCES** | | |
| add/less :surplus/ deficit | | | (a) Cash in hand | | |
| as per I/E Account ... ... | | (8,14,793.61) | (b) Bank Balance (Sch.F) ... ... | | 20,14,369.38 |
| **TOTAL RS.** | | **63,01,957.46** | **TOTAL RS.** | | **63,01,957.46** |

The above Balance sheet to the best of my belief contains a true account of the Funds and liabilities and assets of the trust. As per Our report of even date

Trustee:
S/d. S.A.Tiwari
Trust Address : Nagpur

Date : 29th July 2005

For **C.R.SAGDEO & CO**
Chartered Accountants
Sd/- Partner

*before 27th August 2005.*

*(3) The Treasurer will issue receipt of such crossed Bank Draft and mention on each receipt name of the concerned teacher and the date on which such Bank Draft was issued and the name of the Bank concerned.*

*(4) Any teacher can become a member (Subject to the approval by the Executive Committee of NUTA) of NUTA by paying the L.M.Fees of Rs. 4001/-in one instalment or in three instalments. In the case of three installments, First instalment of Rs. 2001/- must be paid by a crossed Bank Draft drawn in the name of Treasurer NUTA on or before the said item is resolved in the manner aforesaid.*

*(5) After paying the first instalment, the teacher shall pay the remaining amount of Rs. 2000/- in two equal instalments, within a period of one year i.e.before 28th August 2006.*

*(6) This facility of partial payment of the L.M. Fees of Rs 4001/- in three instalments to be paid in one year shall be available only to such teachers who pay the first instalment of Rs. 2001/- on or before the said item is resolved in the General Body Meeting and in the manner aforesaid.*

*(7) If there is a failure in paying the total amount of L.M.fees of Rs. 4001 during the said period of one year, the partially paid instalments shall be treated as donations.*

**RULES FOR PROPOSING AMENDMENTS**
**( Reproduced from page 97 of 1977 NUTA Bulletin )**

1. Any proposal before the meeting may be amended

(a) by leaving out a word or words or

(b) by leaving out a word or words in order to add or insert a word or words or

(c) by adding or inserting a word or words.

2. An amendment to be in order shall : (a) not constitute a direct negative to the original resolution : (b) be relevent to and within the scope of the resolution to which it is moved.

### विषय क्रमांक ४१६ :
### *समाजकार्य महाविद्यालयातून ५० टक्के महागाई भत्ता मुळ वेतनात समाविष्ट करणे*

प्रा. एन.एस.भगत पुढील ठराव मांडतील. :-

“अमरावती विभागातील समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकांना ५० टक्के महागाई भत्ता मुळवेतनामध्ये समाविष्ट करण्यात यावा.”

### विषय क्रमांक ४१७ :
### *समाजकार्य महाविद्यालयामध्ये वेतन विलंबाने होणे*

प्रा. एन.एस.भगत पुढील ठराव मांडतील. :-

“समाजकल्याण विभागासोबत संलग्नित असलेल्या समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापकाचे वेतन दरमहा नियमित मिळण्यात यावे.”

## ITEM NO. 418 :
## *ELECTIONS*

To Elect In accordance with the provision of article VI(a) of the constitution of NUTA (A) President (B) Two Vice Presidents out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area. (C) Secretary (D) Two Joint Secretaries out of which one shall be from the Nagpur University area and one shall be from Amravati University area. (E) Treasurer (F) Five Executive Committee members, for the five year tenure commencing from 1st January 2006 in its next meeting.

***Notes :*** *(1) Notice, dated 24th June, 2005, for this purpose was published in the 4th issue of 2005 NUTA Bulletin on page 57.*

*(2) Para 7 of the said notice reads : " Final list of the candidates will be published on the Notice Board of the Office on 10th July 2005 and also will be published in NUTA Bulletin along with the Agenda of the G.B.Meeting. "*

*(3) Accordingly* ***final list of the candidates*** *is notified for the information of all the members of NUTA in this Bulletin.*

******

**SCHEDULE IX (VIDE RULE 17 /1) :- TRUST REG. NO. F-1594**

**NAME OF THE PUBLIC TRUST : NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

Place : Nagpur * Taluka : Nagpur * : District Nagpur

**INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDING ON 31st MARCH 2005**

| EXPENDITURE | Amount Rs. |
|---|---|
| **To Expenditure in respect of Properties** | |
| Rate, taxes, cesses … … … … … … | |
| Repairs and maintenance … … … … … | |
| Building Maintenance … … … … … … | |
| Insurance … … … … … … … … | |
| Depreciation … … … … … … … … | 6,847.27 |
| **Other expenses** (Sch 'G') | |
| To Establishment expenses | 88,508.75 |
| To Remuneration to trustees (in the case of a math) to the head of the math including his house hold expenditure, if any | |
| To Electricity Expenses | |
| To Audit fee … … … … … … … | 1,575.00 |
| To Contribution and fees | |
| To Printing and Stationery … … … … | |
| **To amount Written of** | |
| (a) Bad debts … … … … … … | |
| (b) Loan Scholarship … … … … | |
| (c) Irrecoverable rents… … … … | |
| (d) Other items… … … … … | |
| To Miscellaneous Expenses … … … | |
| To Depreciation … … … | |
| To Amount transferred to Reserve or Specific F. | |
| **To Expenditure on objects of the trust** | |
| (a) Religious … … … … … … … … | |
| (b) Educational (NUTA Bulletin) … 2,94,534.30 | |
| Bulletin Postages Exp. … 12,104.00 | 3,06,638.30 |
| (c) Medical Relief … … … … … … … | |
| (d) Relief of Poverty … … … … … … | |
| (e) Other Charitable objects … … … | |
| Surplus Carried over to B/S … … … … | (1,06,875.51) |
| | **2.96,693.81** |

| INCOME | Amount RS. |
|---|---|
| **By House Rent** … … … … … | |
| **By Agriculture Income** … … … … | |
| **By Hospital Receipt** … … … … … | |
| **By land Rent** Accrued/Realised … … … | |
| **By Interst** | |
| On MIDS … 2,06,856.00 | |
| On QIDS … … 9,240.00 | 2,16,096.00 |
| On Loans | |
| On Bank account | 61,135.00 |
| **By Divident** … … … | 8,438.81 |
| **By Donation** in cash or Kind … … … | |
| **By Grants** … … … … … | |
| **By Income** from other sources … … | |
| **By Subscription & Membership** … … | |
| **By Profit** on sale of Investment … … … | 11,024.00 |
| **By Transfers** from Reserve … … … | |
| | **2.96,693.81** |

**As per Our report of even date**

Trustee/Sd/-S.A.Tiwari
Trust Address : Nagpur
Date : 29th July 2005

For C.R.SAGDEO & CO
Chartered Accountants
sd/**Partner**

# महाराष्ट्रात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्याबाबतचे विधेयक

उपरोक्त विधेयक हे विधानपरिषद विधेयक असून ते बुधवार दिनांक १५ डिसेंबर २००४ रोजी विधानपरिषदेत मांडण्यात आले. (१) विधानपरिषद सदस्य सर्वश्री. प्रा.बी.टी.देशमुख व श्री. जी.एल.अैनापूरे यांनी त्या दिवशी मांडलेले विचार आज प्रसृत करित आहोत. (२) सर्वोच्च न्यायालयाचा छत्तिसगड संबंधातील निर्णय त्यानंतर दिनांक ११ फेब्रुवारी २००५ रोजी झाला. हा निकाल बराच मोठा आहे पण तरीही तो प्रसृत करण्याचा प्रयत्न आहे. (३) दिनांक २३ जुलै २००५ रोजीच्या विधानपरिषदेच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी विधेयक मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला तो प्रस्ताव सुद्धा आज दिलेला आहे. **- संपादक**

## सन २००४ चे वि.प.वि. क्रमांक २० नुसार महाराष्ट्रात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्याबाबत विधेयक

*पाचवे अधिवेशन २००४ : : महाराष्ट्र विधानपरिषद*
*बुधवार, १५ डिसेंबर २००४*

### प्रा.बी.टी.देशमुख

**प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) :** सभापती महोदया, याठिकाणी सन २००४ चे वि.प.वि. क्रमांक २० नुसार महाराष्ट्रात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्याच्या हेतूने याठिकाणी विधेयक मांडण्यात आलेले आहे. या विधेयकाचा सारा तपशील, साऱ्या तरतूदी आणि उद्देश व कारणे यांचे निवेदन, डेलीगेटेड लेजीस्लेशन बाबतचे ज्ञापन हे आपण पाहिले तर **महाराष्ट्र राज्याने यापूर्वी जे धोरण स्विकारलेले आहे, त्यापासून टोटल डिपार्चर करणारे अशा प्रकारचे एक 'ऐतिहासिक' असे हे विधेयक आहे.** मी 'ऐतिहासिक' हा शब्द मुद्दाम वापरतो, मग तो चांगल्या अर्थाने आहे की वाईट अर्थाने हे कळेलच It is a total departure. शिक्षणाच्या बाबतीत महाराष्ट्राची गेल्या अनेक वर्षाची परंपरा आहे. या परंपरेने शिक्षणाचे महत्व हे मान्य केलेले आहे.

जगाला जे या दोन-चार-पाच वर्षामध्ये कळले ते महाराष्ट्राला पुष्कळ अगोदर कळले. यु.एन.डी.पी.चा मानव विकास अहवाल आपण पाहिला, युनायटेड नेशन्स् ऑर्गनायझेशनच्या नेतृत्वाखाली यु.एन.डी.पी.काम करते. यु.एन.डी.पी.ने मानवी विकासाची व्याख्या केलेली आहे. ही मानव विकासाची व्याख्या, सुदैवाने "महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२," शासनाने प्रसिध्द केलेला आहे त्यामध्ये उद्धृत केलेली आहे. मनुष्याचा विकास झाला म्हणजे काय झाले पाहिजे ? याबाबत १९१ देशाच्या प्रतिनिधींनी एकत्र बसून मानवी विकासाची व्याख्या ठरविलेली आहे की, त्या माणसाला मिळणाऱ्या संधीचा परिघ मोठा होणे, म्हणजे मानवी विकास होणे. "**संधीचा परिघ मोठा व्हावा, यासाठी मनुष्याने केलेला संघर्ष आणि त्या संघर्षाला आलेले यश, याचा मिलाफ म्हणजे मानवी विकास,**" ही जी संधी आहे. त्यातील पहिली व महत्वाची शिक्षणाची संधी, असे त्यांनी सांगितले आहे. दुसरी संधी सांगितलेली आहे की, उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य मिळणे. या पृथ्वीच्या पाठीवर मनुष्य विकसित झाला म्हणजे काय झाले? याबाबत यु.एन.डी.पी.ने एकमताने डेफिनेशन ठरविलेली आहे. "**शिक्षणाची संधी ही पहिली गोष्ट आणि उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य जगण्याची संधी ही दुसरी गोष्ट आणि उपजिविकेची साधने ही तिसरी गोष्ट,**" बाकीच्या गोष्टींना नंतरचे स्थान दिलेले आहे. जगाच्या १९१ देशाच्या प्रतिनिधींनी एकमताने केलेली ही व्याख्या आहे. आम्ही भाग्यवान आहोत की, आमच्या वाडवडिलांना ही गोष्ट शे-दोनशे वर्षापूर्वी कळलेली आहे. जगातील लोक ती गोष्ट आता एकमताने ठरवीत आहेत.

आपण मानव विकास अहवाल २००२ मध्ये छापला त्यामध्ये ती व्याख्या आपण कोट केलेली आहे. आम्ही यासाठी भाग्यवान आहोत की, आमच्या वाडवडीलांना ही गोष्ट अगोदरच कळलेली होती. महात्मा ज्योतिबा फुले यांनी हंटर कमिशनच्या समोर जे निवेदन दिले त्या निवेदनामध्ये हा विचार अतिशय स्पष्टपणाने मांडलेला आहे. मी मुद्दाम सांगू इच्छितो, या विधेयकाच्या स्ट्रक्चर वर बोलता येईल. पण येथे बेसिक पॉलिसीचा प्रश्न आहे. **पब्लिक फंडेड एज्युकेशन सिस्टीमपासून डिपार्चर घेण्याइतका महाराष्ट्राचा विकास झालेला आहे का? याची**

## STATEMENT REGARDING THE FIXED SECURITIES OF THE ASSOCIATION AS ON 31ST MARCH, 2005.

### STATEMENT NO.16

| | | |
|---|---|---|
| | **A) LIFE MEMBERS** | |
| **1.** | No.Of Members as on the day of Constitution amendement (9th May, 1976 i.e. to put membership fee in fixed deposits.) ... ... | 214 |
| **2.** | Total No. of Members as on the Date (9th Oct. 1988) of increasing the L.M.fees from Rs. 151 to 501) ......... | 2846 |
| **3.** | No. of Members from 9th May 1976 to 9th Oct. 1988 (2-1) = (2846-214) =... | 2632 |
| **4.** | Total No. of Members as on the date (30th April 1991) of increasing the L.M. fees (from Rs. 501 to 2001) | 3279 |
| **5.** | No. of Members from 9th Oct. 1988 to 30th April 1991 (4-2)=(3279-2846)= ... | 433 |
| **6.** | Total No. of members as on the date (31st December 2000) of increasing the L.M.fees from (Rs. 2001 to 4001) ... | 4723 |
| **7.** | No. of Members from 30 April, 1991 to 31st March, 2002 (6-4) = (4723-3279) = ... | 1444 |
| **8.** | Total No. of members as on 31st March 2005... | 4838 |
| **9.** | No. of memebers from 1st January 2001 to 31st March 2005... (4838 - 4723) = | 115 |
| | **B) TEACHERS WHO MADE PART PAYMENT OF L.M.FEES** | |
| **10.** | i) A.No.of Teachers who have paid 1001/1000 ... | 20 |
| **11.** | a) No.of Teachers who have paid 1001/1000 ... | 13 |
| | b) No.of Teachers who have paid 2001/2000 ... | 49 |
| | c) No.of Teachers who have paid 3001/3000 ... | – |
| | **C) AMOUNT OF L.M. FEES RECEIVED....** | **Rupees** |
| **12.** | Amount Received from Members mentioned at Sr.No.1 above Rs. ...... | 00-00 |
| **13.** | Amount Received from members at Sr.No.3 above (2632 x 151) ... ... | 3,97,432-00 |
| **14.** | Amount Received from members mentioned at Sr.No.5 above (433 x 501) ... ... | 2,16,933-00 |
| **15.** | Amount Received from members mentioned at Sr. No. 7 above. (1444 x 2001) ...... | 28,89,444.00 |
| **16.** | Amount Received from members mentioned at Sr. No. 9 above (115 x 4001) ... | 4,60,115.00 |
| **17.** | Amount Received from members mentioned at Sr. No. 10 & 11 above (20,020 + 1,11,062)... | 1,31,082.00 |
| **18.** | Total amount of L.M.Fund received from all the members mentioned at Sr.No. 12+13+14+15+16+17 above. and hence expected to have been invested in fixed Securities ...... | 40,95,006.00 |

| | | |
|---|---|---|
| | **D) TOTAL AMOUNT IN FIXED SECURTIES.** | |
| **19.** | Total amount invested in fixed securities (Details as per Appendix A & B ) (1,13,000 + 39,00,000) = | 40,13,000.00 |
| **20.** | Total Balance in life membership Ac. ( A/c.19893) ... ... | 95,355.61 |
| **21.** | Total amount in fixed Securities and cash in the Bank (19+20) ... ... | 41,08,355.61 |
| **22.** | Amount of cheques under Realisation since they are deposited recently ...... | ..... |
| **23.** | Total of 21 and 22 above...... ... | 41,08,355.61 |
| **24.** | Surplus of 23 over 18 ... ... ... | 13,349.61 |

### *APPENDIX* 'A'

Statement regarding the Fixed Securities of the Association as on 31st March, 2005 (See Item at Serial No.20 in the statement).
UNITS OF UNIT TRUST OF INDIA-MISG SCHEMES

| Sr. No. | Unit Certificate No. | No.of Units | Face Value of Each Unit | Amount of | Date of Investment | Period of | Rate of Dividend |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | 39893126 | 11300 | 10 | 1,13,000 | 1.4.04 | 5 Years | 6.60% |
| | **Total** | | | **1,13,000** | | | |

### *APPENDIX* 'B'

Statement regarding the Fixed Securities of the Association as on 31st March, 2005 (See Item at Serial No.20 in the statement).
BANK OF MAHARASHTRA, MIDS SCHEMES

| Sr. No. | MIDS Certificate | Amount of Investment | Date of Investment | Period of Investment | Rate of interest |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 620768/1 | 4,50,000 | 23.01.2002 | 39 Months | 8.25% |
| 2. | 620786/1 | 3,00,000 | 03.09.2002 | 39 Months | 8% |
| 3. | 740613/1 | 5,00,000 | 08.08.2003 | 39 Months | 6% |
| 4. | 740616/1 | 5,00,000 | 17.09.2003 | 36 Months | 5.75% |
| 5. | 740620/1 | 7,00,000 | 16.12.2003 | 24 Months | 5.50% |
| 6. | 740635/1 | 8,50,000 | 08.05.2004 | 18 Months | 5.50% |
| 7. | 740641/1 | 6,00,000 | 04.09.2004 | 24 Months | 5.25% |
| | **Total** | **39,00,000** | | | |

**Date : 29th July 2005** **Dr. S. A.TIWARI**, Treasurer,

*Note :* Statement No.15 was printed on page 8 of 2005 NUTA Bulletin.

**तुम्ही खात्री करुन घेतली आहे काय?** हा या विधेयकाचा खरा गाभा आहे. बाकी चान्सेलरच्याबाबतीत या विधेयकात सांगितलेले आहे. एकदा झाल्यानंतर ते जसे होईल तसे होईल. बेसिक इश्यु हा आहे की, महाराष्ट्राने अतिशय प्राणपणाने जपलेले तत्व आहे. भारतामधील अनेक राज्यांत महाराष्ट्राला बहुमान मिळतो, हे अनेक राज्यांनी मान्य केलेले आहे. अधिकृत अहवालांच्यामध्ये त्याचा उल्लेख आहे. याचे कारण ती आपल्या वाडवडीलांची कृपा आहे. पब्लिक फंडेड एज्युकेशन सिस्टीमपासून डिपार्चर आपण घेतो आहोत, त्याचे परिणाम काय होणार हे आपण जाणून घेतलेले आहेत काय ? त्याचा आपण विचार तरी केलेला आहे काय? ही फारकत घेण्याच्या अवस्थेपर्यन्त महाराष्ट्र आलेला आहे काय ? या दोन मुद्यांचा मुलभूत विचार या विधेयकाच्या निमित्ताने झाला पाहिजे.

हंटर कमिशन समोर महात्मा ज्योतिबा फुले यांनी १९ ऑक्टोबर १८८२ रोजी जे निवेदन दिले, त्या निवेदनामध्ये ते म्हणतात, **"सध्याच्या परिस्थितीत उच्च शिक्षणासाठी करीत असलेली मदत सरकारने तोडावी, असे कोणीही देशहितेशु म्हणणार नाही. हिंदुस्थानचे शिक्षण सध्या बाल्यावस्थेत आहे. उच्च शिक्षणार्थ दिले जाणारे अनुदान थांबविल्यास, तेही एकंदर शिक्षण प्रसाराच्या दृष्टीने विघातकच ठरेल."** माझे प्रतिपादन असे आहे की, आपण आज कोठे आहोत? याबाबतचा चेहरा मानव विकास अहवालात दिसतो. मानव विकास अहवालामध्ये शिक्षण या विकासक्षेत्राचे मापदंड दिलेले आहेत. आपला अहवाल आहे, परंतु इंडिकेटर यु.एन.डी.पी.ने ठरवून दिलेले आहेत. अहवाल तयार करण्यासाठीची मदत यु.एन.डी.पी.ने दिलेली आहे, केंद्राच्या नियोजन विभागाने दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने काही खर्च केला. या तिघांची मदत घेऊन हा अहवाल तयार केलेला आहे. अहवालातील आकडे दिलेले आहेत. त्याबाबतची माझ्याकडे माहिती आहे. परंतु यामध्ये जो स्कोप आहे, त्यामध्ये ही आकडेवारी सांगता येईल की नाही, याविषयी मला शंका आहे. म्हणून मी विनंती करतो की, महात्मा ज्योतिबा फुले यांनी जे विधान केले त्या विधानाच्या पार्श्वभूमीवर आपला २००२ चा मानव विकास अहवाल पाहिला तर कळेल की, या विधेयकाच्या निमित्ताने होत असलेले हे डिपार्चर अत्यंत घातक आहे, अत्यंत हिंसक आहे, अत्यंत समाजविघातक अशा प्रकारचे आहे.

महात्मा ज्योतिबा फुले यांनीच ही गोष्ट सांगितलेली आहे, असे नाही तर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी याबाबतीत उत्तम विचार मांडलेले आहेत. ते विचार आता कालबाह्य झालेले आहेत काय ? याचा विचार करण्याची गोष्ट आहे. याचा आपण विचार केला पाहिजे.त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, स्वतंत्र राष्ट्रामध्ये शिक्षण ही राज्याची जबाबदारी आहे.मी मुद्दाम मा.मंत्रिमहोदयांच्या सोयीसाठी म्हणून हे विचार कोठून घेतले ते सांगतो. १ जुलै १९८७ च्या लोकराज्यामध्ये एक लेख आला आणि त्यात त्यांचे मूळ विचार व्यक्त झालेले आहेत आणि ते अतिशय उपयुक्त आणि कामाचे आणि अतिशय मार्गदर्शक ठरणारे आहेत म्हणून मी मुद्दाम ते येथे कोट करु इच्छितो. **"स्वतंत्र राष्ट्रामध्ये शिक्षणाची जबाबदारी राज्याची ठरते. परंतु परतंत्र राष्ट्रामध्ये समाज धुरिणांनी समाजाच्या मदतीने सार्वजनिक शिक्षणाची सोय केली पाहिजे कारण शिक्षण ही समाजाची जबाबदारी आहे."** मग त्यांनी दोन गोष्टी केल्यात. स्वतः यासाठी आयुष्यभर प्रयत्न केला. त्यांनी माधुकरीचा विरोध केला आणि सांगितले की,काम करा, मेहनत करा आणि शिका. स्वाभिमान बाजारात विकत मिळत नाही तर लहानपणापासून जी प्रगती होते त्यामधूनच तो अंगामध्ये येणारा अंगभूत गुण असतो असे त्यांनी सांगितले. आता आपण या शिक्षणाबाबत हतबल झालो आहोत काय? शिक्षणाची टक्केवारी किती वाढलेली आहे? आपण शिक्षणाची किती व्यवस्था केलेली आहे? लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणात ही टक्केवारी किती आहे याचा विचार केला तर **"पब्लिक फंडेड एज्युकेशन" पासून फारकत ही अतिशय घातक आहे.** जे जगाला आज कळले आहे ते आमच्या वाडवडीलांना पुर्वीच कळले होते.

महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारख्या माणसांनी टाहो फोडून जे सांगितले त्याचा आज आम्हाला विसर पडावा ही दुर्दैवाची गोष्ट आहे. महाराष्ट्रामध्ये हे अत्यंत मोठे डिपार्चर आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जे विचार मांडले ते आपण आठवा. त्यांनी असे विचार मांडले की, **"शिका,संघटीत व्हा आणि संघर्ष करा." परंतु शिक्षणाशिवाय नंतरच्या दोन गोष्टी करता येत नाहीत, शिक्षणाशिवाय संघटीत होता येत नाही आणि संघटीत झाल्याशिवाय संघर्ष करता येत नाही.** म्हणून 'शिका' हा त्यांचा पहिला मंत्र आहे.त्यांनी अशाप्रकारचे विचार मांडले की,शिक्षण ही आजची गरज आहे. **"वेळ आला तर उपाशी रहा, बायकोला फाटक लुगड नेसू द्या, फुटक्या ताटात जेवा, परंतु मुलाला**

## TREASURER'S EXPLANATORY NOTE

### GIVING DETAILS OF EXPENDITURE ON ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2005

In the Income and Expenditure Account of the Audit Report for the year ended on 31st March 2005 an amount of Rs.88,508.75 is shown as expenditure towards establishment expenses. The General Body meeting of NUTA dated 15.4.79 while discussing the audit report for the year ending on 31st March 1978 had resolved (vide item no.(3) (c) on page no. 109 of 1979 NUTA Bulletin,) that "the treasurer will circulate a brief explanatory note regarding income and expenditure giving details of expenditure as far as possible along with financial statements hereinafter". Hence the details of the break up of establishment expenses are given here.

**ESTABLISHMENT EXPENSES FOR THE YEAR ENDED ON 31ST MARCH 2005**

| Particulars | Amount Rs.P. |
|---|---|
| Travelling Expenses | 20,072.00 |
| Printing and Stationery | 24,090.75 |
| Telephone & Trunk Call | 14,437.00 |
| Meeting Expenses | 348.00 |
| Bank Commission | 2,265.00 |
| Postage | 1,457.00 |
| Affiliation Fees | 11,000.00 |
| Miscellenous Expenses | 5,239.00 |
| Clerks/Peon's Salary | 9,600.00 |
| Total | **88,508.75** |

29th July 2005

Sd. **S. A. Tiwari**
Treasurer,

**NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION**

## ELECTION NOTIFICATION

## FINAL LIST OF THE CANDIDATES

It is hereby notified for the information of all the members of NUTA that following is the **FINAL LIST OF THE CANDIDATES** (after the date of withdrawal) contesting for different posts for the election of the Executive Committee (as provided in article VI (a) of the constitution of NUTA) of Nagpur University Teachers' Association. Name/s of the candidate/s are mentioned in column No. 2 of the table and the post/s for which they are contesting are mentioned in column No. 1 of the table.

**TABLE**

| Name of the post | Name/s of the Candidate/s |
|---|---|
| 1 | 2 |
| President | Deshmukh B.T. |
| Vice-President Nagpur University Area | Dhage A.W. |
| Vice-President Amravati University Area | Somvanshi A.G. |
| Secretary | Kathale E.H. |
| Joint Secretary Nagpur University area | Dhone V.B. |
| Joint Secretary Amravati University area | Raghuwanshi P.B. |
| Treasurer | Tiwari S.A. |
| Executive Committee Member (Five) | (1) Gawai S.S.<br>(2) Hajare S.S.<br>(3) Kalmegh S.R.<br>(4) Kherde M.R.<br>(5) Misal M.D.<br>(6) Muley V.D. |

This is for the information of all the members.

09.07.2005

Sd/- E.H.Kathale
Secretary, NUTA

**शिकविल्याशिवाय राहू नका**" असे संत गाडगे महाराजांनी विचार मांडले.त्यांचे हे विचार ज्या कानांनी ऐकले त्या भाग्यवान पिढीतील मी एक लोकप्रतिनिधी आहे. "**बायकोला फाटके लुगडे नेसू द्या, एक वेळ उपाशी रहा, पाहुण्यांना पाहुणचार करु नका, धकू द्या परंतु मुलाला शिकविल्याशिवाय राहू नका.**" हे विचार त्यांनी जीव तोडून मांडले आणि आज आपण ही पध्दती आणतो आहोत. ही एक मोठी फारकत यामध्ये आहे.डॉ. पंजाबराव देशमुखांनी हॉस्टेलमध्ये कॉलेज काढले. त्या काळामध्ये सुध्दा '**ज्यांना शिक्षण मिळणार नाही त्यांना स्वातंत्र्याची फळे चाखता येणार नाही**' असा विचार त्यांनी ठामपणे मांडला आणि दोन लाखाचा निधी त्यावेळच्या निजामाकडून शाळेसाठी आणला. काही लोकांनी विरोध केला. त्यावेळेला त्यांनी सांगितले की,मी या मुलांना शिकविण्यासाठी मिळेल तेथून पैसा आणेल, तो मी व्यक्तिशः माझ्यासाठी वापरत नाही तर या मुलांच्या शिक्षणासाठी त्याची गरज आहे. त्यावेळेला बहूजनांनी फार मोठे स्वागत डॉ. पंजाबराव देशमुखांचे केले. त्यांच्या या विचाराबद्दल त्यावेळेला विरोधही झाला. निझामाचा पैसा आहे. ज्याच्याजवळ पैसा आहे त्याला त्याची किंमत कळत नाही. पण ज्या मुलांसाठी अनेक वर्षे लष्करी बरॅकीमध्ये, तट्टयामध्ये शाळा चालविली जात होती,त्या शाळेचा मी विद्यार्थी आहे आणि मला त्याचा अभिमान आहे.

या ठिकाणी एक गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सबंध विचारामध्ये एक विचार त्यांनी फार प्रखरपणे मांडलेला आहे. शिक्षण हा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्रांतीचा मुलाधार आहे. गरीब लोकांना पददलित लोकांना, मागास लोकांना त्यात सर्व प्रकारचे मागास लोक आले, त्यांना ते सांगतात, "**तुमचा उध्दार करण्याचा आता एकच मार्ग आहे. आणि तो म्हणजे राजकारण, कायदा करण्याची शक्ती. पोटभर अन्न, राहण्यास जागा आणि द्रव्याजर्नाचे साधन मिळत नाही याला कारण देव किंवा दैव दोन्हीही नाही. तुम्हाला अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण देणे हे या देशातील कायदे करणा-या सत्तेचे कार्य आहे व त्या सत्तेचा कारभार तुमच्या संमतीने, सहाय्याने आणि सामर्थ्याने चालणार आहे**". हे जे विधान त्यांनी केलेले आहे. ही शिक्षण घेण्यासाठी शिक्षण उपलब्ध नसलेल्या लोकांना दिलेली जबरदस्त अशा प्रकारची आरोग्यवर्धक चिथावणी आहे. ज्या चिथावणीचे शेकडो लाभधारक आज तुमच्या या विधेयकाला पाठिंबा देणार नाहीत. मी एक गोष्ट या सभागृहात ठामपणाने सांगू इच्छितो. मी मुद्दाम या कायद्यातील स्ट्रक्चरल बाबीवर बोलणार नाही.स्ट्रक्चरल रचना, उपरचना आहेत, त्यावर मी बोलणार नाही. मूळ सिध्दांत जो आहे, त्यामध्ये ठामपणाने पहिल्यांदा म्हटलेले आहे. उद्देश, स्टेटमेंट ऑफ ऑब्जेक्ट ॲन्ड रिझन्समध्ये सुरुवात अशी आहे की, "भारत सरकारकडून करण्यात येत असलेल्या आर्थिक सुधारणांमुळे," या विधेयकाची सुरुवात पहा. राज्य सरकारचे हे बिल आहे. "धोरण निश्चितीच्या प्रक्रियेमध्ये बदल घडून आला असून पायाभूत सुविधांच्या विकासात खाजगी क्षेत्राना सहभागी करुन घेण्यात येत आहे. **त्यानुसार राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये विशेषतः उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्राचा सहभाग सुकर करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविलले आहे.**" यातील एका वाक्याचा आधार सभागृहासमोर नाही. म्हणजे भारत सरकारकडून करण्यात येत असलेल्या आर्थिक सुधारणांमुळे जर आपण हे करीत आहोत तर त्या आर्थिक सुधारणांचे काय लाभ तुम्हाला आहेत? त्या आर्थिक सुधारणांचे लाभ फक्त महाराष्ट्रालाच आहेत काय? बाकीच्या राज्यामध्ये का नाहीत? फक्त छत्तीसगड नंतर आपलाच नंबर का लागला? मी मुद्दाम काळजीपूर्वक ऐकत होतो की, नेमकी कोणकोणती राज्ये मंत्रिमहोदय सांगतात. छत्तीसगडचे नाव त्यांनी सांगितले. दुसरे नाव त्यांनी सांगितले नाही. मी हे मुद्दाम ऐकत होतो. एखाद-दुसरे नाव असेलही, नाही असे नाही. पण हे नामांकित छत्तीसगड आहे. तेथील चॅन्सेलर, व्हाईस चॅन्सलर आणि एक-एक, दोन-दोन खोल्यांमध्ये असलेली विद्यापीठे ही सुध्दा नामांकित आहेत. तेव्हा या नामांकितांच्या मागोमाग जाण्याची जी शासनाला घाई झालेली आहे. या घाईचा पब्लिक इंटरेस्टशी काय संबंध आहे? हे एकदा समजून सांगण्याची आवश्यकता आहे. माझे ठाम मत आहे की, **पैशाच्या आधारावर शिक्षणात प्रवेश मिळणे हे जवळ जवळ ९० टक्के लोकांना शिक्षणाची दारे बंद करण्यासारखे आहे. पेईंग कपॅसिटीच्या आधारावर शिक्षण घेण्याची संधी हा बुरसटलेला विचार आहे.** हा पुढारलेल्या समाजाचा विचार नाही. तुम्ही म्हणाल दहा, पंधरा वर्षे हे चालले. हे थोडेसे चालले याचे कारण सुप्रिम कोर्टाने मध्ये त्यातल्या त्यात एक चांगला निर्णय दिला होता. ५० पर्सेंट पेईंग आणि ५० पर्सेंट

# DISTRICT UNITS OF NUTA; BYE-LAWS - 1976

**PROVIDING FOR THE ESTABLISHMENT OF DISTRICT UNITS OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION.**

*(As required under para 'd' of Article IV of the constitution.)*

WHEREAS it is expediant to frame bye-laws providing for the establishment and functioning of the district units of the association and;

WHEREAS it is also necessary to determine the relationship of such units with other organs of the association;

NOW THEREFORE as required under the provisions of para 'd' of Article IV of the constitution, the following bye-laws are framed;

1) These Bye-laws may be called District Units Bye-Laws, of NUTA,1976.

2) These bye-laws shall come into force after their acceptance by the General Body of the Association and on such date[1] as may be prescribed by the Executive Committee for this purpose.

3) The Association may have the following district units :-

1. Akola District.
2. Amravati District.
3. Bhandara District.
4. Buldhana District.
5. Chandrapur District.
6. Nagpur District ( excluding city of Nagpur)
7. Nagpur City.
8. Wardha District.
9. Yavatmal District.
10. Gadchiroli
11. Washim
12. Gondia

4) District unit may be established in such a district where the total membership of the Association is 200 or half the number of the teachers (in that district) whichever is less.

5) For the purpose of para 4, total number of teachers in a given district shall be as is published in the latest Annual Report of the Nagpur and Amravati University as the case may be

6) Each district unit shall have an Executive Committee consisting of one President, One Vice President, One Secretary, One Joint Secretary and Three members elected by the members of the association from that district from amongst themselves.

7) Notwithstanding anything contained in para 6, each member/Office bearer of the Executive Committee of the Association shall be an ex-officio member of the Executive Committee of his district.

8) President of district unit, wherefrom no member/office bearer is occupying a seat on the Executive Committee of Association, shall always be a special invitee to the meeting of the Executive Committee of the Association.

9) The Exceutive Committee of NUTA may make rules not contrary to the provisions of these by-laws or the constitution of the Association, to facilitate effective fuctioning of the District Units.

******

***NOTES** :- (1) The Executive committee of NUTA, in its meeting held on 29th July 1977 "Resolved that 15th August 1977 shall be the date on which district- Unit bye-laws shall come in to force" (Resolution No. 15 of 1977 on page 68 of 1977 Ex-file. (2) The district- Unit bye-laws, were approved by the General Body, vide item No. 2, in its meeting held on 29th November 1976. (3) These bye-laws were further amended by the proposal, printed on page 40 of 1980 Nuta Bulletin, approved by the General Body vide item No. 29 in its meeting held on 12th October 1980. (4) These bye-laws were originally printed on page 70 of 1976 Nuta Bulletin. (5) and were reproduced on page 4 and 5 of 1978 Nuta Bulletin. (6) further were again printed on page 51 of 1993 Nuta Bulletin and on page 95 of 1999 Bulletin. (7) These bye-laws were further amended by the proposal, printed on page 85 of 1999 Nuta Bulletin, approved by the General Body vide item No. 260 in its meeting held on 19th September 1999 and were printed as amended uptodate on page 116 of 1999 NUTA Bulletin. (8) Reprint is here on Page 66 of 2005 NUTA Bulletin.*

फ्री त्यातल्यात्यात. काय होते? विष थोडेसे मवाळ झाले व झोंबले नाही, असा तो प्रकार होता हे महाविष आहे. हे मोठे विष आहे. आता सुप्रिम कोर्टानेही तो निर्णय बदलला ते अनेक दिवस झोंबले नाही याचे कारण त्याच्या काही चांगल्या बाजू होत्या पण चांगल्या बाजूपेक्षा वाईट बाजू हया जास्त आहेत. आणि त्यातील सर्वात वाईट बाजू जर कोणती असेल तर गुणवान मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवले जाणार. मी येथे विचारु इच्छितो की, आता सुप्रिम कोर्टाच्या पलटलेल्या निर्णयाने जी फी झालेली आहे ही देण्याची ताकद किती लोकांमध्ये आहे? आणि मग हे जर आपल्या डोळयांना दिसत असतांना डोक्याला कळत नसेल, त्याच्यावरच्या उपाययोजना आपल्याला सूचत नसतील आणि आपण विरुध्द दिशेने आणखी प्रवास करणार असू तर आपण राज्याला योग्य दिशेने नेत नाही हा त्यातील विचार आहे. मी पुन्हा ठामपणाने सांगतो. मध्ये ते विष महाराष्ट्रात फार जाणवले नाही, त्याचे कारण पेईंग आणि फ्री ५०-५० चा जो विचार आला त्यामुळे ते विष जेवढे झोंबायला पाहिजे तेवढे झोंबले नाही. पण गेल्या दोन वर्षापासून ते बदलले व मोठया प्रमाणामध्ये महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनामध्ये आता हे विष पसरत आहे. एक, दोन, तीन वर्षात याचे अत्यंत वाईट परिणाम दिसायला लागतील. उत्तम महाविद्यालये काही ठिकाणी डेव्हलप झाली. काही ठिकाणी मी म्हणतोय याचे कारण सर्व ठिकाणी ती परिस्थिती नाही. काही ठिकाणी ती डेव्हलप झाली त्याबद्दल जरुर आनंद. पण आनंदाला काही कम्पॅरिजन असते की नाही? दोन, तीन, चार महाविद्यालये उत्तम रीतीने डेव्हलप झाली ही आनंदाची गोष्ट आहे पण किती गुणवान विद्यार्थ्यांना आपण पैशाअभावी वंचित ठेवतो? आणि त्यामुळे समाजामध्ये काय स्थिती निर्माण होते? माझे शिक्षक अनट्रेंड होते. बोर्डावर लिहिले जात होते ते अनट्रेड आहेत. ते बी.एड.च्या ट्रेनिंगला जात असत त्यावेळेला त्यांना विद्यावेतन मिळत असे. स्टायपेंड म्हणायचे त्याला गावामध्ये. त्यांचा सत्कार होत असे की, 'यांना स्टायपेंड मिळालेली आहे.' 'त्याला विद्यावेतन मिळालेले आहे.' स्टायपेंडला विद्यावेतन हाच शब्द त्यावेळी होता.

तो शिक्षक बी.एड. होऊन आल्यानंतर मग ज्या तऱ्हेने शिक्षक म्हणून आयुष्यभर काम करीत होता त्याची तुलना आज बी.एड.ला जाताना ज्या यातना भोगाव्या लागतात याच्याशी होऊ शकत नाही. **आजच्या बी.एड. प्रवेशामुळे सबंध आयुष्याकडे पाहण्याचा विचार ठामपणाने बदललेला असतो. हा बदल आपल्या लक्षात येत नसेल, आलेला नसेल, येणारही नसेल, तर ते महाराष्ट्राचे फार मोठे दुर्दैव आहे.** या तुमच्या विनाअनुदानाच्या मधल्या काळामध्ये पहिला पगार न पाहिलेल्या शिक्षकांची जी पिढी निर्माण झाली आहे तिचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा मी जवळून पाहात आहे. एकंदरीत शिक्षणाच्या व्यवस्थेमध्ये मी आपल्याला सांगू इच्छितो की, आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेजची जेवढी फी होती त्या काळात तेवढीच इंजिनिअरिंगची फी होती. मी शाळेत असताना नागपूरला त्यावेळी इंजिनिअरिंग कॉलेज नव्हते. त्यावेळी त्यावेळच्या मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये जबलपूरला जावे लागत होते. १००-१२५ रुपये फी असावयाची. जबलपूरच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये गेलेला माझ्या गावच्या शेतकऱ्याचा मुलगा मध्यप्रदेशमध्ये चिफ इंजिनिअर म्हणून रिटायर्ड झाला. भोपाळला आजही वयाच्या ६७ व्या वर्षी त्या चिफ इंजिनिअरच्या चेहऱ्याकडे पाहिले, त्यांचे तेज पाहिले म्हणजे मग हा आज सर्व्हीसमध्ये आलेला आमचा नवा इंजिनिअर आता ओळखू येत नाही. आमच्या नव्या इंजिनिअरच्या चेहऱ्यावरील गमावलेले जे तेज आहे त्याचे मर्म प्रवेश घेतांना मोजाव्या लागलेल्या रुपयात आहे. ही स्थिती जर आपल्याला समजली नाही तर ही गोष्ट काही खरी नाही. हे समजले पाहिजे. त्यांचे जे वर्तन आहे, तो ज्या तऱ्हेने आपल्या जीवनाच्या प्रवासाला सुरुवात करतो त्याचा एवढा जबरदस्त ठसा त्यांच्या सबंध वर्तनावर जीवनभर पडतो आणि मग त्यातून चारही बाजूला तो आपले शिक्षणासाठी गमावलेले धन मोजत असतो. मग तो स्टायपेंडवर बी.एड. झालेला त्यावेळचा आमचा शिक्षक किंवा त्यावेळच्या जबलपूरच्या रॉबर्टसन इंजिनिअरिंग कॉलेजमधून बाहेर निघालेला इंजिनिअर आम्ही त्यावेळी पाहिलेला आहे. त्यांचे अतिशय ग्रेसफूल रिटायर्ड होणे पाहिलेले आहे. आज झालेला बदल आम्ही पाहात आहोत. हे जे आपण केलेले आहे त्यामध्ये काय तरतूदी आहेत ? सबंध पैसा मोजणाऱ्या बलदंड लोकांचे हे शिक्षण होणार आहे. अर्जापासून याची सुरुवात होते. या विद्यापीठासाठी अर्ज सुध्दा बलवानांनीच करावयाचे, ते विद्यापीठ काढावयाचे सुध्दा बलवानांनीच. चान्सलरही बलवान, व्हाईस चान्सेलर आणि विद्यार्थी सुध्दा बलवान. इथे विद्यार्थी मिळाले नाहीत तर बाहेरचे आणू. हे कशासाठी ? बिहार आणि बंगाल हे भारतातीलच भाग आहेत. आता आपण परदेशात सुध्दा जावयास लागलो. माझे असे म्हणणे आहे की, बिहारला सर्व्हीसेस द्यायला हरकत नाही. बंगालला

---

*क्रमाक-आरएसपी-२००४/४११६२/स्थानि/विशि-१*

*शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)*

*महाराष्ट्र राज्य, पुणे-१*

दिनांक २२.६.२००५

प्रति,

१) सर्व विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र राज्य,

२) सर्व कुलसचिव, सर्व विद्यापीठे,

३) सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक, उच्च शिक्षण.

**विषय -** करिअर ॲडव्हान्समेंट योजनेबाबत अधिव्याख्यात्यांना वरिष्ठ श्रेणीमधून निवडश्रेणीत स्थाननिश्चिती करणेबाबत.

**संदर्भ** :- शासन पत्र क्रमांक एनजीसी २००४/(५८/०४)/विशि-४ दिनांक १७ जून, २००५

वरील विषयाबाबत संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, दिनांक ११.१२.९९ च्या शासन आदेशान्वये ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्यात आल्या. सदर आदेशान्वये अकृषी विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयांना करिअर ॲडव्हान्समेंट योजना लागू करण्यात आली. त्या अनुषंगाने या संचालनालयाच्या पत्र क्रमांक आरएसपी/२०००/५ वा वेतन आयोग/२३/विशि-२ दिनांक १४.२.२००२ नुसार परिपत्रक काढण्यात आले होते सदर परिपत्रकावर शिक्षक संघटनांनी आक्षेप घेतल्यानुसार फिडर केडरच्या संदर्भात शासन व विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडे मार्गदर्शन मागविण्यात आले होते.

फिडर केडरच्या संदर्भात वरिष्ठ श्रेणीतून निवड श्रेणीत जातांना ५ वर्षे सेवा पूर्ण करणे याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून त्यांचे पत्र क्रमांक एफ-२-३-२०००(पीएस) दिनांक १२.५.२००५ नुसार मार्गदर्शन प्राप्त झाल्यानुसार शासनाने वर नमूद केलेल्या संदर्भिय पत्र दिनांक १७.६.२००५ नुसार ५ वर्षाची असलेली अट काढून टाकण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने या संचालनालयाचे दिनांक १४.२.२००२ नुसार जे परिपत्रक काढण्यात आले होते त्यातील शेवटच्या मुद्यांमध्ये असे नमूद केले होते की, वरिष्ठ श्रेणीत ५ वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतरच निवड श्रेणीत स्थान निश्चिती करण्यात येईल या वाक्याऐवजी वरिष्ठश्रेणीत ५ वर्षाची अट असण्याची आवश्यकता नाही असे वाचावे.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीसाठी सादर

---

***महाराष्ट्र शासन***

**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**

***महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.***

Web : www.dirhe.org : E-mail : dirhe@pn2.vsnl.net.In

*फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९फॅक्स नं. ०२०/२६१११९५३*

*क्रं. उशिस/२००५/परिप/स्था.नि./मवि-१ : दिनांक : ४ जुलै २००५*

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य.

**विषय** :- महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या निवड समिती व स्थाननिश्चिती समितीवर प्रतिनिधी म्हणून करावयाच्या नेमणूकाबाबत.

**संदर्भ** :- या संचालनालयाचे समक्रमांकाचे दिनांक २८/३/२००५ चे परिपत्रक.

वरील विषयाबाबत संदर्भाधिन परिपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, अशासकीय महाविद्यालयामधील अधिव्याख्यात्यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेतंर्गत स्थाननिश्चिती व निवडश्रेणी देण्याबाबत ११/१२/९९ च्या आदेशान्वये योजना लागू केलेली आहे. करिअर ॲडव्हान्समेंट योजनेतंर्गत सदर आदेशान्वये विहित केलेल्या समितीमार्फत शिक्षकांना स्थाननिश्चिती व निवडश्रेणी मंजूर करण्यात येते व ते आपल्या कार्यालयाकडून तपासून पाहून नियमित प्रकरणात त्यांची वेतननिश्चिती आपल्या कार्यालयाकडून करण्यात येते.

आपल्या कार्यालयाकडून स्थाननिश्चिती व निवडश्रेणी तपासणी बाबत टाळाटाळ होते अशा आशयाच्या तक्रारी झाल्यानंतर या संदर्भात लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न व अतारांकित प्रश्न विधानसभा व विधानपरिषदेमध्ये उपस्थित झालेले होते व त्या अनुषंगाने **या संचालनालयाच्या दिनांक २८ मार्च, २००५ च्या परिपत्रकान्वये आपल्या कार्यालयास परिपत्रक देवून अशी प्रकरणे नियमानुसार सकारात्मक अथवा नकारात्मक गुणवत्तेनुसार तपासून सदरचा निर्णय सहसंचालकांनी प्राचार्यांना १५ दिवसाचे आत प्रकरणे निकाली काढण्याबाबत कळविलेले होते.** या संचालनालयाने दिलेल्या सूचनेनुसार आपल्या कार्यालयाकडून विहित मुदतीत कार्यवाही झाली असेल अशी या संचालनालयाची धारणा आहे. ती कृपया पक्की करण्यात यावी. व सदरची माहिती या संचालनालयास फॅक्सद्वारे दिनांक ५ जूलै, २००५ पूर्वी पाठविण्यात यावी. कारण या संदर्भात झालेल्या तारांकित प्रश्नास तातडीने माहिती द्यावयाची असून याबाबत कृपया प्राथम्य द्यावे.

**शिक्षण संचालक**
**(उच्च शिक्षण)**

सर्व्हीसेस देण्यास हरकत नाही. पण आपला उजेड पूर्ण झाल्यानंतर त्यांना द्या. आपला उजेड पडत नाही आणि मग इथे बिहारच्या आणि बंगालच्या श्रीमंत बलदंड मुलाच्या कॉलनीच्या कॉलनी तयार होतात आणि समाजजिवनात नवे प्रश्न निर्माण होतात. आज तर परराष्ट्राची गोष्ट यामध्ये आहे. याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, खरोखरच जर हा विचार करावयाचा असेल तर वरवरच्या गोष्टी सोडा, याचा जो बेसीक विचार आहे, ही जी मुळ विचाराशी फारकत आहे ती तपासून पाहण्यासाठी आपण जॉइन्ट सिलेक्ट कमिटी करा. एकाही कमीशनचा अहवाल तुमच्या बाजूचा नाही. भारताचे सांगत आहात तेही भारत सरकारने बदलले आहे. नॉन मेरीट गूडमध्ये वर्ल्ड बँकेने ज्यावेळी हायर एज्युकेशन टाकले त्यावेळी सबंध जगभर त्याची प्रतिक्रिया उमटली आणि आता त्यांनी त्यांचा रिपोर्ट बदललेला आहे. पण त्या वर्ल्ड बँकेमुळे इकडे जे सुरु झाले होते ते थांबतच नाही अशी परिस्थिती आहे. वर्ल्ड बँकेने नॉन मेरीट गूडमध्ये हायर एज्युकेशन टाकले होते ही खरी गोष्ट आहे. त्यावर केवळ भारतातूनच नाही तर सबंध जगभरातून जी टीका झाली, युनेस्कोच्या मार्फत कॉन्फरंस घेऊन वर्ल्ड बँकेच्या पार्टीसीपेशननंतर ती गोष्ट त्यांनी मागे घेतलेली आहे. पण हे भारत सरकारला कळेल केव्हा आणि

## महाराष्ट्र शासन

### शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web : www.dirhe.org : E-mail : dirhe@pn2.vsnl.net.In

*फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९फॅक्स नं. ०२०/२६११११५३*

*क्रं. आरएसपी/२००४/४११६२/स्थानि/विशि-१ :*

*दिनांक : ४ जुलै २००५*

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण)

२. सर्व कुलसचिव, सर्व विद्यापीठे

३. सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक उच्च शिक्षण

**विषय** :- करिअर ॲडव्हान्समेंट योजनेबाबत अधिव्याख्यात्यांना वरिष्ठ श्रेणीमधून निवड श्रेणीत स्थाननिश्चिती करतांना फिडर केडरचा लाभ देणेबाबत.

**संदर्भ** :- शासनपत्र क्रमांक एनजीसी२००४/(५८/०४)/विशि-४ दिनांक १७ जून, २००५

वरील विषयाबाबत संदर्भाधिन पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, ११/१२/९९ च्या शासन आदेशान्वये ५ व्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू केल्यानंतर करिअर ॲडव्हान्समेंट योजनेतंर्गत फिडर केडरच्या संदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागविल्यानुसार वरील संदर्भिय पत्रान्वये शासन आदेश देण्यात आलेले आहेत. त्या आदेशास अनुसरून या संचालनालयाच्या समक्रमांकाच्या दिनांक २२/६/२००५ च्या परिपत्रकान्वये या संचालनालयाने दिनांक १४/२/२००२ नुसार जे परिपत्रक काढलेले होते. **त्या परिपत्रकामधील शेवटच्या परिच्छेदामधील वरिष्ठ श्रेणीत ५ वर्ष झाल्यानंतरच निवडश्रेणीमध्ये स्थानिश्चिती करण्याबाबतची अट रद्द करण्यात आलेली आहे असे आपणास कळविण्यात आलेले आहे.**

पाचव्या वेतन आयोगानुसार ज्या शिक्षकांची वरिष्ठ श्रेणीतून निवड श्रेणीमध्ये एकत्रित सेवा विचारात न घेता स्थाननिश्चिती करण्यात आलेली आहे व या संदर्भात शिक्षक संघटनांनी तक्रार केल्यानुसार याचा फेरविचार करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने आपल्या विभागामध्ये फिडरकेडरचा विचार न करता ज्या शिक्षकांची निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करण्यात आलेली आहे अशा शिक्षकांची प्रकरणे या संचालनालयाने विहित केलेल्या प्रपत्रामध्ये माहिती घेण्यात यावी. सदरची माहिती ही महाविद्यालयनिहाय व शिक्षकनिहाय घ्यावयाची असून अशी सर्व प्रकरणे संचालनालयाच्या स्तरावर निकाली काढण्यात येणार आहे. त्यासाठी संचालनालयाच्या स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | मा. संचालक (उच्च शिक्षण) | अध्यक्ष |
| २ | सहसंचालक उच्च शिक्षण मुख्यालय | अध्यक्ष तथा अध्यक्षांचे प्रतिनिधी |
| ३ | सहा. संचालक (लेखा) शि.सं.उ.शि. | सदस्य |
| ४ | संबंधित विभागाचे सहसंचालक | सदस्य |
| ५ | संबंधित विभागाचे वरिष्ठ लेखापरीक्षक | सदस्य |
| ६ | संबंधित विभागाचे प्रशासन अधिकारी | सदस्य |
| ७ | प्रशासन अधिकारी विशि-१ शाखा | सचिव |

वरीलप्रमाणे संचालनालयाच्या स्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली असून या समितीमार्फत सर्व प्रकरणे तपासण्यात येवून त्याबाबतचे निर्णय लागलीच घेण्यात येणार आहे. तेव्हा फिडरकेडरनिहाय ज्या प्रकरणामध्ये फेरविचार करावयाचा आहे. अशी सर्व प्रकरणे या संचालनालयास १ ऑक्टोबर, २००५ ते १५ ऑक्टोबर, २००५ या कालावधीमध्ये विभागनिहाय तपासण्यात येवून त्याबाबतचे निर्णय लागलीच देण्यात येणार आहेत. त्या अनुषंगाने आपल्या विभागाची माहिती महाविद्यालयनिहाय व शिक्षक निहाय दिनांक ३० सप्टेंबर, २००५ पर्यंत पुर्ण करून या संचालनालयाने विभागनिहाय तारखा कळविल्यानुसार आपल्या विभागातील सहसंचालक व संबंधित अधिकारी यांनी समक्ष सादर करावयाची आहे.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती विचारात घेऊन निवडश्रेणीमध्ये फिडरकेडर नुसार प्रकरणांची माहिती महाविद्यालयनिहाय घेण्यात यावी. याबाबत कृपया कोणताही विलंब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

## महाराष्ट्र शासन

### शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.

Web : www.dirhe.org : E-mail : dirhe@pn2.vsnl.net.In

*फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९फॅक्स नं. ०२०/२६११११५३*

**क्रं. बीयूडी/२००५/६७८९०/आ.त./लेखा-२ : दिनांक : २३ जून, २००५**

**आदेश**

**विषय** :- अशासकीय महाविद्यालयांना भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा होणारी महागाई भत्त्याची रक्कम आणि ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये जमा करणे, एम.फिल/पीएच.डी. च्या वेतनवाढी व स्थाननिश्चितीसाठी देय असलेली रक्कम

शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक मभवा-११०३/प्र.क्रं.२२/सेवा-९ दिनांक १६ ऑक्टोबर २००३ च्या आदेशान्वये दिनांक १ जानेवारी २००२ पासून दिनांक ३१ जूलै २००३ पर्यंतच्या कालावधीतील महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावयाची आहे. तसेच शासनाने दिनांक १ ऑगस्ट २००४ पासून मूळ वेतनामध्ये ५० टक्के महागाई भत्ता विलीन करण्याचा निर्णय घेतला आहे व तसे आदेश निर्गमीत झालेले आहेत. तसेच शासन निर्णय दिनांक ११.१२.१९९९ अन्वये शिक्षक कर्मचाऱ्यांना एम.फील/पीएच.डी. तसेच वरिष्ठ व निवड श्रेणीमध्ये स्थाननिश्चिती करण्यात आल्यामुळे त्यांना देय होणारी रक्कम तरतुदीअभावी देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे त्यांना देय असलेली रक्कम देण्यासाठी खालीलप्रमाणे तरतूद मंजूर करण्यात येत आहेत.

(रुपये हजारात)

| अ.क्रं. | विभागाचे नांव | महागाई भत्त्याच्या फरकाची भविष्य निर्वाह निधीमध्ये जाणारी रक्कम | ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करणे, एम.फिल/पीएच.डी. च्या वेतनवाढी व स्थाननिश्चितीसाठी देय असलेली रक्कम | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | सहसंचालक (उच्च शिक्षण) मुंबई | ७६८०० | ११६००० | १९२८०० |
| २ | सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे | ५६००० | ५८००० | ११४००० |
| ३ | सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर | ४५५०० | ८०००० | १२५५०० |
| ४ | सहसंचालक (उच्च शिक्षण) जळगांव | ३०८०० | ४७७०० | ७८५०० |
| ५ | सहसंचालक (उच्च शिक्षण) औरंगाबाद | २८६०० | ७०००० | ९८६०० |
| ६ | सहसंचालक (उच्च शिक्षण) नांदेड | २६७०० | १४००० | ४०७०० |
| ७ | सहसंचालक (उच्च शिक्षण) अमरावती | २९००० | ६५००० | ९४००० |
| ८ | सहसंचालक (उच्च शिक्षण) नागपूर | २२५०० | ९०००० | ११२५०० |
| | एकूण | ३१५९०० | ५४०७०० | ८५६६०० |

(एकूण रुपये पंचाऐंशी कोटी सहासष्ट लाख फक्त)

या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम ही खालील लेखाशिर्षाखाली खर्च टाकण्यात यावी.

लेखाशिर्ष - २२०२ सर्वसाधारण शिक्षण ०३ विद्यापीठीय व उच्च शिक्षण १०४ अशासकीय महाविद्यालयांना व संस्थांना सहाय्य (०१) अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य (०१) (०१) अशासकीय वाङ्मय, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयांना अनुदाने (२२०२ ०८७२) ४१ सहायक अनुदाने मागणी क्रमांक डब्ल्यू - २.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

भारत सरकार यांना सांगेल केव्हा ? त्याला वेळ लागेल. पण आज भारत सरकारने तुम्हाला याबाबतीत असे काहीही कळविलेले नाही अशी माझी ठाम माहिती आहे. तुम्ही या तऱ्हेने करा असे कळविलेले नाही. एकाच गोष्टीचा विचार मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. जॉईन्ट सिलेक्ट कमिटीमध्ये आपण मी हे जे बॅकग्राऊंड सांगितले याचा विचार करीत असताना स्वातंत्र्यांनंतर एकामागून एक एज्युकेशन कमिशन झाले त्या कोणत्याही कमीशनने आपल्या या कामाला पाठिंबा दिलेला नाही. सर्व रिपोर्टातील शेरे मी वाचून दाखविले तर वेळ जाईल. ढोबळ मानाने बोलण्याची व समजून घेण्याची गोष्ट आहे आणि आपण ते तपासावे. ते तपासून आपण हे कशाच्या आधारावर करीत आहोत, कोणते एक्स्पर्ट बसलेले होते, त्यांनी कोणते सिद्धांत मांडलेले आहे, गरीब मुलांच्या संख्येचा बिनचूक अंदाज त्यांच्याजवळ आहे काय ? गरीब कोणाला म्हणावे हे महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ मध्ये दाखविले आहे. महाराष्ट्रातील सरासरी दरडोई उत्पन्न रु. १५८०४ रुपये तुम्ही त्या तुमच्या रिपोर्टच्या तक्ता १११ मध्ये दाखविलेले आहे. नागपूर हा एक जिल्हा सोडून सारेच्या सारे विदर्भातील आणि मराठवाड्यातील जिल्हे त्या राज्यसरासरीच्या खाली आहेत. माणसांच्या **पेईंग कॅपॅसिटीचा विचार होणार आहे की नाही? महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थ्यांचा विचार होणार आहे की नाही? महाराष्ट्रातील आम जनतेच्या पेईंग कॅपॅसिटीचा विचार कोणीच करणार नाही काय? राज्यकर्ते विचार करणार नाही तर कोण करणार ? याच्या सिध्दांताची चर्चा झाली पाहिजे आणि ती चर्चा होण्यासाठी आताची ही घाई होणे उचित नाही.** शासनाचा विधेयकाच्या पाठीमागचा हेतू चांगला आहे असे दिसत नाही. संयुक्त समितीपुढे हे विधेयक गेल्यानंतर ते पुन्हा सभागृहासमोर येईल आणि कदाचित सांगितले जाईल की अजून १०० वर्षे थांबावे. असा विचार सुध्दा त्याच्यातून पुढे येऊ शकतो. इतके बोलून मी माझे भाषण संपवितो.

-----

## श्री.जी.एल.अैनापुरे

**श्री.जी.एल.अैनापुरे (पुणे विभाग शिक्षक ) :** सभापती महोदय,महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्यासंबंधी जे विधेयक माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी मांडलेले आहे त्याला कडाडून विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, खाजगी विद्यापीठे ही फक्त प्रगल्भ समाजातच चालू शकतात. खाजगी विद्यापीठे पचविण्याइतका आपला देश अद्यापि प्रगल्भ झालेला नाही.दुसरी गोष्ट अशी आहे की, बहुसंख्य विद्यार्थी व बहुसंख्य समाज हा पारंपारिक शिक्षण अजूनही घेऊ शकत नाही. त्यामुळे तो या विद्यापीठात येऊ शकत नाही. त्यामुळे सर्व समाजासाठी ही विद्यापीठे आहेत हा युक्तिवाद मला पटत नाही. काही मूठभर बुध्दिमान लोकांनी बहुजन समाजाला 'मामा' करण्यासाठी हे गोंडस नाव दिलेले आहे. सध्या अस्तित्वात असलेली विद्यापीठेही आधुनिक व सक्षम नाहीत म्हणून हे विधेयक मांडण्यात आलेले आहे असे जर आपण म्हणत असाल तर हीच विद्यापीठे अधिक सक्षम करता येतात. त्यामध्ये फक्त आर्थिक बाबीसंबंधीचा प्रश्न आहे.जर फी घेऊन खाजगी विद्यापीठांना शिक्षण देण्याची शासन परवानगी देणार असेल तर मग जी पारंपारिक विद्यापीठे आहेत त्यांनाच फी घेऊन अधिक चांगल्या प्रकारे सक्षम केल्यास अधिक चांगल्या पध्दतीचे शिक्षण ते देऊ शकतील.

कै.यशवंतराव चव्हाण यांना १९६१ साली कराड येथे असा प्रश्न विचारण्यात आला होता की, "एवढया सगळया शाळांना आपण परवानगी दिलेली आहे आपण त्यांना अनुदान देणार आहात तेव्हा त्यांच्या ऐवजी तुम्हीच या शाळा का चालवत नाहीत.?" त्या प्रश्नाला त्यांनी जे उत्तर दिले होते ते आजच्या राज्यकर्त्यांनी ऐकण्या सारखे आहे. त्यांनी असे सांगितले होते की, "मला कॉंग्रेस पक्षाचे तत्वज्ञान शिकवावयाचे नाही किंवा उद्या जे कोणते सरकार येईल त्याला त्यांचे तत्वज्ञान शिकवावयाचे नाही. हे समाजाचे शिक्षण आहे ते राजकारणात नसलेल्या लोकांनी आणि ज्यांना शिक्षणात रस आहे, **ज्यांना शिक्षणाची आवड आहे त्याचबरोबर त्यागावर आधारीत काम करणा-या व शिक्षणासाठी सर्वस्व अर्पण करणा-या समाजातील काही चांगल्या लोकांच्या हातात शिक्षण रहावे अशी माझी कल्पना आहे."** म्हणून मला असे सांगावयाचे आहे की ,यामध्ये एखाद दुसरा चोर शिरला असेल तर सिस्टीम मध्ये तो हळूहळू बाद होईल. परंतु चांगले लोक या क्षेत्रात येतील आणि शिक्षणाची परंपरा चांगल्या पध्दतीने चालेल. त्यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.पंजाबराव देशमुख,बापूसाहेब साळुंखे,मामासाहेब जगदाळे यांच्या शिक्षण संस्था चांगल्या प्रकारे काम करणा-या आहेत. त्या इतक्या चांगल्या पध्दतीने काम करीत होत्या की जवळजवळ ४०० ते ५०० कोटी रुपयांची प्रॉपर्टी त्यांनी निर्माण केली होती परतु मरतांना त्यांना औषधासाठीसुध्दा पैसे मिळाले नाहीत. त्यांना स्वतःची घरे नव्हती. अशा प्रकारे शिक्षणासाठी त्याग करणारी ही मंडळी होती. आज आपण हे शिक्षण कोणाकडे देत आहात ? सध्या शिक्षणाचे जे गेट उघडे आहेत ते गेट बंद केल्यामुळे बाहेरुन माणसे येतात. तेव्हा बाहेरुन या ठिकाणी माणसे का आलेली आहेत ? याचा विचार केला तर आपल्याला असे दिसून येईल की, ७० ते ८० टक्के लोक शाळा किंवा कॉलेजेस मिळविण्यासाठी येथे आलेले आहेत. त्यांचा इतिहास पाहिला तर ती गोष्ट आपल्या लक्षात येईल. परवा माननीय सदस्या श्रीमती रायकर यांनी प्रश्नोत्तराच्या तासाला एक उदाहरण दिले होते की, एक शिपाई होता व तो त्या शाळेचा अध्यक्ष झाला होता. त्याने इंदिरा गांधीच्या नावाने एक हायस्कूल काढले होते. अशा पध्दतीचे लोक आज या युनिर्व्हसिटीजमध्ये येणार आहेत. **सध्या अस्तित्वात असलेल्या युनिर्व्हसिटीजकडे**

### केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्याप्रमाणे राज्य शासनाने १ जुलै, २००४ पासून ३ टक्के महागाई भत्ता वाढ मंजूर न करणे

*पहिले अधिवेशन, २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*

*शुक्रवार, दिनांक १५ एप्रिल, २००५*

महाराष्ट्र विधान परिषद नियम १०१ अन्वये **श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतदादा खोटरे, श्री.नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.ऐनापूरे,** सर्व विधान परिषद सदस्य यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.:-

"राज्यातील शासकीय अधिकारी कर्मचारी, खाजगी क्षेत्रातील शिक्षक कर्मचारी व निवृत्त वेतन धारकांना केंद्र शासनाचे कर्मचाऱ्याप्रमाणे राज्य शासनाने १ जुलै, २००४ पासून ३ टक्के महागाई भत्ता वाढ मंजूर न करणे, सुधारित मुळ वेतनावर १४ टक्के ऐवजी ११ टक्के महागाई भत्ता मिळणे, केंद्र शासनाचे कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात १ जानेवारी, २००५ पासून ३ ते ४ टक्के वाढ प्रस्तावित असणे, वित्त विभागाचे १ ऑक्टोबर १९८८ व शिक्षण, सेवायोजन विभागाचे दिनांक २ सप्टेंबर,१९८९ चे शासन निर्णय व राज्य शासनाने वेळोवेळी निर्णय घेऊन केंद्र शासनाप्रमाणे समतुल्य भत्ते मंजूर केले असणे, राजपत्रित अधिकारी महासंघाने शासनाचा चालढकलपणा मा.मुख्यमंत्री व वित्त मंत्री यांना निवेदन देऊन नजरेस आणून दिला असणे, शासनाने निर्णय न घेतल्यामुळे अधिकारी/कर्मचारी व शिक्षक वर्गात कमालीची अस्वस्थता निर्माण झालेली असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई"

**मा.श्री.जयंत पाटील, वित्त मंत्री यांचे निवेदन**

वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : मभवा ११०४/प्र.क्र.१२/सेवा-९ दिनांक २४ मार्च,२००५ रोजी पारित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना मूळ वेतन अधिक महागाई वेतनाच्या ११ टक्के ऐवजी १४ टक्के दराने महागाई भत्ता वाढ दिनांक १ एप्रिल २००५ पासून लागू करण्यात आली आहे. केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २००५ पासून प्रस्तावित असलेल्या महागाई भत्ता वाढीच्या शासन निर्णयाची प्रत शासनास प्राप्त झाल्यानंतर सदर वाढ राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत विचार करण्यात येईल. त्यामुळे अधिकारी/ कर्मचारी व शिक्षक वर्गात कमालीची अस्वस्थता निर्माण झालेली आहे असे म्हणणे संयुक्तिक नाही.

### केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला महागाई भत्ता राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनाही देण्याबाबत

*दुसरे अधिवेशन, २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*

*सोमवार, दिनांक ११ जुलै, २००५*

**(८४) * ६४२३ श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , डॉ. वसंत पवार , श्री. राजेंद्र जैन, श्री. सदाशिवराव पोळ , श्री. जगन्नाथ शेवाळे, श्रीमती मंदा म्हात्रे , प्रा. फौजीया खान , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. संजय दत्त , श्री. नतिकोद्दीन खतिब , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे तारांकीत प्रश्न क्र.१७७४ ला दिनांक १८ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय वित्त मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात माहे जुलै, २००४ पासून ३ टक्के वाढ करण्याच्या विचाराधीन प्रश्नावर शासनाचा विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २००५ पासून देय असलेल्या ३ टक्के महागाई भत्ता वाढीच्या शासन निर्णयाची प्रत शासनास प्राप्त झाल्यानंतर सदर वाढ राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत शासनाने घ्यावयाच्या निर्णयाची सद्यःस्थिती काय आहे,

(३) शासनाने निर्णय घेतला असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे आहे आहेत ?

**श्री. जयंत पाटील** : (१) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. मभवा ११०४/ प्र.क्र.१२/सेवा-९, दिनांक २४ मार्च, २००५ अन्वये, राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दिनांक १ एप्रिल, २००५ पासून ३ टक्के वाढ करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

******

**आज कोणाचेही लक्ष नाही. तेव्हा त्याकडे लक्ष देण्याची आज आवश्यकता आहे.**

याठिकाणी छत्तीसगडचे उदाहरण देण्यात आले होते परंतु छत्तीसगडची ओपन युनिर्व्हसिटी हा एक राजकीय सौदा होता.सगळया गुन्हेगारांनी मुक्त विद्यापीठे काढली होती . एक माणूस सोडला तर त्यामध्ये एकही शिक्षण तज्ज्ञ नव्हता. ज्या माणसांनी ही विद्यापीठे काढली होती ती माणसे समाजातील टाकावू होती. समाजकंटक म्हणून ज्यांची ख्याती होती त्या लोकांनी युनिर्व्हसिटीज काढल्या होत्या. सुरुवातीला त्यांनी पैसे घेतले , जागा मिळवल्या, इमारती बांधल्या व नंतर युनिर्व्हसिटीज चालविण्यामध्ये त्यांना काहीही इंटरेस्ट नव्हता म्हणून त्यांनी लोकांना असे सांगितले की, जमले तर करा, नाहीतर घरी जा. त्याप्रमाणे काही लोक घरी गेले. त्यामुळे युनिर्व्हसिटीज बंद पडल्या. तेव्हा या जागेचा उपयोग काय होतो हा संशोधन करण्याचा विषय आहे. सुरुवातीला आपल्याकडे बी.एड.कॉलेजेस अनुदानित आणि विनाअनुदानित तत्वावर चालविण्यासाठी खाजगी लोकांना परवानगी दिली होती आज त्यांची काय परिस्थिती आहे? **त्यानंतर इंजिनिअरिंग कॉलेजेसना परवानगी दिली त्याप्रमाणे लोकांनी पैसे गोळा केले. शासनाकडून स्वस्तात जमिनी मिळविल्या काही वर्षे त्या संस्था चालवल्या व नंतर त्या बंद केल्या. मधल्या भिंती पाडल्या आणि तेथे जे इंजिनिअरिंग कॉलेज सुरू केले होते तेथे आता मंगल कार्यालय सुरू आहे अशी अवस्था आहे. म्हणून शासनाकडून मिळणारे फायदे घेण्यासाठी या लोकांनी हे उद्योग सुरू केलेले होते वा आहेत. खरे म्हणजे आपली ही एक प्रकारची बौद्धिक दिवाळखोरी आहे असे माझे स्पष्ट मत आहे.** हे विधेयक आणणे म्हणजेच राज्याची बौद्धिक दिवाळखोरी आहे. ज्यांच्या डोक्यातून ही कल्पना पुढे आली आहे त्यांच्या बाबतीत मी चिंता व्यक्त करण्याशिवाय दुसरे काही करू शकत नाही. कारण असे विद्यापीठ आणणे आणि ती कोण चालू करणार? त्यांची काही नावे यामध्ये आलेली आहेत, त्यांचे काम आहे का हे ? ते त्यांचे काम नाही. त्यांना त्यासाठी वाहून घेऊ द्यात ना ? अशा हजारो संस्था सुरू करू द्यात. त्यातून समाजाचा काही फायदा होईल. परंतु केवळ एका विशिष्ट उद्देशाने ... या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.गडकरी यांनी काही इंजिनिअर आणि मेडिकल कॉलेजांची नावे घेतली आहेत आणि ती फार चांगली आहेत असे ते म्हणाले. परंतु माझा त्यावर विश्वास नाही. कारण नॅकच्या सिस्टिममध्ये स्टार मिळविण्याची जी पध्दत आहे, A+ , B+ वगैरे वगैरे. पण ती सिस्टीमसुद्धा तपासण्यासारखी आहे. आपल्या देशात दिखाऊपणा फार आहे. येथे मेडिकल कॉलेजचे उदाहरण दिले. यातील काही लोकांची मेडिकल कॉलेजेस अशी आहेत की, ज्यावेळेस तेथे ऑल इंडिया मेडिकल कौन्सिलचे शिष्ट मंडळाचे वा नॅकचे पथक तपासणीसाठी येते, ते तेथील मुलांनाच आजारी पाडतात आणि मग त्या मेडिकल कॉलेजच्या सगळ्या कॉटस् फुल्ल असतात. इतकेच काय पण कित्येकदा माणसे मजुरीने आणलेली असतात. आज तुला ३० रुपये देतो, तू केवळ आज कॉटवर झोपायचे आणि जायचे. तेव्हा या सगळ्या गोष्टी मॅनेज केलेल्या आहेत, केल्या जातात.

**अध्यक्ष महाराज, मी शिक्षण क्षेत्रात काम करणारा एक माणूस आहे. मला या सगळ्या गोष्टींचा अनुभव आहे. कुणीही काहीही म्हणत असले तरी सुद्धा हे जे विधेयक आणले गेलेले आहे ते स्वच्छ हेतूने आणलेले नाही तर अत्यंत दुष्ट बुद्धीने आणलेले आहे.** दुष्ट बुद्धीने एवढ्याचसाठी आणलेले आहे की, यातून आर्थिक लाभ कसा मिळवायचा? पैसा कसा मिळवायचा? साखर कारखाने झाले. त्यासाठी शासनाकडून मदत घेतली. अध्यक्ष महाराज, सकाळी या ठिकाणी या साखर कारखानदारी संबंधात चर्चा झाली. मी त्या चर्चेत भाग घेणार होतो. परंतु तो आपला प्रांत नाही म्हणून मी भाग घेतला नाही. तरीही मी आपल्याला सांगतो की, मी सुध्दा एक ऊस पिकविणारा शेतकरी आहे. **या साखर कारखान्यांनी आमचे काय दिवाळे वाजविले आहे आणि त्यातून कोणाचा विकास झाला आहे हे मी येथे बोललो तर हे लोक येथे राहणार नाहीत अशी परिस्थिती आहे. आता तेच लोक ही कॉलेजेस काढू लागले आहेत. कारण सगळे साखर कारखाने आता अडचणीमध्ये आले आहेत. सूत गिरण्यासुध्दा सरकारचे कर्ज वगैरे घेऊन, कापूसच**

## दि. १ जानेवारी २००५ पासून संबंधित पात्र कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या सुत्रानुसार अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या वाढी रोखीने देणे

*दुसरे अधिवेशन, २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*
*शनिवार, दिनांक २३ जुलै, २००५*

**प्रा.बी.टी.देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.अैनापूरे,** वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना :-

"दिनांक १ एप्रिल २००३ पासून संबंधित पात्र कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या सूत्रानुसार अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या वाढी रोखीने देय रहातील" असे मा. वित्तमंत्री यांच्या दालनात २१ डिसेंबर २००१ रोजी संघटनेशी झालेल्या चर्चेत शासनाने मान्य करणे, तसे समन्वय समितीच्या निमंत्रकांना त्याच दिवशी पत्र (क्रमांक ASC(D) DA12/01) लिहून अप्पर मुख्य सचिवांनी कळविणे, "१ एप्रिल २००३ पासून संबंधित पात्र कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या सूत्रानुसार अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या वाढी रोखीने देय राहतील" असे ता.प्र.क्र. २२७७३ ला दिनांक २६ मार्च २००२ रोजी दिलेल्या लेखी उत्तरात मा. अर्थमंत्र्यांनी नमूद करणे, "त्यामुळे त्यांनी पुन्हा संपाची नोटीस दिली त्यांच्याबरोबर चर्चा करुन पुन्हा आपण केंद्राप्रमाणे महागाई भत्ता देण्याचे धोरण स्वीकारले आहे" असे मा. वित्तमंत्र्यांनी २५ जुलै २००३ मध्ये लक्षवेधी सूचनेवरील अनुपुरक चर्चेमध्ये सांगून सुद्धा त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी न होणे, ११ ऐवजी १४ टक्क्यांचा वाढीव महागाई भत्ता केंद्र शासनाने १ जुलै २००४ पासून लागू केलेला असतांना राज्य शासनाने मात्र तो १ एप्रिल २००५ पासून लागू करणे, १ जानेवारी २००५ पासून केंद्र शासनाने केलेली वाढ लागू करण्यात शासनाकडून होत असलेला विलंब, यामुळे या लक्षावधी कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**(मा. श्री. जयंत पाटील, वित्त मंत्री यांचे निवेदन)**

केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै २००४ पासून मंजूर करण्यात आलेली ३ टक्के महागाई भत्ता वाढ राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल २००५ पासून देण्यात आली आहे. सदर निर्णय राज्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करुन घेण्यात आला.

केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दिनांक १ जानेवारी २००५ पासून ३ टक्के वाढ करण्यात आली. **शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा ११०५/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक १४ जुलै २००५ अन्वये ३ टक्के महागाई भत्ता राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै २००५ पासून देण्यात आला आहे.**

केंद्र शासन त्यांचेकडील कर्मचाऱ्यांना ज्या ज्या वेळी महागाई भत्ता वाढ अनुज्ञेय करते, ती वाढ राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना वेळोवेळी अनुज्ञेय करते, ती वाढ राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना वेळोवेळी अनुज्ञेय करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-मभवा ११०२/प्र.क्र.२२/सेवा-९, दिनांक १६ ऑक्टोबर २००३ अन्वये राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ ऑगस्ट २००३ पूर्वीची महागाई भत्त्यातील थकबाकीसुद्धा मंजूर करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक - मभवा ११०३/प्र.क्र.१४/सेवा-९, दिनांक १० जून २००४ अन्वये केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढ देण्यात आली आहे. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-मभवा ११०५/प्र.क्र.५/सेवा-९, दिनांक १९ जुलै २००४ अन्वये केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई वेतन देण्यात आले आहे. यावरुन असे दिसून येते की, केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता वाढ वेळोवेळी देण्यात आली आहे. त्यानुसार **आता राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे एकूण १७ टक्के महागाई भत्ता देण्यात आला आहे.** त्यामुळे कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे असे म्हणणे संयुक्तिक नाही.

*****

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ एप्रिल २००५ पासून महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत*

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

***शासन निर्णय, क्रमांक मभवा ११०४/प्र.क्र. १२/सेवा-९***
***मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ : दिनांक २४ मार्च २००५***

पहा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा ११०४/प्र.क्र.५/सेवा-९. दिनांक १९ जुलै २००४

### शासन निर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणाऱ्या इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक **१ एप्रिल २००५** पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनाच्या ११ टक्के ऐवजी १४ टक्के दराने महागाई भत्ता वाढ **मंजूर करण्यात यावी.**

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

४. शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्यामुळे येणारा खर्च, हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची घालण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(मीना जोशी)**
शासनाच्या उपसचिव

*****

**नाही तर सूत कुढून काढणार म्हणून बंद पडल्या आहेत म्हणून मग आता हे लोक या शिक्षण क्षेत्राकडे वळले आहेत. डी. एड कॉलेज सुरू केले.. हा एक उद्योगच सुरू झाला.** अध्यक्ष महाराज, स्व. वसंतरावदादा पाटील यांनी कृष्णा मेडिकल कॉलेजचा जो वाद झाला होता, त्यावेळी यशवंतराव चव्हाण, वसंतराव नाईक, वसंतदादा हे सगळे असताना दादांनी भाषणात सांगितले की, आपल्याला एक डॉक्टर तयार करायचा, तो बाहेर जाऊ नये म्हणून तो येथेच तयार करू या आणि त्याने कमीत कमी २०० माणसांना काम द्यावे. एक इंजिनिअर तयार करायचा आणि त्याने कमीत कमी १००-१५० लोकांना येथे काम द्यायचे. त्याने नोकरी मागायची नाही आणि त्यांना नोकरी देण्याची व्यवस्था आमच्या प्रशासनात असणार नाही. हे त्यांनी स्पष्ट शब्दात सांगितले होते. त्यानंतर आज काय परिस्थिती झाली ? आताच येथे सन्माननीय श्री.गडकरी साहेब म्हणाले की, आमचा देश गरीब का ? याचे एकच कारण आहे आणि ते म्हणजे एवढा हजारो कोटी रुपये खर्च करून इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीची कॉलेजेस आम्ही सुरू केली. त्यामध्ये मेरिटवर प्रवेश दिला. पण ती मेरिटची मुले आहेत कोठे ? खर्च त्यांचेवर आम्ही केला, शिकविले आम्ही, गुंतवणूक आम्ही केली आणि ही सगळी मुले गेली दुसऱ्या देशात. तेथे जाऊन त्यांनी प्रचंड पगारावर नोकऱ्या घेतल्या. त्याचे कौतुक केले की, यांनी यांनी इतका पैसा कमावला वगैरे. अध्यक्ष महाराज, हे परदेशी लोक फार शहाणे आहेत. कारण सर्वसाधारणतः समाजातील जो अप्पर क्लास असतो तो नेहमीच असा विचार करतो की, दुसऱ्याची बुद्धी विकत घ्यायची आणि त्या विकत घेतलेल्या बुद्धीचा वापर करून पैसा कमवायचा आणि त्यातील फार थोडा भाग त्या बुद्धीवानाला द्यायचा. म्हणूनच हे अमेरिकन असोत वा जापनीज असोत, हे लोक भारतीय लोकांना नोकऱ्या देतात, पैसे देतात. अर्थात ते उपकार करीत नाहीत, कारण ते जे या भारतीयांना पैसे देतात त्याच्या १० पट ते कमावत असतात. तेव्हा त्यांनी ही सारी गुंतवणूक करीत बसण्यापेक्षा भारतासारखा दरिद्री देश आहे की जो वेड्यासारखा यासाठी खर्च देखील करतो आहे तर त्याला तो खर्च, ती गुंतवणूक करू दे, मग त्यातून तयार होणारी मुले आपण घेऊ. अध्यक्ष महाराज, या देशामध्ये असा काही कायदा आहे का की, आमच्या देशामध्ये फ्रीशिप घेऊन, मेरिट मध्ये येऊन जे शिकले, ज्यांनी पदव्या मिळविल्या त्या लोकांनी येथेच नोकरी केली पाहिजे, येथेच उद्योग सुरू केला पाहिजे. पण तसा कायदा नसल्याने आपल्याकडील बुध्दीवान मुले, मेरिटमधील मुले येथे रहात नाहीत. त्यामुळे आमचा देश गरीबच राहणार, तो केव्हाही श्रीमंत होणार नाही. **आपण जरा भारताचा इतिहास लक्षात घ्या. ज्यावेळी सर्व जग शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अतिशय रांगत्या अवस्थेमध्ये होते त्यावेळी भारतामध्ये अत्यंत प्रगत अशी शिक्षण पध्दती होती.** त्या पध्दतीमुळे देशाचा इतिहास बदलला, सुवर्णमय युग देशाला प्राप्त झाल्याचे आपण त्यावेळी पाहिले. त्यावेळच्या राजे रजवाडयांनासुध्दा पैशाच्या जोरावर अशा काही संस्था सुरु कराव्यात असे वाटले नाही असे नाही. परंतु त्यावेळच्या समाजाने त्यांना मान्यता दिली नव्हती. त्यावेळी समाजाने अशा गोष्टींवर विश्वास ठेवला नव्हता. म्हणून राजे किंवा ऐपतदार कुणी असतील त्यांनी या प्रांतामध्ये कधी प्रवेश केला नाही. आज आपण राजकारणासंबंधी बोलत आहात. राजकारण आणि शिक्षण याचा काही संबंध आहे? Politics is the last resort for.... असे म्हणतात मी तर असे म्हणेन की, Education is the last resort for.... याची गरज काय हा पहिला भाग? दुसरी गोष्ट अशी की,आपण आर्थिक तरतूद म्हटले आहे. मा. उच्च शिक्षण मंत्री म्हणाले की, आपण यासाठी आर्थिक तरतूद केल्याशिवाय खर्च करु शकत नाही, मान्य आहे. परंतु आज परिस्थिती उलट आणि सुलट आहे. आज आपण महाराष्ट्र सरकारचे उदाहरण घेऊ. **शिक्षणावर आपण तरतूद केली. परंतु गेल्या ५-६ वर्षामध्ये तो खर्च केला आहे कां? हा खर्च हळू हळू कमी करीत आला आहात. आज आपण ५५ ते ५७ टक्के खर्च करीत आहात. बजेटमध्ये तरतूद करुनसुध्दा आपण खर्च करीत नाही. इतर ठिकाणी सूतगिरण्यांनी दिवाळे काढले त्यांना कर्ज दिले, दिवाळे काढणाऱ्या साखर कारखान्यांना आपण मदत दिली. परंतु शिक्षण खात्याला अनुदान दिले नाही. आज सोलापूरसारखे उत्कृष्ट विद्यापीठ चालले पाहिजे, लोकांचा विकास झाला पाहिजे. आपण त्यासाठी १ कोटी दिले,** पुढे काय? मुंबई विद्यापीठाकडे ४०० कोटी रुपये शिल्लक पडले आहेत. त्यांच्याकडून काढून ते देण्याची कुणाची भावना नाही. असे असतांना उत्कृष्ट शिक्षण देण्याची आपण चुकीची अपेक्षा करीत आहात. आणि मग म्हणता की, सोलापूरला बरोबर चाललेले नाही, कसे चालेल? **म्हणून शिक्षण देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आरोग्य व शिक्षण या दोन गोष्टी शासनाला देता येत नाहीत ते शासन म्हणण्याच्या लायकीचे नाही.** हा राजकारणामधील शब्द आहे. आणि म्हणून ही जबाबदारी दुसऱ्यावर सोपविणारे शासन हे शासन नाही ते राज्यकर्ते असतील परंतु ते शासन नव्हे.. शासनाने रितसर परवानगी देऊन चालविलेली विद्यापीठे आतापर्यंत उत्तम काम करीत आहेत. अमेरिका, जपान आणि युरोपात जावून ज्यांनी नावे कमावली, पैसा कमाविला त्यांना कुणी शिकविले? आज असलेल्या तुमच्या परंपरागत विद्यापीठांनी त्यांना शिकविले. कर्नाटक, बँगलोर आणि पुणे, मुंबईच्या विद्यापीठांनी शिकविले? हे विद्यार्थी कुठे तयार झाले? त्यांची कुवत नाही? लायकी नाही? तर मग आपण आर्थिक आर्थिक म्हणू नका. आज खाजगी मेडिकल कॉलेजमध्ये समाजातील मुलगा ३० ते ४० लाख रुपये देऊन प्रवेश घेतो. याच मुलांना पारंपारिक विद्यापीठामध्ये मॉडर्न टेक्नॉलॉजी, इनफॉर्मेशन टेक्नॉलॉजीचे शिक्षण देऊ शकतो तरीसुध्दा या तंत्रज्ञानासाठी आपण खाजगी विद्यापीठे आणू इच्छितो. त्या कारणासाठी मुलांकडून फी घेण्यासाठी परवानगी आहे. ती जर फी घेतली तर माझ्या समजुतीप्रमाणे एका वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला एक

---

*Dearness Relief on pension/family pension*

***GOVERNMENT OF MAHARASHTRA : FINANCE DEPARTMENT***

**Government Resolution : No. DRP-1005/246/SER-4 Mantralaya, Mumbai 400 032, dated 28th March 2005**

**Read :-** (1) Government Resolution, Finance Department, No. DRP 1004/136/SER-4 Dated 15th June 2004
(2) Government Resolution, Finance Department, No. PEN 1004/185/SER-4 Dated 20th July 2004

## RESOLUTION

Government is pleased to decide that dearness relief shall be paid to the State Government Pensioners/Family Pensioners on their basic Pension/Family Pension and Dearness pension/Dearness family pension **at the rate of 14%** with effect from 1st April 2005.

2. Payment of dearness relief involving a fraction of a rupee shall be rounded off to the next higher rupee.

3. It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e.Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

4. Government is also pleased to direct that above decisions should, **mutatis mutandis,** apply to those employees including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Non -Agricultural universities and Affiliated Non Government Colleges and Agricultural Universities to whom the pension scheme is made applicable.

5. In exercise of the powers conferred by the proviso to section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah. V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf, Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

6. State Government Employees who had drawn lumpsum payment on absorption in a PSU/Autonomous body./Local Bodies and have become entitled to restoration of 1/3rd commuted portion of pension as well as revision of the restored amount in terms of Government Resolution, Finance Department, No. COP 1099/306/SER-4, dated 15th November 1999 will also be entitled to the payment of dearness relief on full pension as per the provisions of Government Resolution, Finance Department, No. COP-1001/50/SER-4, dated 9th April 2001, at the prescribed rate and from the date, prescribed in paragraph 1 above.

7. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

8. All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, **Mutatis Mutandis,** apply to the dearness relief now sanctioned.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

**Jayant Y. Gaikwad**
Deputy Secretary to Government

वर्षाला १ लाख ३५ हजारापेक्षा जास्त फी बसत नाही. ४०-४० लाख रुपये फी घेण्याची गरज नाही. यामध्ये मेरिट ठेवता येईल, रिझर्व्हेशनही ठेवता येईल. सर्व गोष्टी आपल्याला ठेवता येतील. **पण आज ज्यांनी कायदा करावयाचा आहे, तेच आज गुन्हेगाराच्या पिंजऱ्यात उभे आहेत. त्यांना शिक्षा कोण देणार? त्यांनीच हा विचार केला पाहिजे की आपण या भानगडीमध्ये पडू नये.** हे विधेयक संमत झाल्यानंतर भराभर अर्ज येतील. काही राजकारणी लोकांचे अर्ज आले आहेत. राजकारणाच्या पलिकडे जाऊन ज्यांची गुन्हेगार म्हणून ख्याती आहे ते लोक या क्षेत्रात येतील. आणि ते विद्यापीठे स्थापन करतील. डिग्रीसंबंधी विचार केला तर पारंपारिक विद्यापीठांमध्ये अजूनही नीतिमत्ता पाळली जाते. त्याठिकाणी थोड्याफार प्रमाणात कॉपी होत असेल परंतु येथे तर सर्रास पेपर लिहून दिले जातात. यापेक्षा ते वाईट आहे काय? आणि म्हणून ऐपतदार मुलांसाठी आपल्याला हे शिक्षण द्यायचे असेल, **केवळ ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांच्यासाठी करायचे असेल तर मात्र तुमचा हेतू चांगला नाही असे मला म्हणावे लागेल. कारण जे शिक्षण महर्षी झालेले आहेत, त्यांच्यातील राजकारण हा भाग काढा आणि त्यांनी आठवीचा वर्ग चालवून दाखवू दे. मी चॅलेंज देतो. त्यांचा राजकारणातील भाग काढा, ही राजकीय माणसे नाहीत, तेवढा भाग पुसून काढा आणि त्यांनी वर्षभर बालवाडी चालवून दाखवू दे, ही त्यांची ऐपत आहे लक्षात ठेवा. म्हणून हे अतिशय भयानक बिल आहे.** एज्युकेशन जर प्रायव्हेटायझेशनकडे गेले तर हे लोक आपल्याला पाहिजे तसे, पाहिजे ते लोक मोठे करतील आणि मग हेच लोक उद्या आय.ए.एस.ऑफिसर होतील, उद्या हेच लोक विद्यापीठाचे चान्सलर, व्हाईस चान्सलर होतील, प्राध्यापक होतील आणि दुसरीकडे पारंपारिक विद्यापीठामध्ये शिकणारा मुलगा, जो प्रामाणिकपणे अभ्यास करुन, जो परीक्षा देऊन कुठे ५० टक्के, ६० टक्के आणि ६५ टक्क्याने पास होतो, त्याचे काय ? आज बिहारमधील मुले आमच्याकडे इंटरव्ह्यु साठी येतात. सेटनेट झालेली, त्यांच्याकडे एम.ए.ला इंग्रजीमध्ये ८१ टक्के मार्क मिळालेले असतात, या महाराष्ट्रात अजून पर्यंत कोणत्याच युनिव्हर्सिटीने एम.ए.साठी इंग्रजीमध्ये ८१ टक्के मार्क दिलेले नाहीत. पण आमच्याकडे बिहारमधील मुले येतात. माझी संस्था आहे, माझ्याकडे येतात. त्यांना "तु बिहारमधून निघाला आहेस आणि येथे येऊन पोहोचला आहेस" हे वाक्य इंग्रजीमध्ये बोलून दाखव असे सांगितले तर त्याला येत नाही. तरी सुध्दा तो सेट पास आहे, तो नेट पास आहे आणि शिवाय तो पी.एच.डी.आहे. हे

## महाराष्ट्र शासन : शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१.**

Web : www.dirhe.org : E-mail : dirhe@pn2.vsnl.net.In फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९फॅक्स नं. ०२०/२६१११९५३

क्रं. बीयूडी/२००५/६७८९०/ आ.त./लेखा-२ : दिनांक : ४ जुलै २००५

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण. . . . . . विभाग . . . . . . .

**विषय :-** अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १९ महिन्याचा महागाई भत्ता भविष्यनिर्वाह निधीमध्ये जमा करणे, ५० टक्के महागाई भत्त्याची रक्कम वेतनात समाविष्ट करणे तसेच शिक्षक संवर्गामधील अधिव्याख्यात्यांना स्थाननिश्चिती व निवडश्रेणीनुसार देय असणारी फरकाची रक्कम देणे.

**संदर्भ :-** संचालनालयाचे समक्रमांक दिनांक २३/६/२००५

वरील विषयाबाबत मा. संचालनालयाच्या समक्रमांकाच्या दिनांक २३/६/२००५ च्या आदेशान्वये आपल्या विभागांना तरतुदी वितरीत करण्यात आलेल्या आहेत. त्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

**१. भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा करणे -**

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक मभवा-११०३/प्र.क्र. २२/सेवा-९ दिनांक १६/१०/२००३ च्या आदेशान्वये १ जाने. २००२ ते ३१/७/२००३ या कालावधीमधील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा करावयाची रक्कम विभागनिहाय एकूण रुपये ३१,५९,००,०००/- रक्कम मंजूर करण्यात आलेली असून आपणास वितरीत करण्यात आलेली आहे. सदरची रक्कम ही कोषागाराकडून काढण्यात येऊन संबंधित कर्मचाऱ्यांचे खात्यावर जमा करावयाची आहे. याबाबत संबंधित महाविद्यालयाकडून कर्मचारी निहाय फरकाची विवरणपत्रे तयार करुन मागविण्यात यावी.

सदर विवरणपत्रे तयार करतांना कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष देण्यात आलेला महागाई भत्ता व देय असलेला महागाई भत्ता यामधील देय होणारा फरक याबाबतची विवरणपत्रे महाविद्यालयाकडून उपलब्ध करुन घेण्यात यावीत व फरकापोटी देय होणाऱ्या रकमेचाच धनादेश संबंधित महाविद्यालयाचे नांवे नोंदविण्यात यावा. परंतू प्रत्यक्ष धनादेश महाविद्यालयास न देता तेवढ्याच रक्कमेची पोच पावती महाविद्यालयाकडून घेण्यात यावी.

तसेच कर्मचाऱ्यांना फरकापोटी देय होणारी रक्कम भविष्यनिर्वाह निधीमध्ये जमा करावयाची असल्याने याबाबतचे कर्मचारीनिहाय व खातेक्रमांक निहाय विवरणपत्र प्रत्येक महाविद्यालयानिहाय घेण्यात यावे. सर्व महाविद्यालयाकडून उपलब्ध झालेली विवरणपत्रे एकत्रित गोषवारा करुन आपल्या कार्यालयाने संपुर्ण विभागाचा एकच धनादेश काढून तो तातडीने कोषागारात भरण्यात यावा व त्याचा अहवाल या संचालनालयास दिनांक २२ जूलै २००५ पर्यंत पाठविण्यात यावा.

**२. ५० टक्के महागाई भत्ता थकबाकी -**

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक मअव-११०४/प्र.क्र.५/सेवा-९ दिनांक १९ जुलै, २००४ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे अशासकीय महाविद्यालयामधील कर्मचाऱ्यांना ५० टक्के महागाई भत्ता वेतनात विलिन करुन तो डी.पी. म्हणून दर्शविण्याबाबत शासनाने दिलेल्या आदेशानुसार १ ऑगस्ट २००४ पासून मंजूर करावयाचा आहे. त्यानुसार थकबाकीची रक्कम द्यावयाची आहे. या संदर्भात आपल्या स्तरावरून महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना डी.पी. वेतनात समाविष्ट करुन पूर्ण वेतन देणेबाबत यापुर्वीच संचालनालयाच्या पत्र क्रं. उशिसं/परिप/२००५/अनु/विशि-१ दिनांक २८/३/२००५ नुसार आपणास आदेश देण्यात आलेले आहे व त्याप्रमाणे सर्व विभागीय कार्यालये वेतन अनुदान देत आहेत. परंतु ज्या महाविद्यालयास तरतुदी अभावी मे २००५ पुर्वी कर्मचाऱ्यांना १ ऑगस्ट २००४ पासून डी.पी. मर्ज करुन वेतन देता आले नाही त्यांच्यासाठी अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या थकबाकीसाठी विभागांना तरतूद मंजूर करुन वितरीत करण्यात आलेली आहे. तरी सर्व विभागीय कार्यालयांनी सर्वच महाविद्यालयातील सर्व शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचेकडून कर्मचारी निहाय विवरणपत्रे भरुन घ्यावीत व ज्यांना थकबाकीची रक्कम देय आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांचे थकबाकीचे धनादेश १५ ऑगस्ट २००५ पर्यंत अदा करावेत याबाबतीत आपल्या कार्यालयासंबंधी कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर विवरणपत्रे विभागीय वरिष्ठ लेखा परीक्षक यांचेकडून नंतर तपासून घेऊन संचालनालय शासनास अहवाल सादर करावयाचा आहे. प्रस्तुत प्रकरणी या संदर्भात आपल्या विभागातील सर्व महाविद्यालयाची विवरणपत्रे मागविण्यात यावीत. सदर विवरणपत्र मागवितांना देय असणारा ५० टक्के महागाई भत्ता, प्रत्यक्ष दिलेले वेतन यांचे सविस्तर विवरणपत्र मागविण्यात यावे व ज्या महाविद्यालयांनी हा फरक दिलेला असेल त्यांना देण्यात येऊ नये, व ज्यांना देय असेल त्यांनाच हा फरक देण्यात यावा याची सविस्तर विवरणपत्रे आपल्या कार्यालयात घेण्यात यावीत व त्यानुसार देय होणाऱ्या फरकाचीच रक्कम महाविद्यालयांना अदा करावी.

**३. स्थाननिश्चिती थकबाकी -**

स्थाननिश्चिती समितीमार्फत ज्यांना स्थाननिश्चिती व निवडश्रेणी मंजूर करण्यात आलेली आहे व त्यांच्या वेतननिश्चितीस आपल्या कार्यालयाने सहमती दिलेली आहे, व त्यास वरिष्ठ लेखा परीक्षक यांनी वेतन पडताळणी केलेली आहे, अशा शिक्षकांना देय होणाऱ्या फरकाच्या रकमाबाबत त्यांना प्रत्यक्ष देण्यात आलेले वेतन व स्थाननिश्चिती व निवडश्रेणीमुळे देय होणारे वेतन व त्यानुसार येणारा फरक (Due, Drawn, Difference) याबाबतचे सविस्तर विवरणपत्र महाविद्यालयाकडून मागविण्यात यावे. त्यानुसार महाविद्यालयास देय होणाऱ्या फरकाच्या तेवढ्याच रकमेचा धनादेश १५ ऑगस्ट २००५ पूर्वी संबंधित महाविद्यालयास देण्यात यावा.

**४. एम.फिल/पीएच.डी. वेतनवाढी -**

एम. फिल/पीएच.डी. च्या वेतनवाढी मंजूर केल्यानंतर शिक्षकांना देय ठरणाऱ्या फरकाच्या रकमेबाबत मुद्दा क्रमांक २ नुसार विवरणपत्रे मागविण्यात यावी व त्यानुसार देय होणाऱ्या रकमेचाच धनादेश महाविद्यालयास देण्यात यावा. स्थाननिश्चिती, निवडश्रेणी, एम.फिल, पीएच.डी. मुळे देय होणारी फरकाची रक्कम महाविद्यालयांना दिनांक १५ ऑगस्ट, २००५ पर्यंत देण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

वरील सर्व सूचना विचारात घेऊन (१) १९ महिन्याचा महागाई भत्ता जी.पी.एफ. मध्ये जमा करणे (२) ५० टक्के महागाई भत्ता वेतनात विलिन करण्यापोटीची थकबाकी अदा करणे. (३) स्थाननिश्चिती व निवडश्रेणी यांचे फरक देणे तसेच (४) पीएच.डी. व एम.फिल वेतनवाढीचा फरक देणे याबाबतची कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी. या संदर्भात कोणत्याही महाविद्यालयाची तक्रार येणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी त्याचप्रमाणे या संदर्भात महाविद्यालयाकडून तक्रारी आल्यास संबंधितांवर त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येऊन त्यांचेवर कारवाई होऊ शकते याची नोंद घ्यावी. या संचालनालयाने जे अनुदान मंजूर केलेले आहे व ते आपल्या कार्यालयामार्फत वितरीत करण्यात येणार आहे. त्या संदर्भात आपल्या कार्यालयाकडे महाविद्यालयनिहाय फरकाची जी विवरणपत्रे उपलब्ध होणार आहे. त्याची तपासणी संचालनालयाच्या पथकाकडून तातडीने करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

कशामुळे ? तसे करावयाचे आहे का ? बाहेरच्या मुलांना जगामध्ये मार्केट नाही, महाराष्ट्रीयन मुलांना जेवढे इलेक्ट्रॉनिक्समध्ये आहे, तेवढे त्यांना नाही. म्हणून याचा विचार जरुर करावा. हे करताना आणखी काही गोष्टी सांगतो, मी माझे भाषण जास्त वाढवत नाही. यावर मला खूप बोलावयाचे होते आणि उदाहरणे देऊन बोलतो. परंतु आता थोडक्यात बोलतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी अगदी थोडक्यात बोलावे.

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात)

**तालिका सभापती** : थोडक्यात विचार मांडता येतात.

**श्री.जी.एल.ऐनापूरे** : सभापती महोदय, जमेल त्याने उच्च शिक्षण घ्यावे अशी जर शासनाची इच्छा असेल तर हे शासन सर्व लोकांचे प्रतिनिधीत्व करते असे मी म्हणणार नाही. भारत असा एक देश आहे की,जेथे जगातील सर्वात जास्त पदवीधर आपल्याकडे आहेत. आपल्या माहितीसाठी सांगतो. कोणत्याही देशामध्ये एवढे पदवीधर नाहीत. पण त्याचबरोबर हेही तितकेच खरे आहे की, सगळयात जास्त निरक्षर आपल्याकडेच आहेत. ही जी डिस्पॅरिटी आहे, ही डिस्पॅरिटी दुस-या क्षेत्रामध्ये आणखी वाढणार आहे. म्हणून हेही बरोबर नाही. याचा विचार नक्की केला पाहिजे. **यातून काय होईल ? जर जो उच्चशिक्षित पालक आहे, जो ऑलरेडी कोणत्या तरी कारणाने चांगल्या जागेवर काम करीत आहे, मग तो सरकारी अधिकारी असेल, तो कारखानदार असेल, तो उद्योगपती असेल, जो दोन नंबरचा पैसा कमाविणारा असेल ती माणसे या सगळया शिक्षणाचा फायदा घेतील आणि जो खरोखर बुध्दीमान आहे, जो खरोखरच चांगला आहे, गुणवान आहे, त्या मुलाला याच्या जवळपास सुध्दा फिरता येणार नाही अशी अवस्था होईल.** बाजारीकरण, व्यापारीकरण किंवा खाजगीकरणाचे म्हटले तर कोणकोणत्या गोष्टीचे तुम्ही खाजगीकरण करणार आहात ? मुळातच प्रश्न असा आहे की, खाजगीकरण म्हणजे नेमके काय ? हे आमच्या देशातील राजकीय लोकांना तरी कळलेले आहे की नाही ही शंका आहे. तुमच्याकडे क्लास घ्या. खाजगीकरण कशाकशाचे करणार आहात ? तुमच्या खाजगी लाईफचे, तुमच्या संस्कृतीचे खाजगीकरण करणार आहात का ? शिक्षण हे संस्कृतीचे माध्यम आहे. संस्कृती संवर्धन आणि संक्रमण करणे हे शिक्षणाचे महत्वाचे काम आहे. ते शिक्षण तुम्ही अशा प्रकारे खाजगीकरणाच्या नावाखाली दुस-याच्या ताब्यात देणार ? उद्योगामध्ये खाजगीकरण करा, आमचे काही म्हणणे नाही. परंतु उद्या माझ्या जेवणा-खाण्यामध्ये, माझ्या चालीरितीमध्ये, माझ्या घरातील वागण्यामध्ये आणि माझ्या परंपरागत असलेल्या संस्कृतीचे खाजगीकरण कराल आणि त्याप्रमाणे करावे असे म्हटले तर त्याला माझी तयारी नाही. एक दिवस हा देश पेटेल. म्हणून इंग्रजांनी शहाणपणा केला आणि यात भाग घेतला नाही. ते या भानगडीमध्ये पडले नाहीत. पण सरकारने तो खोचकपणा करु नये असे मला वाटते. **खाजगी विद्यापीठे, म्हणजे मी थोडक्यात असे म्हणेन की, हा जनतेशी शासनाने केलेला द्रोह आहे. याला दुसरे काही म्हणता येत नाही. यात कुठेही इमानदारी नाही.** याशिवाय अजूनही काही मुद्दे आहेत. पण सभापती महोदया, आपण मला बोलण्यासाठी वेळ दिला तर मी सांगेन. कोठारी कमिशनने सांगितले की, Destiny of the Nation is being set in the four walls of the School. Now, the destiny of the Nation and Education is being set in the Self-financed Universities and Private Institutions. आज तुम्ही या विधेयकाद्वारे कोठारी यांचे वाक्य पुसून आमची सगळी डेस्टीनी खाजगी स्वयं-अर्थ सहाय्यित विद्यापीठाच्या लोकांच्या ताब्यात देणार आहात काय ? त्या पलीकडे जाऊन आज ज्या इन्स्टीटयुशन्स चालविलेल्या आहेत, त्या इन्स्टीटयुशन्सचे रेप्युटेशन काय आहे ? जर त्याचे रेप्युटेशन चांगले असेल तर मग एवढा आरडाओरडा का होतो? एवढया चौकशा का होतात? याचा अर्थ असा आहे की, तेथे चांगले चाललेले नाही. आपणच म्हणतो की, चांगले चाललेले आहे. माझीच शाळा आहे, याबद्दल मीच वर्णन करतो, तपासणी मीच करतो, रिपोर्ट माझीच माणसे देतात आणि माझ्या माणसासमोर तो रिपोर्ट वाचून दाखवितो. मग मी म्हणतो की, माझी इन्स्टीटयुशन फार चांगली चाललेली आहे. आपण ती ति-हाईतांना ती दाखवा. एवढा पैसा खर्च करण्याची गरज नाही. मी मागच्यावर्षी देखील सुचविले होते. परंतु कोर्टाच्या निकालामुळे ते दिले असे सांगितले. कोर्टमुळे दिले, याचा अर्थ महाराष्ट्र सरकारमध्ये त्यावेळेला कोण असेल त्यांचा हा मुर्खपणा आहे. मी मुर्खपणा एवढयासाठी शब्द वापरला, की त्यांच्या तोंडावर सांगितले होते की, या गोष्टी तुमच्या हातातून जाणार आहे, त्यावर ते म्हणाले जाणार नाही. मी बी.एड कॉलेज संघटनेचा अध्यक्ष आहे, त्या नात्याने मी त्यांना सांगितले होते. त्यांच्यासमोर मी सूत्र ठेवलेले होते. ते आजही आपल्या समोर ठेवतो. आपल्याला विद्यापीठे चालू करायची आहेत, टेक्नॉलॉजी इन्फर्मेशन, टेक्नॉलॉजीमध्ये अग्रेसर राहिले पाहिजे, जगात पुढे गेले पाहिजे. पण त्याचा अर्थ हा नाही की खाजगी क्षेत्रात कोणाकडे तरी ते द्यावे. ते शासनाच्या ताब्यात असावे, त्यावर शासनाचा अंकुश असावा, ते पारंपारिक विद्यापीठातच चालू रहावे. यासाठी किती खर्च येईल, हे काढू शकता. साधारणपणे एक मेडिकल कॉलेज, एक इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीचे कॉलेज, अवकाश तंत्रज्ञानाचा विषय शिकविण्यासाठी किती खर्च येईल, हे आपण काढू शकतो. भागीले इंनटेक कार्पेसिटी, अधिक पाच टक्के, १० टक्के मेंटेनन्स चार्ज दिला तर आता चाललेल्या पध्दतीपेक्षाही निम्म्या पैशामध्ये सगळयांचे शिक्षण व्यवस्थित होईल. पण ते न करता कोणाच्या तरी फायद्यासाठी, कोणाच्या तरी स्वार्थी हेतूसाठी...हे लोक फार हुशार आहेत. समाजामध्ये कधी पुढे येत नाहीत. ते म्हणतात की, याबाबतचा कायदा झाला की, त्याचा लगेच फायदा घ्यायचा. **वसंतदादा पाटील यांनी फक्त टेक्निकल, मेडिकल आणि कॉम्प्युटर या तीन क्षेत्रामध्ये खाजगी लोकांना कॉलेजेस काढण्यासाठी परवानगी दिलेली होती. आपण आता तर प्रायमरी शाळा खाजगी लोकांकडे द्यायला लागलेलो आहोत. अनुदानित शाळेमध्ये विना अनुदानित तुकडया द्यायला लागलो. कोणाला डोके आहे की नाही, समजत नाही. अनुदानित शाळेवर कायम विना अनुदानित तुकडया द्यायला सुरुवात केली. कोणी तरी अधिकारी सर्कस करतो आणि त्यामध्ये मंत्री नाचतात, हे बरोबर नाही.** अनुदानित आणि कायम अनुदानित याचा टेक्निकली अर्थ काय आहे हे सांगतात, त्यावर शासन नाचते, त्यापेक्षा दिवाळखोरीचे आणखी कोणते उदाहरण पाहिजे ? हे बरोबर नाही. शिक्षणाची दिशा व्यवस्थित देत नाही. म्हणून मी सभागृहाला आणि उच्च शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो की, हे विधेयक पास झाले तर educational chaos, शैक्षणिक गोंधळ, या पलिकडे काही सुरु होणार नाही. त्या गोंधळामध्ये कोण बळी पडेल, हे आज कोणी सांगणार नाही. मुलांमधून असा एक उद्रेक होईल. आम्ही समस्त शिक्षक याच्या विरोधामध्ये आहोत. प्रायमरीपासून कॉलेज लेवलपर्यन्त आम्ही गप्प बसणार नाही. इतके आम्ही सांगितल्यानंतरही रेटून हे विधेयक पास केले तर येथून गेल्यानंतर गल्ली-गल्लीमध्ये सभा घेऊन लोकांना याचे दुष्परिणाम सांगू. अशी कॉलेज सुरु करणा-या लोकांना जगणे मुष्कील करुन ठेवू. म्हणून जो जॉइंट सिलेक्ट कमिटीकडे हे विधेयक पाठविण्याबाबतचा तोडगा काढलेला आहे, तो बरोबर आहे. ही कॉलेजेस कोण काढते, कोणासाठी कोण काढते, त्यासाठी अजूनही चर्चा करा, यातील ज्या तरतुदी आहेत, त्यावर मी बोलणार नाही. मी बोललो तर तुम्ही म्हणणार बिलाला विरोध केला आणि आता त्यातील तरतुदीच्या संदर्भात हे कसे काय बोलतात ? या बिलाचा ड्राफ्ट तयार करणारा चांगला अधिकारी असेलही, परंतु तो कॉपी करुन पास झालेला असावा. कारण यामध्ये उलटसुलट तरतुदी केलेल्या आहेत. या आपण वाचून पाहाव्यात. पहिल्या तरतुदीमध्ये म्हटलेले आहे ते शेवटी म्हटलेले नाही, दुसरी विपरीतच तरतुद केलेली आहे. कोर्टात प्रकरण गेले तर कोर्ट सांगेल की, मी कोणत्या कायद्यान्वये निकाल देऊ ? अशी परिस्थिती होईल. म्हणून हे विधेयक चुकीचे आहे. ज्या उद्देशाने हे विधेयक आणलेले आहे ते चुकीच्या हेतूने आणलेले आहे. ते चुकीच्या कारणामुळे आणलेले असल्यामुळे हे विधेयक समस्त सभागृहाने फेटाळावे, अशी मी सभागृहाला विनंती करतो आणि थांबतो धन्यवाद.

******

**महाराष्ट्र विधानपरिषद : दिवसाच्या कामकाजाचा क्रम**

**शनिवार, दिनांक २३ जुलै २००५**

**बाब क्रमांक पाच- शासकीय विधेयके**

ब) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचा प्रस्ताव (नियम १४९) अन्वये) :-

"सन २००४ चे वि.प.वि. क्रमांक २० - महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनिमन) विधेयक, २००४ हे विधेयक विधानसभेची सहमती घेऊन, दिनांक १८ डिसेंबर २००४ रोजी दोन्ही सभागृहाच्या १७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले होते. दरम्यानच्या काळात फेब्रुवारी, २००५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने छत्तीसगड राज्याच्या खाजगी विद्यापीठ कायद्यामधील काही तरतुदीवर आक्षेप घेऊन, हा कायदा रद्दबादल ठरविला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यिता विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २००४ मधील तरतुदीमध्ये महत्वपूर्ण बदल अपेक्षित आहे. तसेच समितीच्या सदस्यांनी विधेयकाच्या प्रारुपात बऱ्याच सुधारणा सुचविल्याने त्यांचा समावेश विधेयकात तातडीने करण्यासाठी व सदर विधेयक लवकरात लवकर अंमलात आणण्यासाठी नव्या स्वरुपातील विधेयक सभागृहासमोर आणले जाणार असल्याने सन २००४ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २० संयुक्त समितीकडून काढून घेऊन मागे घेण्यास अनुमती द्यावी."

# PENSION FUND REGULATORY AUTHORITY

## Resist This Retrograde Move Towards Privatisation Of Pensions

**W. R. VARADA RAJAN**

ON December 30,2004, the Government of India issued an ordinance paving the way for setting up of the Pension Fund Regulatory and Development Authority. It has now introduced a Bill to replace the Ordinance in Lok Sabha on March 21, 2005, amidst a protest walk out by the left parties.

THE NDA 'LEGACY'

This move by the present UPA government signifies that it has decided to go ahead with the establishing of a pension fund authority, in pursuit of the NDA government move to switch over to a defined contribution scheme for the employees recruited since January 2004. This departure from the earlier defined benefit scheme had met with opposition from not only the organisations of the central and state government employees but also the Central Trade Unions, right from the time of NDA dispensation.

The NDA regime had planned to tinker with whatever little social security pension protection is available in the country to at least the organised sector workers. It had religiously followed the prescriptions of the World Bank report titled "Averting the Old Age Crisis", which advocated 'pension sector reforms.' The thrust of the World Bank report was not to tackle the crisis faced by the elderly in their old age but to resolve the 'crisis' of the pension pay out burden of the governments world over, which have been operating pension schemes of different types. Almost all such schemes were 'defined benefit' schemes, operated on a 'Pay As You Go (PAYG)' basis.

The NDA regime had also commissioned the following three reports to 'dole' out 'pension sector reforms' prescriptions: 1) Project OASIS (expert committee) Report (December, 1999); 2) Insurance Regulatory and Development Authority (IRDA) Report on 'pensions reforms in the unorganised sector' (October 2001) and 3) Government of India High Level Group on New Pensions System (Bhattacharya) Report (February 2002).

The 'Project OASIS' Report of the Dave committee, set up by the ministry of social justice and empowerment, mooted this proposal for a separate pension authority for the first time. The tripartite Central Board of Trustees of the Employees Provident Fund had, in a special meeting held on February 8, 2000 under the chairmanship of the then labour minister, unanimously held: "the (said) report is investment centric and not social security or social insurance centric and contains a number of recommendations and suggestions, which are inconsistent with the ground reatity or practical considerations." The CBT was "unanimously of the opinion that the proposals in the report ... would seriously jeopardise the Safety and future savings of the workers as well as the whole concept of social security and social insurance."

In October 2001, the Insurance Regulatory and Development Authority (IRDA), set up in the wake of opening of the insurance sector to private and foreign players, came out with yet another report titled Pension Sector Reforms for Unorganised Sector. This report, inter alia, mooted proposals for a new pension fund regime accompanied by a self-serving recommendation to nominate the IRDA as pension regulator.

It is important to note that both the above reports espousing the need for a pension regulatory authority had framed their proposals on a 'voluntary' tier comprising individual retirement accounts. .

Later, however, the NDA regime decided to discontinue the defined benefit pension scheme applicable to the government employees and constituted a High Level Group on New Pensions System (headed by Shri Bhattacharya) to recommend a new 'contribution defined' pension scheme. The report of this group recommended a new pension scheme with contributions from the employees and the government for the new

## संघटनेचे ज्येष्ठ नेते बाबुराव साहेबराव उपाख्य डॅडी देशमुख यांच्या दुःखद निधनाबद्दल शोकप्रस्ताव

"शिक्षण क्षेत्रातील अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे, संघटनेचे जेष्ठ नेते अकोल्याचे माजी नगराध्यक्ष व अकोला येथील श्री. शिवाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य बाबुराव साहेबराव उपाख्य डॅडी देशमुख यांचे २१ जुलै २००५ रोजी मुंबई येथे सकाळी वयाच्या ७० व्या वर्षी अकस्मात निधन झाले. डॅडी देशमुख हे अकोला जिल्हा नुटाचे १९७७ पासून १९९९ पर्यंत प्रदिर्घ काळपर्यंत अध्यक्ष होते. अनेक वर्षे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या व नुटाच्या कार्यकारिणीचे ते सदस्य होते. डॅडी देशमुख यांचा जन्म अकोला जिल्ह्यातील कुरणखेड या गावी २७ डिसेंबर १९३५ रोजी झाला. आपल्या व्यावसायिक जिवनाची पायलट म्हणून सुरुवात करुन पुढे नायब तहसिलदार म्हणून त्यांनी काम केले. नागपूर विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात एम.ए.ची पदवी घेतल्यानंतर सुरुवातीला नागपूर येथे धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये व त्यानंतर १९६४ मध्ये ते अकोला येथील श्री.शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत झाले व १९८० मध्ये त्याच महाविद्यालयाचे प्राचार्य झाले. त्यांनी प्राचार्य पदावर १६ वर्षे काम केले. त्यांना १९८८ मध्ये महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविले. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रात अग्रणी असणाऱ्या डॅडी देशमुख यांनी १९८८ ते १९९१ या कालखंडात अकोला नगरपालिकेचे नगराध्यक्षपद भूषविले. त्यानंतर १९९२ पासून ते श्री.शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होते. याच दरम्यान नागपूर-अमरावती विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर त्यांनी आपले यशस्वी योगदान दिले. अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण व रंजन मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. १९९४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर ते निर्वाचित झाले होते. त्यांनी संत गाडगेबाबांच्या जीवनावर "देवकीनंदन गोपाला" या वऱ्हाडी भाषेतील चित्रपटाची निर्मिती केली. या चित्रपटासाठी त्यांना राज्य शासनाचा दादासाहेब फाळके पुरस्कार व त्यानंतर फिल्मफेअर पुरस्कार प्राप्त झाला होता. त्यानंतर त्यांनी आणखी एक चित्रपट 'राघुमैना' ची निर्मिती केली. महाराष्ट्र राज्य मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष, विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष म्हणून देखील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. एक अर्थतज्ञ म्हणून ते विदर्भाला सुपरिचित होते.

अकोल्यातील गंभीर पाणी समस्येसंदर्भात ते मागील वर्षभरापासून विविध आघाड्यांवर काम करीत होते. बाबुजी देशमुख वाचनालय या अकोल्यातील सर्वात जुन्या ग्रंथालयाचे डॅडी देशमुख अध्यक्ष होते. नुटा संघटनेच्या बांधणीतील त्यांचा सहभाग आणि संघटनेतील सदस्यांना सक्रीय करण्यात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. विदर्भ विकास प्रबोधनीचे ते सक्रीय नेते होते. डॅडी देशमुख यांच्या निधनाने सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात अष्टपैलू व्यक्तिमत्वाने परिचित असणारा, एक लोकप्रिय नेता, शैक्षणिक संस्थाच्या विकासासाठी काम करणारा उत्तम प्रशासक, व्यवस्थापक, विद्यापीठाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक जीवनात दृष्टी लाभलेला व विद्यापीठाच्या विकासात योगदान देणारा कर्तृत्ववान नेता, नुटा संघटनेमध्ये समरसतेने व निष्ठेने कार्य करणारा एक लढवय्या आम्ही गमावलेला आहे. प्राचार्य डॅडी देशमुख यांच्या कुटुंबीयावर ओढवलेल्या दुःखद प्रसंगामध्ये ही सभा सहभागी आहे. त्यांच्या कुटुंबियावर ओढवलेले दुःख सहन करण्याची शक्ती त्यांना प्राप्त व्हावी अशी प्रार्थना ही सभा करीत आहे."

recruits in government service. The NDA regime introduced a new scheme effective from January 1, 2004, together with setting up of an interim pension fund authority.

Even the Bhattacharya Committee, it is to be noted, did not recommend only a 'defined contribution' scheme, which is the case with the New Pension System. It recommended a hybrid DB/DC or mixed scheme. It recommended a mandatory first tier with contributions from the employee and matching contribution from the government at 10 per cent of pay and DA. It also prescribed a voluntary second tier with a minimum contribution of 2 per cent but without any upper limit. Here again, the government was required to match the contribution by the individual employee up to 5 per cent limit. The report also provided: 'The first tier Pension will be defined benefit at 50 percent of the average emoluments over the last 36 months of the working career of the employee. The minimum number of years of qualifying service for eligibility to pension would be 20 years and pension will be paid on superannuation at the age of 60 years. Full pension shall be payable for a qualifying service of 33 years for a person superannuating at the age of 60 years."

NEW PENSION SYSTEM

However, the NDA government, while notifying the New Pension System on December 22, 2003 and effective from January 1,2004, did not conform to the recommendations of the Bhattacharya Committee even. The notification proposed:

Defined contribution based mandatory tier I scheme where the new entrant to the central government will make a monthly contribution of 10 per cent of the salary and dearness allowance (DA), which will be matched by the central government.

An optional tier II withdrawable account in the absence of the facility of General Provident Fund (GPF). The government is to make no contribution to this account. (No details of how and where the contributions to this account will be invested have been spell out.)

The new system to is have a central record keeping and accounting infrastructure and several fund managers to offer three options. Under option' A'. investment will be predominantly in fixed income instruments and some investment in equity. Under option 'B', there will be greater investment in equity. Option 'C' implies equal investment in fixed income and equity instruments.

At the time of exit, it is mandatory for the employees to invest 40 per cent of 'pension wealth' is to purchase an annuity to provide for lifetime pension for the employee and his dependant parents and spouse. Remaining 60 per cent of 'pension wealth' to be paid in lump sum at the time of exit.

The Pension Fund Regulatory and Development Authority will regulate and develop the pension fund market.

UPA GOVT MOVE

This was incorporated by the UPA government in the Economic Survey 2003 - 04 and formed part of the Budget speech of the finance minister last year.

The Pension Fund Regulatory And Development Authority (PFRDA) Ordinance/Bill, which the UPA regime seeks to actively pursue now, faithfully adheres to the above parameters.

It defines the "New Pension System" as "the contributory pension system referred to in Section 20 whereby contributions from a subscriber are collected in an individual pension account using points of presence and a central record keeping agency and accumulated by pension funds for pay offs as specified by regulations."

Section 20, inter-alia, provides : "there shall not be any implicit or explicit assurance of benefits except market based guarantee mechanism to be purchased by the subscriber' and 'a subscriber shall not exit from the New Pension system except as specified by the central government by notification." The latter implies that even upon exit form government service, the subscriber will not be allowed to exit from the New Pension System before attaining the age of 60 years.

Again, the statement of objects and reasons appended to the Bill states, "The NPS is mandatory for new recruits to the Central Government services (except to the armed forces in the first stage)". This has ominous portents in view of the (NDA) government having included in the terms of reference to the Bhattacharya Committee to 'explore the option of moving existing employees to a contributory system'. Even the decision not to make it mandatory to the new recruits to the armed forces is a limited period option confined to the first stage. The Dave Committee and the IRDA reports had already mooted proposals for migration of the Public Provident Fund (PPF) subscribers, employees of the Exempted Establishments under the EPF Act etc. to the Individual Retirement Account concept. The Dave Committee, IRDA and Bhattacharya Committee reports have also extensively commented on carrying out reforms in the Employees Provident fund Organisation as well, which all are pointers to a total transition, albeit in phases, to a defined contribution individual retirement account plan of social security.

TUs NOT CONSULTED

The UPA government had, in its National Common Minimum Programme, committed firmly 'that labour-management relations in our country must be marked by consultations, cooperation and consensus, not confrontation' and to actively pursue 'tripartite consultations with trade unions and industry on all proposals concerning them'. The present ordinance on

## अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित न करणे

*दुसरे अधिवेशन, २००५ : शनिवार, दिनांक २३ जुलै, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*

**प्रा.बी.टी.देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.अैनापूरे,** वि.प.स. यांनी म.वि.प. नियम १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना :-

"एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुद्धा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होणे, अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्यादरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर करणे, या निवेदनाच्या सोबत उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतिसुद्धा जोडणे, ही पदे अनारक्षित करण्यास होत असलेल्या विलंबामुळे अनेक वर्षाची सेवा झालेल्या या अधिव्याख्यात्यांना मा. उच्च न्यायालयाने तसे आदेश दिल्यानंतर सुद्धा इतर अनुषंगिक लाभापासून वंचित ठेवणे, त्यामुळे या अधिव्याख्यात्यांमध्ये निर्माण झालेला तिव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांनी करावयाचे निवेदन**

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अधिव्याख्यात्यांनी पदे अनारक्षित करण्याबाबत दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भात नागपूर विद्यापीठ शिक्षक संघटनेचे दि. ३०.५.२००५ रोजीचे निवेदन प्राप्त करुन घेण्यात आले आहे.

**मा. खंडपीठाच्या आदेशानुसार महाविद्यालयाने पद अनारक्षित करण्याबाबतचा सुधारित परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठामार्फत शासनाकडे सादर करावयाचा असून शासनाने ते पद अनारक्षित करण्याची कार्यवाही करावयाची आहे.** त्यानुसार विद्यापीठांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दि. ५.१२.९४ च्या शासन निर्णयातील अटींनुसार परिपूर्ण नसल्यामुळे त्यावर मा. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार कार्यवाही करणे शक्य झालेले नाही. या परिस्थितीत, सुधारित परिपूर्ण प्रस्ताव पाठविण्याबाबत विद्यापीठांना कळविले आहे.

अशासकीय महाविद्यालयातील मागासवर्गीयांसाठी आरक्षित असलेली पदे अनारक्षित करण्यासंदर्भात शासनाने निर्गमित कलेल्या वरील नमूद आदेशानुसार आरक्षित पदावर मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध होण्यासाठी वर्तमानपत्रात ५ वर्षे जाहिरात देणे आवश्यक आहे. त्याचवेळी विविध सेवायोजन कार्यालयाकडून मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करणे जरुरीचे आहे. तरीही मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्याने सहाव्या वर्षी सदर पद अदलाबदलीने भरण्याची कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे. एवढा प्रयत्न करुनही मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदे अनारक्षित करण्यासाठी प्रस्ताव विद्यापीठाकडून शासनाकडे प्राप्त होणे आवश्यक आहे. **शासनस्तरावर प्रस्तावाची छाननी करुन सामान्य प्रशासन विभागाच्या सल्ल्याने आणि शासनाच्या मान्यतेने पद अनारक्षित करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येते.**

पदे अनारक्षित करण्याबाबत नागपूर व अमरावती विद्यापीठांतर्गत महाविद्यालयाचे विद्यापीठाने पाठविलेले प्रस्ताव अपूर्ण असल्यामुळे त्यावर उपरोक्त शासन निर्णय दि. ५.१२.९४ नुसार कार्यवाही करता आलेली नाही.

PFRDA - and the subsequent Bill - has been resorted to without any consultations with the trade unions, in a blatant violation of this commitment.

It is reportedly argued that the New Pension System concerns only the government employees and therefore there is no need to involve the central trade unions. It is also being started that the New Pension System had been discussed in the Joint Consultative Machinery (JCM) for the Central government employees.

Both these contentions are questionable. All the three reports (cited above) on Pension Sector Reforms have in different ways advocated the switch over to "Individual Retirement Account' system of social security for all segments of the working force in India. So, the threat perceptions emanating from the move towards a PFRDA looms large before all sections of workers in the country and the central trade unions have a vital stake in this regard.

Even in the JCM for the central government employees, the report of the Bhattacharya Committee was never placed for discussion. It is understood that the report itself had not been made public. In the meeting of the Standing Committee of the JCM held on January 30, 2004 itself the staff side raised this issue stating that the provisions of the new contributory pension scheme was a matter of concern to the central government employees.

Again, the staff side had proposed an item captioned 'withdraw new contributory pension scheme' (Item No. 17) for discussion in the national Council meeting of the JCM slated for April 16, 2005.

Another important point to be noted here is that the vast sections of the employees of the state governments, who also are likely to be impacted by the New Pension System, were at no stage involved in any consultation process.

OMINOUS PORTENTS

The move towards setting up of a Pension Fund Regulatory Authority has dangerous implications. It is intended to flag off retrograde move towards privatisation, which has three main thrust areas viz. I) Switching over to the "Defined contributions" concept from that of "Defined Benefits" concept; ii) Shifting to personal and social insurance schemes from social assistance schemes and iii) Diverting the social security funds from the debt (government and other securities) market to equity (share) market. These recipes are also brandied as moves aimed at "identifying the appropriate mix of public sector-private sector participation in social security." This is a totally erroneous and dangerous move, as the private sector seeks to participate in social security only eyeing the huge corpus of private pension funds that could be generated, which could be diverted to the equity market in the country.

This is also accompanied by two other retrograde moves. One - a change in the tax treatment for contributions to the pension scheme, shifting from the EEE formula, where the moneys were exempt from taxation at all three stages of contribution, accruals and withdrawal (of terminal benefits), to the EET formula where the terminal benefits will be taxed at applicable rates in the year of receipt. The budget 2004- 05 carried this announcement. The Budget 2005 - 06 has envisioned opening up the pension sector for Foreign Direct Investments (FDI), which means a green signal for foreign corporates to garner the huge pension funds for their speculative hunt for profits.

DEFEAT THE MOVE

It is therefore imperative for the entire trade union movement to stoutly oppose the Pension Fund Regulatory And Development Authority (PFRDA) Ordinance/Bill in totality and resist its legislation. The walk out from Lok Sabha by the left parties, signaling their opposition to the PFRDA at the introductory stage of the relevant bill, has set the stage for a countrywide resistance struggle by all sections of workers.

The present fiscal related problem cited by the government for the unsustainability of the present Pay As You Go (PAYG) pension scheme is of its own making. The present pension scheme was introduced in the past as a substitute to the then existing Contributory Provident Fund Scheme, to which the central government had been making a matching contribution. It was replaced the General Provident Fund with only the contribution by the employees and in lieu of its matching contribution, the central government brought in place the present pension scheme. Even the Fifth Central Pay Commission had recommended retention of the present pension scheme. The government, over the past years, merrily used up the funds, which were due on the erstwhile contributory provident fund scheme .and failed to make any provision for an appropriate funding arrangement in place for meeting the pension liability towards its employees. For this the employees cannot be penalised as is being resorted to now.

The trade union movement must unitedly demand the UPA government to drop this retrograde move and to address the basic and more fundamental issues related to social security or the widely talked about 'social safety net', for the entire work force in the country, including those in vast the unorganized sector.

******

## स्थाननिश्चितीबाबत सहसंचालक उच्च शिक्षण यांचे स्तरावर वेळेवर निर्णय होण्याबाबत

*दुसरे अधिवेशन, २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*

*शुक्रवार, दिनांक १५ जुलै, २००५*

**(६१) * ५९५८ श्री. नानासाहेब बोरस्ते , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. ऐनापूरे :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संलग्न महाविद्यालये किंवा विद्यापीठातून काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ किंवा निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चितीच्या संदर्भात काही अनियमितता झालेली असल्यास ती बाब १५ दिवसाच्या आत संचालकांच्या लक्षात आणून द्यावी व कोणत्याही परिस्थितीत याबाबतचा निर्णय १५ दिवसाच्या आत करावा असे सक्त आदेश उच्च शिक्षण सहसंचालकांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) खरे असल्यास, ३१ मार्च, २००५ पासून आतापावेतो विभागवार उच्च शिक्षण सहसंचालकांनी एकूण किती प्रकरणी वेळेच्या आत निर्णय घेतले,

(३) किती प्रकरणी विलंबाने निर्णय घेण्यात आले,

(४) विलंबाने निर्णय होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) होय.

(२) विभागवार घेतलेले निर्णय -

| | | |
|---|---|---|
| पुणे विभाग | - | ६४ |
| मुंबई विभाग | - | २२७ |
| कोल्हापूर विभाग | - | ४९२ |
| जळगाव विभाग | - | ६१३ |
| अमरावती विभाग | - | १०२ |
| नागपूर विभाग | - | ८१ |
| नांदेड विभाग | - | २० |
| औरंगाबाद | - | १४ |
| एकूण | - | १६१३ |

(३) कोणत्याही प्रकरणात विलंबाने निर्णय घेण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## UNIVERSITY GRANTS COMMISSION

BAHADUR SHAH ZAFAR MARG : NEW DELHI-110 002

F-2/2001 (PS) : 1st October, 2003

Dr. D. Aravazhirissappanne
President, Forum of Govt. College Teachers Association
Pondicherry-605 008.

Sir,

With reference to your letter dated 17-4-2003, I am directed to inform you as under :

1. The benefit of extended period for completing Refresher Course upto 31.12.2004 is for all Lecturer and Lecturer (Senior Scale) who are eligible/will eligible upto 31.12.2004 for placement/ promotion fulfilling all other condition under Career Advancement Scheme.

2. A lecturer who entered the service with Ph.D and availed 4 advance Increments at the time of joining is eligible for another 2 advance Increments at the time of promotion to the post of Reader.

3. The benefit in service upto a maximum of 3 years should be provided for the teachers who have acquired Ph.D degree at the time of entry, so that almost all teachers get full retirement benefits which are available after 33 years of service subject other to the overall age of superannuation. Other condition with respect of superannuation benefits is given as per Central / State Government rules.

Yours faithfully
(Dr. (Mrs.) H. K. Chauhan)
Senior Research Office

# DISTRICT UNITS OF NUTA : ELECTION NOTICE

From.
**Dr. E.H.Kathale,** **Nagpur**
Secretary, NUTA. 7th August 2005

To,
All the members of NUTA.

**Subject :** Meeting Notice for the Elections of District Units.

Dear Members,

I have the honour to convene the meetings of the different District-Units to transact the following business on the day, date, time and place mentioned in the Table below.

## AGENDA

### ITEM NO. 1

### *ELECTION OF DISTRICT UNIT OFFICE BEARERS.*

To elect the following office bearers of the District Unit of NUTA from amongst the members of the concerned District as per para 6 of the District Unit Byelaws. :- (Circulated on page 66 of 2005 NUTA Bulletin)

i) One President,
ii) One Vice President,
iii) One Secretary,
iv) One Joint Secretary and
v) Three members

### ITEM NO. 2 :

### *ORGANISATIONAL MATTERS*

**Matters of Agitation at all India level and state level**

All members whose names have been included in the NUTA life Members Register on the date of the posting of this Bulletin shall be eligible to attend and participate in the proceedings of the meeting. I therefore request all the members of the respective districts to kindly make it convenient to attend the meetings.

Yours faithfully,
s/d **E.H.Kathale**
Secretary, NUTA

## TABLE

**Giving Detatils of the Programme of District - Units Election Meetings**

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | बैठकीचा दिवस व दिनांक | बैठकीची वेळ | बैठकीचे ठिकाण | निवडणूक संचालनार्थ निरिक्षक |
|---|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. वाशिम | रविवार, ०४.०९.२००५ | सकाळी ९.०० वा. | राजस्थान आर्यन कॉलेज, वाशिम. | प्रा.ए.जी.सोमवंशी व प्रा.सुशिल काळमेघ<br>प्रा.अनिल ढगे व प्रा.एम.डी.मिसाळ |
| २. अकोला | रविवार, ०४.०९.२००५ | दुपारी १.०० वा. | आर.एल.टी.सायन्स कॉलेज अकोला. | प्रा.एस.ए.तिवारी व प्रा.प्रविण रघुवंशी<br>प्रा.व्ही.बी.ढोणे व प्रा.एस्.एस्.हजारे |
| ३. बुलढाणा | रविवार, ०४.०९.२००५ | दुपारी ५.०० वा. | श्री. शिवाजी महाविद्यालय, बुलढाणा. | प्रा.सुभाष गवई व प्रा. मोहन खेरडे<br>प्रा.अनिल ढगे व प्रा.एम.डी.मिसाळ |
| ४. यवतमाळ | शनिवार, १०.०९.२००५ | दुपारी ३.०० वा. | अण्णासाहेब खडसे शिक्षण महाविद्यालय, यवतमाळ. | प्रा.एस.ए.तिवारी व प्रा.प्रविण रघुवंशी<br>प्रा.डी.आर.सातपुते व प्रा.एम.डी.मिसाळ |
| ५. अमरावती | रविवार, ११.०९.२००५ | दुपारी ३.०० वा. | भारतीय महाविद्यालय, अमरावती. | प्रा.एस.टी.सांगळे व प्रा. ढाले<br>प्रा.डी.आर.सातपुते व प्रा.के. एम. वाघ |
| ६. भंडारा | रविवार, १८.०९.२००५ | सकाळी ११.३० वा. | जे.एम. पटेल महाविद्यालय, भंडारा | प्रा.अनिल ढगे व प्रा.एम.डी.मिसाळ<br>प्रा.के. एम. वाघ व प्रा.सुशिल काळमेघ |
| ७. गोंदिया | रविवार, १८.०९.२००५ | दुपारी ५.०० वा. | डी.बी.सायन्स कॉलेज, गोंदिया. | प्रा.व्ही.बी.ढोणे व प्रा.एस्.एस्.हजारे<br>प्रा.ए.जी.सोमवंशी व डॉ.आर.बी.गोलाईत |
| ८. चंद्रपूर | शनिवार, २४.०९.२००५ | सकाळी ११.०० वा. | एस.पी. कॉलेज, चंद्रपूर. | प्रा.अनिल ढगे व प्रा.एम.डी.मिसाळ<br>प्रा.प्रविण रघुवंशी व प्रा. मोहन खेरडे |
| ९. गडचिरोली | शनिवार, २४.०९.२००५ | दुपारी ५.०० वा. | शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली. | प्रा.व्ही.बी.ढोणे व प्रा.एस्.एस्.हजारे<br>प्रा.सुभाष गवई व प्रा. अनिल ढगे |
| १०. वर्धा | रविवार, २५.०९.२००५ | सकाळी ९.०० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. | प्रा.अनिल ढगे व प्रा.एम.डी.मिसाळ<br>प्रा.प्रविण रघुवंशी व प्रा. मोहन खेरडे |
| ११. नागपूर शहर | रविवार, २५.०९.२००५ | दुपारी २.०० वा. | प्रेरणा कॉलेज ऑफ कॉमर्स रेशिमबाग चौक, नागपूर. | प्रा.व्ही.बी.ढोणे व डॉ.आर.बी.गोलाईत<br>प्रा.सुभाष गवई व प्रा.प्रविण रघुवंशी |
| १२. नागपूर ग्रामिण | रविवार, २५.०९.२००५ | दुपारी ३.०० वा. | प्रेरणा कॉलेज ऑफ कॉमर्स रेशिमबाग चौक, नागपूर. | प्रा.अनिल ढगे व प्रा.एम.डी.मिसाळ<br>प्रा.प्रविण रघुवंशी व प्रा. मोहन खेरडे |

# डॅडी देशमुख नावाचे आभाळ

**नारायण कुळकर्णी कवठेकर**

*संघटनेचे ज्येष्ठ नेते, अकोल्याचे माजी नगराध्यक्ष व अकोल्याच्या श्री.शिवाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री.बी.एस.उपाख्य डॅडी देशमुख यांनी लौकिक जगाचा निरोप घेतला या गोष्टीला २ ऑगस्ट २००५ रोजी तेरा दिवस पूर्ण झालेत. त्यानिमित्त ज्येष्ठ कवी व डॅडींचे सहकारी, नारायण कुळकर्णी कवठेकर यांनी त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्वाचा वेध घेणारे लहानसे पण देखणे शब्दशिल्प उपरोक्त मथळ्याच्या लेखातून उभे केलेले आहे. 'लोकसत्ता'च्या सौजन्याने व कवठेकरांच्या परवानगीने तो लेख प्रसृत करित आहोत. -* ***संपादक***

**प्रसंग पहिला**

काळ : वीस पंचवीस वर्षापूर्वीचा.

स्थळ :- शिवाजी महाविद्यालय, अकोला.

दिवस :- विद्यार्थ्यांच्या निवडणुकीतील मतदानाचा.

प्रसंग :- विद्यार्थी संघटनामधील कार्यकर्त्यांच्या हमरीतुमरीचा. एक दादा टाईप विद्यार्थी कोणाचेच ऐकत नाही. गोंधळ ऐकून उपप्राचार्य दाणदाण पायऱ्या चढत पहिल्या मजल्यावरील त्या रुममध्ये येतात. त्या विद्यार्थ्याचे मानगूट पकडतात. आपल्या ढाई किलोच्या वजनदार हाताची मूठ वळून, पाठीत एक दणका देतात. मग दुसरा दणका, दादा खाली पडतो. उपप्राचार्यांना खूप वाकावं लागतं तरी ते दोन दणके ठेवूनच देतात. दादा आता भयभीत झालेला असतो. कसाबसा मानगूट सोडून तो जी धूम ठोकतो तो एकदम फाटकाबाहेर...

**प्रसंग दुसरा**

स्थळ : तेच. रुम तळमजल्यावरची. फरक इतकाच की वरील प्रसंगातील उपप्राचार्य आता प्राचार्य झालेले असतात. पाठक मॅडमच्या वर्गात एक टारगट विद्यार्थी फळ्यावर वाईटसाईट लिहून ठेवत असे. समजावले अनेकदा पण, ऐकत नसे. मॅडमनी तक्रार केली. प्राचार्य थेट वर्गात गेले. त्या विद्यार्थ्याला पुढे बोलावले. त्या टारगेटाला वाटले आता प्राचार्य रागावणार. ते ऐकून आपण गालात हसणार, वर्गातली पोरे फिदीफिदी हसणार, नेहमीची गंमत होईल. पण, प्राचार्यांनी शब्दही उच्चारला नाही. ढिल्या अवस्थेत उभ्या असलेल्या पोराच्या थोबाडावर प्राचार्यांच्या ढाई किलोच्या तगड्या हाताच्या रुंद तळव्याची थापड इतक्या जोरात पडली की पोरगा भेलकांडत वर्गाच्या दाराबाहेरील एका वाळूच्या ढिगाऱ्यावर जाऊन पडला. तिरीमरीतच धूम ठोकली ती एकदम फाटकाच्या बाहेर....

वरील दोन घटनांमधील शिक्षा देणारे गृहस्थ म्हणजे बाबूराव साहेबराव ऊर्फ डॅडी देशमुख. ज्या काळात विद्यार्थ्यांवर जोराने ओरडणे हाही गुन्हा ठरू शकतो, पालक भांडायला येऊ शकतात, विद्यार्थी संघटना संप-बंद पुकारू शकतात, त्या काळात त्यांना ठोकून काढण्याचा कार्यक्रम ते अधूनमधून करीत. कुठेही हाक नाही, बोंब नाही. त्या विद्यार्थ्यांना पालक वा संघटना, कोणाचा पाठिंबा मिळतच नसे. उलट बाकीचे विद्यार्थी 'डॅडी सर, तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशा घोषणा द्यायला तयार. कारण डॅडी सतत विद्यार्थ्यांचीच बाजू घेणारे, त्यांना समजून घेणारे, त्यांच्यासाठी क्रीडा, कला, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्र उपलब्ध करुन देणारे, निष्काळजी विद्यार्थ्यांनी उशिरा भरलेले परीक्षेचे फॉर्म, तारीख उलटल्यानंतरही स्वतः विद्यापीठात नेऊन देणारे, विद्यार्थ्यांच्या मागणीवरून गॅदरिंग किंवा सांस्कृतिक कार्यक्रमासाठी डॉ.श्रीराम लागू, निळू फुले, शरद पवार, नाना पाटेकर, राजदत्त, विलासराव देशमुख, सुनिल दत्त यांना घेऊन येणारे! एकदा एका संस्थाध्यक्षाने एका प्राध्यापकाला पुढे करुन डॅडींचे प्राचार्यपद हिसकण्याचा प्रयत्न केला, तेव्हा विद्यार्थ्यांच्या संतापाचा अनुभव ज्यांनी ज्यांनी घेतला ते सर्वजण, जन्मभर ती दाहकता विसरणार नाहीत आणि परवाची गोष्ट ज्या माणसाला डॅडींनी घरातल्या कुटुंबियांप्रमाणे वागवले, खरे तर जगवले, त्यांच्यावरील मेमो, नोटीस यांचे ढग दूर केले, ज्याला आपल्या चित्रपटाची अनेक कामे देऊन महाराष्ट्रभरासाठी प्रसिद्धीची दारे उघडून दिली, तोच माणूस जेव्हा डॅडींच्याच पदावर गेला तेव्हा घाणेरड्या शब्दांत डॅडींचा उल्लेख करू लागला तेव्हा डॅडींची प्रतिक्रिया एकच होती. अनुल्लेखाची किंवा दुर्लक्षाची! पण, परवा त्याच लोक, कवीला डॅडी गेल्यानंतर दोन दिवस डॅडींच्या घरी व अंत्ययात्रेत फिरणेही कठीण झाले. डॅडींच्या कुटुंबियांचा आणि स्नेहीजनांचा कोप सहन करावा लागू नये म्हणू दोन दिवस तोंड लपवत कडेकडेने फिरावे लागले. अशी अनेक कृतघ्न माणसे डॅडींनी पाहिली पण, चिडणे नाही, तोंडी अपशब्द नाही, कोणाचा दुस्वास नाही. डॅडी, शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य होते. परवाच्या निवडणुकीत उभे राहले पण, अशा कृतघ्न माणसांनी पाठीत खंजीर खुपसले. डॅडी पडले पण, डॅडींनी संस्थेवर राग काढला नाही. कारण डॅडींची बांधिलकी पदाशी नव्हती. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांच्या कार्याशी आणि विचारांशी होती. म्हणून ते संस्थेशी एकनिष्ठ राहिले. पराभवानंतरही, व्यक्तीपेक्षा संस्था मोठी, आपहितापेक्षा परहित मोठे या तत्त्वाशी बांधील राहिले. आताचे अध्यक्ष वसंतराव धोत्रे यांनी जबाबदारीची अनेक कामे सोपविली. डॅडींनी ती यशस्वीपणे पार पाडली. परवाच ते अकोल्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजवरचे संकट दूर करण्यासाठी दिल्लीला गेले आणि काम फत्ते करुन आले. हे सर्व केव्हा तर वयाच्या सत्तराव्या वर्षी. गुडघेदुखीचा प्रचंड त्रास होत असतांना ते परवा मुंबईला गेले. संस्थेची सरकारजमा होऊ पाहणारी पंचवीस एकर जमीन मुख्यमंत्र्यांकडून पुन्हा संस्थेसाठी मिळविली. शासनापुढे अकोल्याचा पाणीपुरवठा नियमित आणि सुरळीत व्हावा यासाठी आराखडा सादर केला. डॅडी दोन तीन वर्षे अकोल्याचे नगराध्यक्ष होते, तेव्हाचे त्यांना आलेले अनुभव काही उत्साहवर्धक नव्हते पण, यावर्षी अकोल्यावर जलसंकट ओढवले आणि डॅडींनी, त्यांचे परममित्र आणि अभिन्नजीव सहकारी आमदार बी.टी.देशमुख यांच्या निधीतून लाखो रुपये आणले आणि बोअर, हायड्रंट, नळ यांची खैरात अकोलेकरांवर केली. आयुष्याचा अंतिम श्वास घेतांनाही त्यांच्या मनात कळकळ आणि ब्रीफकेसमध्ये कागदपत्रे होती ती समाजहितासंबंधीची! सतत 'कार्यरत' राहणे हा डॅडींचा स्वभाव होता. डॅडींचे बोलावणे आले आणि मी गेलो आणि डॅडी प्रसन्न मूडमध्ये दिसले आणि त्यांनी गोड आवाजात 'आपण असे करू...' असे म्हटले की माझ्या पोटात गोळाच उठत असे, की आता डॅडींना नवीन काहीतरी कल्पना किंवा उपक्रम किंवा कार्यक्रम सुचला आहे आणि आता किमान महिनाभर तरी आपल्याला विश्रांती नाही. 'आपण' असे म्हणून डॅडी आम्हाला त्यांच्या बरोबरीने सामावून घेत असत. अन् मग कामात गुंतून गेलो की झपाटलेपणा म्हणजे काय हे कळत असे आणि डॅडींनी एखाद्यावर विश्वास टाकला की तो माणूस एकदम जबाबदार आणि आनंदी होत असे. डॅडींचे काही ना काही सुरूच असायचे.

- आपण असे करू की, अमरावती विद्यापीठाचा युवक महोत्सव अकोल्यात घेऊ या....

- आपण असे करू यावर्षी, भारतातील सर्व विद्यापीठांचा नॅशनल फेस्टीवल अकोल्यात घेऊ.

- आपण असे करू की, किशोर मोरे पुण्याला राहायला चाललेत. आपण त्यांना छान निरोप देऊ या. भीमरावला बोलावू, दत्ताजींना बोलावू..

- आपण असे करू की, आपल्या परिसरातले विद्यार्थी, एमपीएससी, यूपीएससीच्या परीक्षा देतात. त्यांना पुण्याला जाणे खर्चाचे होते. आपण अविनाश धर्माधिकारींनाच येथे बोलावू. दोन दिवसांचे शिबिर घेऊ...

- आपण असे करू की, रिपब्लिकन फेडरेशनच्या विद्यार्थ्यांची मागणी आहे तर एक व्याख्यानमाला संध्याकाळच्या वेळी कॉलेजमध्येच आयोजित करु....

- आपण असे करू की, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अधिवेशन आपल्या कॉलेजमध्येच घेऊ...

- आपण असे करू की, सामाजिक कृतज्ञता निधीचा उपक्रम चांगला आहे. 'लग्नाची बेडी' हे नाटकही चांगले आहे. आपण आयोजन करू आणि लाख दोन लाख त्यांना गोळा करून देऊ....

'आपण असे करू' हे शब्द डॅडींना दहा जन्म मिळाले तरी ते म्हणतच राहतील. दुसऱ्यांसाठी काही केलं की डॅडींना समाधान आणि 'हे श्रेय माझे नाही, माझ्या सहकाऱ्यांचे आहे' असे जेव्हा डॅडी पुन्हा पुन्हा जाहीर व्यासपीठावरून सांगायचे तेव्हा त्या बोलण्यात अजिबात मानभावीपणा

# समर्पित जीवनाचा अंतिम प्रवास

**प्रा.बी.टी.देशमुख,** *विधानपरिषद सदस्य*

*डॅडी देशमुख या झंझावाताने आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी वाहून घेतले होते. आयुष्याच्या शेवटच्या घटकेपर्यंत लोकसमस्या सोडविण्यासाठी त्यांनी केलेली धडपड, प्रयत्नांची पराकाष्ठा नमूद असलेला डॅडी देशमुख यांच्या लौकिक जीवनाच्या अंतिम प्रवासातील शेवटच्या दोन दिवसातील घटनाक्रमांचा आढावा नमूद असलेला प्रा.बी.टी.देशमुख यांचा हा लेख* – ***संपादक***

"भाऊ! मी अकोल्याहून डॅडी बोलतो. १९ व २० जुलैला दोन महत्त्वाच्या कामासाठी मी मुंबईला येत आहे. सध्या अधिवेशन सुरू असल्यामुळे तुम्ही मुंबईलाच आहात ना? की इकडे येणार आहात?" मुंबईला येण्याच्या दोन तीन दिवस अगोदर फोन वरून डॅडींनी विचारणा केली. "मी मुंबईलाच आहे. अधिवेशनाच्या गडबडीत प्रत्यक्ष मुंबईला येण्यासारख काय काम काढल आहे?" अशी मी फोनवरूनच विचारणा केली. "एक म्हणजे शिवाजी शिक्षण संस्थेच्या राजेंद्र गार्डनच्या जागेच काम आहे. ते तुम्हाला ठाऊकच आहे. मुख्यमंत्र्यांची वेळ घेतलेली आहे. त्यांच्याकडे १९ तारखेला दुपारी बैठक आहे. दुसरं म्हणजे "अकोला शहराचा पाणीपुरवठा, मोर्णेतुन वाहून जाणारे पाणी, वर सुरू असलेल्या धरणांचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी पुरेसा निधी न मिळणे" या विषयावर राज्यमंत्री डॉ.सुनिल देशमुख यांच्याकडे २० जुलै रोजी दुपारी ४ वाजता एक बैठक बोलाविली आहे. बैठकीचे निमंत्रण तुम्हाला येईलच. या दोनही बैठकांना तुम्ही सुद्धा उपस्थित रहावयाचे आहे." मी 'होय' म्हणालो व फोनवरील बोलणे संपले.

२. ठरल्याप्रमाणे डॅडी हे शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री. दिलीपबाबू इंगोले व सचिव श्री.सुमंतराव बोंडे यांच्यासह मंगळवार, दिनांक १९ जुलै रोजी मोटारीने मुंबईला आले. नेहमीप्रमाणे डॅडींचा मुक्काम माझ्याकडे व श्री.इंगोले व बोंडे यांचा मुक्काम श्री. वसंतराव खोटरे यांच्याकडे.

३. शिक्षण महर्षी डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी स्वतः खपून त्यावेळच्या मध्यप्रदेश शासनाकडून अमरावती नझुल शीट नं. २० प्लॉट क्रमांक ४ वरील एकूण ६१७५० चौरस मीटर क्षेत्रफळाची जागा मुलांच्या कृषी शिक्षणासाठी एक रुपया नाममात्र वार्षिक आकारावर मिळविली होती. 'राजेंद्र गार्डन' या नावाने ही जागा ओळखली जाते. भूतपूर्व मध्यप्रदेश शासनाचा हा आदेश ४ एप्रिल १९५३ रोजीचा आहे. तेव्हापासून मुलांच्या कृषिशिक्षणासाठी या जागेचा वापर सुरू आहे. आजही कृषी विद्यापीठाशी संलग्नित व्दिवार्षिक कृषी विज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या शिक्षण-प्रशिक्षणासाठी या जागेचा वापर होत आहे.

४. आर.टी.ओ.च्या बाजूने कमिशनर कार्यालयाकडे जातांना डाव्या बाजूला असलेल्या 'ऑफीसर्स क्लबच्या' मागच्या बाजूला लागूनच हा राजेंद्र गार्डन आहे. 'ऑफीसर्स क्लबचा' पंचतारांकित विस्तार करण्याची कल्पना कोण्यातरी बड्या अधिकाऱ्याच्या डोक्यात घुसली आणि १९.११.२००१ रोजी अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी राजेंद्र गार्डनची जागा सरकारजमा करण्याचे आदेश काढले. असा आदेश काढण्यासाठी देण्यात आलेली कारणे 'हास्यास्पद व पोरकट' या मथळ्याखाली मोडणारी होती. "संस्थेने त्याठिकाणी पोहण्याचे टाके बांधले आहे व हा गैरवापर आहे" असे एक हास्यास्पद कारण त्यात दिले होते. वस्तुतः १९५३ च्या पूर्वीच्या "सरकारी बगिचा"मध्ये हे लहानसे पोहण्याचे टाके होते. ही जमीन संस्थेकडे त्या टाक्यासह आली. संस्थेने ते जसेच्या तसे ठेवले. श्रद्धानंद बोर्डिंगमध्ये राहणारे शिवाजी हायस्कूल मेन ब्रँचचे आम्ही अनेक विद्यार्थी त्याकाळी त्या टाक्यावर पोहण्यासाठी जात असू. १९५१ च्या सरकारी बगिच्यात ते टाके होते, हे २००१ च्या कलेक्टरला कोणी सांगावे? व कसे सांगावे? शिवाय विचारले तर सांगता येईल. इतर कारणेसुद्धा तशीच पोरकट होती.

५. मार्च २००२ मधील एका दिवशी संस्थेचे अध्यक्ष श्री.वसंतरावजी धोत्रे, उपाध्यक्ष श्री.दिलीपबाबू इंगोले व कार्यकारिणी सदस्य श्री.सुमंतराव देशमुख हे मंत्रालयात जाण्याच्या तयारीने मॅजेस्टीक आमदार निवास येथे माझेकडे आले. अध्यक्षांनीच सुरुवात केली, "बी.टी.! तुमच्या शासनाने राजेंद्र गार्डनच्या जागेचा घोळ करुन ठेवला. महसूल मंत्र्यांना भेटायला जायचे आहे. तुम्ही सोबत चला म्हणजे एकदा सोक्षमोक्ष करुन टाकू" अध्यक्षांच्या नेतृत्त्वाखाली आमचे शिष्टमंडळ महसूल मंत्री श्री. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना भेटले. अध्यक्षांनी त्यांना सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली. राजकारणाचे अनेक चढउतार जवळून पाहिलेल्या शिवाजीरावांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात यायला वेळ लागला नाही. "त्यांना दुसरी जागा दिसली नाही काय?" एवढे एकच वाक्य त्यांच्या तोंडून निघाले व 'स्टे' एवढा एकाच शब्दाचा आदेश त्यांनी निवेदनावर लिहिला. त्याप्रमाणे २६ मार्च २००२ रोजी स्थगनादेश मंत्रालयातून निर्गमित करण्यात आला.

---

नाही. हे सर्वांनाच कळायचे, त्यांचा विश्वासही बसायचा. कारण डॅडींचे आयोजनच अशा भव्य कार्यक्रमाचे असे की, तो जगन्नाथाचा रथ ओढण्यासाठी अनेक हात लागणे आवश्यक होते.

एक उदाहरण सांगतो. एका स्नेही व्यक्तीच्या संस्थेला इंजिनिअरिंग कॉलेज द्या म्हणून स्व. सुधाकरराव नाईकांकडे डॅडी गेले तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी नकार दिला आणि असे म्हणाले की, तुम्ही इंजिनिअरिंग कॉलेज काढत असाल तर देतो. हा प्रस्ताव न स्वीकारता डॅडी परत आले. त्यांनाही शिक्षणमहर्षी होता आले असते पण, शिवाजी शिक्षण संस्था आणि अकोल्याचे शिवाजी कॉलेज हा त्यांचा ध्यास होता, त्यांचा श्वास होता. त्यासाठी त्यांनी करोडो रुपये कमाईची आरास दूर लोटली. डॅडी खानदानी देशमुख होते. घरी शेतीची, पैशाची श्रीमंती होती. तशी तर ती अनेकांना लाभते पण, डॅडी वृत्तीने, स्वभावाने, दानतीने श्रीमंत होते ही बाब मला महत्त्वाची वाटते. त्यांचा हात हा दात्याचा हात होता.

डॅडींना निसर्गाने, वंशपरंपरेने देहाची श्रीमंती बहाल केलेली होती. सुमारे सव्वासहा फूट उंची, भरदार म्हणजे 'गडी अंगानं उभा नि आडवा' अशी देहाकृती, विस्तृत असा भालप्रदेश, मागे टक्कल, त्याखाली पांढुरके पिवळसर वाढलेले केस आणि भेदक असे जरा घारे जरा निळसर असे डोळे. या वैशिष्ट्यांमुळे ते व्यासपीठावर असले की कार्यक्रमपत्रिकेत अध्यक्ष म्हणून कोणाचेही नाव असले तरी डॅडीच अध्यक्ष वाटायचे. हा माणूस माणसांचा लोभी होता. डॅडींना माणसे खूप आवडायची, अवतीभवती माणसे, समोर माणसे, जवळ माणसे, ऑफिसमध्ये माणसे, कारमध्येही माणसे, दिवाणखान्यात माणसे, व्यासपीठावर माणसे, सभागृहात माणसे असे असले की डॅडी आनंदात असायचे. अशावेळी त्यांचा एरवी राकट वाटणारा चेहरा एक कोवळीक धारण करत असे. त्यांचा आवाज मृदू होत असे. त्यांचे डोळे आनंदाने लकाकू लागायचे. डॅडी कधी चिडायचे नाही का? याचे उत्तर 'होय' असे आहे. म्हणजे खुराक, अलप हादडूनही ढोर काम करत नसेल तर शेतकरी चिडणारंच! तर त्याचेही संकेत आम्हाला सापडले होते. डॅडींनी हाताचा तळवा मानेवरील केसांवरून फिरवला आणि हिंदीत बोलायला सुरुवात केली की आम्ही ठरवायचो, आज काढता पाय घ्यावा. डॅडींनी बी.टी.सरांबरोबर 'वऱ्हाड विकास मोर्चा' काढला होता, ही गोष्ट ते वेगळ्या विदर्भाचे नव्हे तर एकत्र महाराष्ट्राचे समर्थक होते याची द्योतक आहे पण, विदर्भाच्या अनुशेषासंदर्भात त्यांनी अनेकदा आवाज उठविला हेही ध्यानी घ्यावे लागते. शिवाजी शिक्षण संस्थेसाठी धावपळ, दगदग, विकासाचा ध्यास असणारे डॅडी एकेकाळी वाशीमचे नायब तहसीलदार होते. डॅडी एअर फोर्समध्ये पायलट होते. बाबूजी देशमुख वाचनालयाचे आणि प्रतिष्ठित अशा व्याख्यानमालेचे अध्यक्ष होते. नुटा संघटनेचे जिल्हाध्यक्ष होते. अकोल्याचे नगराध्यक्ष होते. देशविदेशात गाजलेल्या 'देवकीनंदन गोपाला' या चित्रपटाचे निर्माते होते. दोन वर्षे महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवाचे ज्युरी होते....

आणखी खूप मोठी यादी होईल. जे कार्य करण्यासाठी इतरांना दोन-तीन आयुष्ये लागली असती ती कामे डॅडीनी एका आयुष्यात केली. पत्नीचे निधन, तरुण विवाहीत मुलीचे निधन, मोरे, मानकर अशा सहकाऱ्यांचे निधन, मित्रांनी, उपकृतांनी केलेला विश्वासघात अशी अनेक दुःखे डॅडींनी धीरोदात्तपणे सोसली. ज्यांना त्यांनी आयुष्यात उभे केले, दोन हातांनी भरभरून दिले, त्यांच्याकडून काही अपेक्षा ठेवली नाही. स्वतःचा मोठेपणा मिरवला नाही. कुटुंबात, संस्थेमध्ये, कॉलेजात एकी ठेवली. डॅडी, तुमचं शरीर, मन, मेंदू काय काय सोसत असेल ते आम्हाला तुम्ही कधी सांगितलं नाही. डॅडी, तुम्ही अकोल्याच्या नागरिकांसाठी पाणी शोधत होतात. डॅडी, त्या दिवशी मोर्णा भरून वाहत होती पण, तुम्ही शांत झोपला होतात. डॅडी, आता अकोल्यात पाऊस सुरू आहे. डॅडी, काटेपूर्णा धरण भरलंय, आपण तुमच्या इंडिकामध्ये ते पाहायला गेलो असतो. डॅडी, तुमचा आनंदून गेलेला चेहरा मला आभाळात दिसतो आहे.

**नारायण कुळकर्णी कवठेकर**

६. हा स्थगनादेश आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या एका शासकीय बैठकीनंतर तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी मला थांबण्याची विनंती केली. महसूल मंत्र्यांकडे झालेल्या चर्चेला मी उपस्थित होतो हे त्यांना निश्चितपणे कळले होते. तेंव्हा तेथे काय झाले? याचे तपशील जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता होती. बोलण्याच्या ओघात "आपका इस जगामे क्या इंटरेस्ट है?" अशी मला त्यांनी विचारणा केली. खरे म्हणजे "क्या इंटरेस्ट है, ये बताने मे कुछ इंटरेस्ट नही है" हे अशा वेळी देण्याचे नेहमीचे उत्तर माझ्या ओठी आले होते पण हा विषय नेहमीपेक्षा वेगळा होता. "या पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ जमीन अजून शिल्लक आहे. ऑफिसर्स क्लबसाठी त्यातील कोणतीही योग्य जमिन आपण घेऊ शकता. पण डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी गरीब मुलांच्या शिक्षणासाठी त्या काळात स्वतः खपून मिळविलेली जागा काढून घेण्याचा विचार हा अविचार आहे. जिल्हाधिकारीपद धारण करणारी व्यक्ती म्हणून आपण अशा कामात इंटरेस्ट घेऊ नये" अशा अर्थाचे विचार मी त्यांच्यासमोर मांडले.

७. पुढे वर्ष दोन वर्षे ही बाब तशीच पडून राहिली व सन २००५ च्या पहिल्या २-४ महिन्यात या प्रकरणाने पुन्हा उचल खाल्ली. २००५ च्या फेब्रुवारी महिन्यात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे कार्यालयात काही हालचाली झाल्या व अमरावती जिल्हाधिकाऱ्यांनी १९ नोव्हेंबर २००१ रोजी जागा सरकार जमा करण्याबाबतचे जे आदेश काढले होते त्याची आता अंमलबजावणी होणार असे सांगण्यात आले. स्वाभाविकपणे संस्थेच्या परिसरात त्यामुळे खळबळ उडाली.

८. प्राचार्य डॅडी देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे जे उपरोक्त प्रतिनिधी मंडळ मुंबईला आले. त्याच्यासाठी १९ जुलै २००५ रोजी दुपारी मा. मुख्यमंत्र्यांशी बैठकीची वेळ निश्चित करण्यात आलेली होती. बैठक दुपारी २.०० वाजता सुरू झाली. प्राचार्य डॅडी देशमुख, उपाध्यक्ष दिलीपबाबु इंगोले, सचिव श्री.सुमंतराव बोंडे या संस्थेच्या प्रतिनिधी मंडळासोबत जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.सुनिल देशमुख व मी स्वतः उपस्थित होतो. डॅडी देशमुखांनी सारे तपशील मा. मुख्यमंत्र्यांसमोर मांडले व शेवटी "जिल्हाधिकाऱ्यांचा १९.११.२००१ चा आदेश रद्द करावा" अशी विनंती करणारा संस्थेचा अर्ज सादर केला. डॅडी देशमुख यांनी तपशीलवार माहिती दिल्यानंतर आम्हाला कुणाला बोलण्याचे काम पडले नाही याचे मुख्य कारण म्हणजे महसूल राज्यमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी मा. मुख्यमंत्र्यांशी व्यक्तिशः बोलून या प्रकरणाचे गांभीर्य पूर्वीच त्यांच्या लक्षात आणून दिले होते. "१९.११.२००१ च्या आदेशाची अंमलबजावणी करणारे आदेश पुन्हा स्थगित" मा. मुख्यमंत्र्यांनी तिथल्या तेथे त्या अर्जावर आदेश दिलेत.

९. ज्या दोन बैठकीसाठी डॅडी देशमुख मुंबईला आले होते. त्यातील १९ तारखेची पहिली बैठक समाधानकारकपणे आटोपली होती. हे समाधान मनामध्ये घेऊन डॅडींनी उद्याच्या दुसऱ्या बैठकीच्या तयारीला सुरुवात केली होती. अकोला पाणीपुरवठ्याशी संबंधित ही दुसरी बैठक होती व ती पाटबंधारे राज्यमंत्री डॉ.सुनिल देशमुख यांनी बोलाविलेली होती. गेले ८-१० महिने शहराच्या या पाणीपुरवठ्याने डॅडींचा व डॅडींनी या पाणीपुरवठ्याचा पिच्छा पुरविला होता. सर्वपक्षीय नागरिकांच्या एका बैठकीमध्ये अकोला शहरावर आलेल्या या संकटाला तोंड देण्यासाठी "अकोला नागरिक समस्या निवारण समिती" स्थापन करण्यात आली होती व डॅडींना या समितीचे अध्यक्ष म्हणून मनोनित करण्यात आले होते. डॅडींनी व त्यांच्या समितीने हे काम खूपच गांभीर्याने घेतले होते असे दिसून येते.

१०. २ डिसेंबर २००४ रोजी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवनात अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर एक सदस्य निवडून देण्यासाठीची मतमोजणी सुरु होती. व्यासपीठावर विभागीय आयुक्त हे रिटर्निंग ऑफिसर व पाचही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हे अे.आर.ओ. म्हणून स्थानापन्न होते. आम्ही सारे उमेदवार व्यासपीठावर उपस्थित होतो. व्यासपीठावर बसल्याबसल्या अकोल्याचे जिल्हाधिकारी श्री. एकनाथ डवले कागदपत्रांच्या फाईलसह निवडणूकी व्यतिरिक्तच्या काही बाबींचे गांभीर्य विभागीय आयुक्तांच्या लक्षात आणून देत आहेत असे माझ्या लक्षात आले. ही मतमोजणी एकदा आटोपून जावू द्या अशा प्रकारची आयुक्तांची भूमिका दिसत होती.

११. मतमोजणीचा निकाल लागला. क्षणापूर्वी उमेदवार असलेला मी आता अधिकृत प्रतिनिधी झालो होतो. मा. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी अकोला यांच्याकडे मी 'ते' बोलणे कशाबद्दल होते? याची स्वतंत्रपणे चौकशी केली असता अकोला शहरातील पाणीपुरवठा प्रश्नाचे गांभीर्य जिल्हाधिकाऱ्यांनी आयुक्तांच्या लक्षात आणून दिले होते. 'त्या' गडबडीत अकोला जिल्हाधिकारी यांनी मलासुद्धा त्याची माहिती दिली. इतर अनेक बाबींबरोबर काटेपूर्णा-मोर्णेच्या पट्ट्यात ९० मोठे बोअर घेण्याचा एक प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी तयार केला होता. इतर कामासह अंदाजे १ कोटी २० लक्ष रुपये किंमतीचा हा प्रस्ताव होता. पिण्यासाठी थोडेफार हुकमी पाणी त्यामुळे उपलब्ध होऊ शकेल अशी आशा जिल्हाधिकाऱ्यांना वाटत होती. त्यांच्या या प्रस्तावाला अजून मान्यता मिळालेली नव्हती.

१२. निवडणुकीच्या निकालाच्या दिवशी पारंपारिक मिरवणुकीनंतर आशीर्वाद भवनमध्ये झालेल्या विजयसभेत भाषण करतांना डॅडींनी अकोला पाणी पुरवठ्याचा प्रश्न जाहीरपणे मांडला. अकोला जिल्ह्यातील प्रत्येकानेच त्या सभेत आपल्या भाषणात त्याविषयीची तीव्रता व्यक्त केली.

१३. निकालानंतर दोन तीन दिवसानीच नागपूर अधिवेशन सुरू झाले. डॅडींच्या नेतृत्त्वाखाली नागपूर अधिवेशनामध्ये अकोला नागरिक समस्या निवारण समितीचे शिष्टमंडळ मा. मुख्यमंत्री व पाणीपुरवठामंत्री यांना भेटण्यासाठी नागपूरात आले. संबंधित सर्व कागदपत्रे त्यांनी आम्हा लोकप्रतिनिधींच्या सुपूर्त केलीत. "इतर लहानमोठ्या उपाययोजनांना मान्यता मिळाली आहे. पण काटेपूर्णा-मोर्णेच्या पट्ट्यात ९० बोअरच्या प्रस्तावास शासनाने अजून मान्यता दिली नाही. त्यामुळे शहराची मोठी अडचण होत आहे." ही बाब त्यांनी आम्हा सर्वांच्या लक्षात आणून दिली.

१४. अधिवेशनानिमित्त या नागपूर भेटीच्या वेळी व्यक्तिशः माझ्याशी या प्रश्नावर चर्चा करतांना डॅडींनी थेट अमरावतीचे उदाहरण दिले. "१९८३ नंतरची ५-७ वर्षे अमरावतीचा पाणीपुरवठा पूर्णपणे भूगर्भातील पाण्यावर अवलंबून होता. ४०० बोअर तुम्ही घेतले होते. ९० बोअरसाठी आम्हाला शासन का मान्यता देत नाही?" या त्यांच्या प्रश्नाला देण्यासारखे कोणतेही उत्तर माझ्याजवळ नव्हते. ही ईश्वरी आपत्ती आहे असे मानून एरव्ही शांतपणे बोलणारे डॅडी ९० बोअरच्या प्रश्नावर प्रक्षोभकपणे बोलत होते. खाजगी बोलण्यात त्यांच्या या प्रक्षोभाला त्यातल्या त्यात समाधानकारक उत्तर देतांना मी म्हणालो "या ९० बोअरच्या प्रस्तावाला शासनाने परवानगी द्यावी म्हणून आम्ही सर्वजण या अधिवेशनात पूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करू. गेले वर्ष हे माझ्या निवडणुकीचे वर्ष होते. निवडणुकीच्या वर्षात मी स्थानिक विकास निधीचे सहसा वाटप करीत नाही कारण मला ती गोष्ट संकोचपूर्ण वाटते. अगोदरच्या वर्षीच्या कामासाठी खर्ची झालेला निधी वजा जाता माझा या वर्षातील पुष्कळसा स्थानिक विकास निधी शिल्लक आहे. तुम्ही मला गेल्या २४ वर्षात एकही स्थानिक विकास निधीचे काम सांगितले नाही. ९० बोअरच्या प्रस्तावाला शासनाची परवानगी मिळो अथवा न मिळो मी माझा सर्व स्थानिक विकास निधी या कामासाठी देण्याचे ठरविले आहे." मी हे सांगत असतांना डॅडींच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान व आनंद आजही डोळ्यासमोर आला म्हणजे त्यांनी हे काम एकूणच किती गांभीर्याने घेतले होते हे लक्षात येते.

१५. श्री. वसंतराव खोटरे यांनी वेगवेगळ्या कार्यालयातून पाणीपुरवठ्याबाबतची संदर्भिय माहिती गोळा करुन आणली होती. नागपूर अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आम्ही या प्रश्नावर सभागृहात चर्चा उपस्थित केली. गुरुवार, दिनांक ९ डिसेंबर २००४ रोजी ही चर्चा झाली. १३.१५ वाजता सुरू झालेली चर्चा १३.५० पावेतो चालली होती. या चर्चेत ९० बोअरच्या प्रस्तावाला मान्यता देण्याचे आश्वासन मिळविण्यात आम्हाला यश आले. चर्चेतील लागूपुरता भाग पुढील प्रमाणे :-

"**प्रा.बी.टी.देशमुख** : मला बेसिक दोनतीन प्रश्न विचारावयाचे आहेत. महत्वाची गोष्ट अशी आहे की, मा.मंत्री महोदयांनी डिसेंबरपर्यन्त वान प्रकल्पाच्या पाण्याच्या बाबतीतील काम पूर्ण करतो असे म्हटले. त्यामुळे मी त्याबाबत आता प्रश्न विचारित नाही. कापशी आणि कौलखेड प्रकल्पाच्या पाण्याच्याबाबतीत तसेच त्याशिवाय ९० बोअरवेलचा उल्लेख केलेला आहे, त्याला अजूनही प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, त्याचे काम सुरु झालेले नाही. महापालिकेच्या बाबतीत त्यांच्याकडून देण्या-घेण्याचा जो भाग असेल, त्याबाबतीत आपण महानगरपालिकेकडून नंतरही ते पैसे वसूल करु शकता, त्यांची परिस्थिती असेल तर त्यांनी ते पैसे आज दिले पाहिजेत. परंतु आपल्याला नंतरसुध्दा त्यांच्याकडून पैसे वसूल करता येतील. आपण आज तेवढ्यासाठी अडवू नये. शासनाला त्यांना दहा प्रकारची देणी द्यायची असतात. माझा सरळसरळ प्रश्न असा आहे की, कौलखेड आणि कापशी प्रकल्प आणि ९० बोअरवेल याबाबतच्या तीनही प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन काम सुरु झालेले आहे काय ? ते काम सुरु झाले नसेल तर पुढच्या आठ-दहा दिवसामध्ये हे काम सुरु होईल काय ?

**श्री.अजित पवार** : सभापती महोदय, आज सकाळीच ९ वाजल्यापासून त्याच संदर्भातील बैठक चालू होती. त्या संबंधातील मी माहिती मागविली. परंतु काही कागदपत्रे पूर्णपणे आलेली नाहीत. तेव्हा मी सांगू इच्छितो की, सोमवारी या सगळ्यांचा १ कोटी २० लाख रुपये अंदाजित खर्च आहे, त्या सर्वांना मान्यता दिली जाणार आहे. त्यामध्ये कोणतीही अडचण येणार नाही. मी जबाबदारीने सभागृहात सांगू इच्छितो की, अकोला शहरातील नागरिकांवर पाण्याचे खूप मोठे संकट आलेले आहे ते संकट दूर करण्याकरिता शासन सर्वतोपरी मदत करत आहे.

*(थोड्या इतर चर्चेनंतर)*

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, दोन विषय एकत्र झाल्यामुळे गोंधळ होत आहे. हे दोन्ही विषय वेगवेगळ्या लक्षवेधीच्या स्वरुपात आले असते तर बरे झाले असते आणि त्या प्रश्नाला न्याय मिळाला असता. अकोल्याच्या बाबतीत अगदी स्पष्ट मुद्दा मांडण्यात आलेला आहे. मी २-३ लहान लहान प्रश्न विचारतो. मंत्रिमहोदयांनी २-३ वेळा यासंबंधीचा उल्लेख केला आहे की, कापसी आणि कौलखेडसंबंधी उपाययोजना केलेली आहे. वास्तविक २०० बोअरवेल्सची मागणी होती, परंतु त्यांनी ९० बोअर्स म्हटले आहे. या ९० बोअरवेल्स आणि कापसी व कौलखेड यासंबंधी काही कागदपत्रे यावयाची आहेत आणि त्याचे आदेश सोमवारी जारी केले जाणार आहेत. तेव्हा सोमवारी आदेश निघाल्यानंतर

कापसी आणि कौलखेड व ९० बोअरवेल्स यांचे काम ७-८ दिवसात सुरु करण्यासाठी सक्त आदेश दिले जातील काय ?

**श्री.अजित पवार** : तेथील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी आणखी काही आदेश द्यावयाचे असतील तर ते देखील देण्यात येतील."

१६. सभागृहात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे या ९० बोअरच्या प्रस्तावाला मान्यता देणारे शासन आदेश पुढील आठ दहा दिवसात निर्गमित झाले याबद्दल पाणीपुरवठा मंत्री श्री. अजित पवार यांना निश्चितपणे धन्यवाद दिले पाहिजेत. सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या प्रश्नांची व्यवस्थित माहिती करुन घेऊनच सभागृहात येणे, त्या प्रश्नाच्या फाईल-फॅक्टस्वर मजबूत पकड असणे, सार्वजनिक जीवनामध्ये कोणत्या प्रश्नाला 'हो' म्हणावे, कोणत्या प्रश्नाला 'नाही' म्हणावे, याची उत्तम जाणीव असणे, एकदा 'होय' म्हटल्यानंतर ते ठामपणे अमलात आणण्याचा निर्धार व असा निर्धार अमलात आणण्यासाठी विभागावर आवश्यक असलेला वचक या गुणांची त्यांना उत्तम सोबत असल्यानेच हे आदेश वेळेत निघू शकले. शिवाय हा प्रश्न व त्याचे महत्त्व याची जाणीव असल्याने श्री. अजित पवार यांनी स्वतः अकोला शहराला भेट देऊन, बैठक घेवून त्यांच्या खात्याशी संबंधित असलेला एक एक प्रश्न हातावेगळा केला होता.

१७. कोणत्याही शहरासाठी पाणीपुरवठा सुरळीतपणे चालू रहावयाचा असेल तर शास्त्रीय दृष्ट्या "साठवण जलाशय" हे कोणत्या स्थितीमध्ये अपरिहार्य असते याचे उत्तम विवेचन हार्डेनबर्ग व रॉडी या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या पाणीपुरवठा तज्ज्ञांनी त्यांच्या "वॉटर सप्लाय अँड वेस्ट डिसपोजल" या ग्रंथामध्ये केलेले आहे. सदर ग्रंथाच्या प्रकरण सहाच्या पहिल्या परिच्छेदात ते असे म्हणतात की,

"सामाजिक गरजांकरिता लागणाऱ्या पाण्याचे सर्वोत्कृष्ट उगमस्थान, मग तो नविन पुरवठा असो अगर विद्यमान पुरवठ्याच्या मर्यादा संपल्याने तो वाढविण्यासाठी असो, नदी अगर झरा असते. जर सरासरी गरजेपेक्षा प्रवाह कमी असेल तर त्यातून (पुरवठ्यात) वाढ करणे निष्फळ ठरते. जर नदीतून/नाल्यातून घेण्यात येणाऱ्या (पाण्याच्या) कमाल राशिपेक्षा त्यातील किमान प्रवाह जास्त असेल तर, जलाशयाची जरूरी लागणार नाही. जर सरासरी मागणीपेक्षा नाल्यातील/नदीतील सरासरी प्रवाह जास्त असेल पण किमान प्रवाह सरासरी मागणीपेक्षा कमी असेल तर जलाशयाची गरज पडते. अशा जलाशयाला '**साठवण जलाशय**' असे संबोधिले जाते."

वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या कमाल राशीपेक्षा किमान प्रवाह जास्त असणारी नदी किंवा झरा ज्यांच्याजवळ नसेल, त्या मानवी समुहाला पिण्याच्या पाण्यासाठी साठवण जलाशयावर अवलंबून रहावे लागते. ज्यांची साठवण जलाशयेसुद्धा संपुष्टात आली त्यांना भूगर्भातील पाण्याकडे वळावे लागते. १९८३ ते ९४ या काळात अमरावती शहराला या स्थितीला तोंड द्यावे लागले होते. १९८३ मध्ये २० कूपनलिका, १९८४ मध्ये १२ कूपनलिका, १९८५ मध्ये ५ कूपनलिका व १९८६ मध्ये आणखी १० कूपनलिका, त्यानंतरच्या ४-५ वर्षात तर लहानमोठ्या कूपनलिकांची संख्या ३०० ते ४०० च्या घरात गेली होती. पेढी-पूर्णेचे पाणी कमीकमी होत गेल्यामुळे अमरावती शहराला टप्प्याटप्प्याने या स्थितीला सामोरे जावे लागले होते. अकोला शहरावर ही आपत्ती एकदमच आली होती.

१८. शासनाने मंजूरात दिलेल्या अंदाजे ९० कूपनलिका व स्थानिक विकास निधीमधून घेता येईल तेवढ्या लहान मोठ्या कूपनलिकांची या अडचणीवर मात करण्यात खूप मदत झाली. जिल्हाधिकारी श्री. डवले यांनी जीव ओतून आपत्ती निवारणाच्या या कामाचे नेतृत्त्व केले. डॅडी देशमुख व त्यांच्या समितीने वस्त्यांची निवड करणे, कूपनलिकांची जागा निश्चित करणे, यासाठीची सर्व धावपळ मनापासून पार पाडली. एकदा डॅडी देशमुखांनी जिल्हाधिकाऱ्यांना फोन केला. "प्रत्यक्ष वस्त्यामध्ये फिरुन आम्ही यादी तयार केलेली आहे ती घेऊन किती वाजता तुमच्याकडे येवू ते सांगा?" त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना सांगितले "डॅडी! तुम्ही प्रत्यक्ष येण्याची गरज नाही ती यादी माझ्याकडे पाठवून द्या." यादी पाठविण्यात आली. सर्व कामे मार्गी लागली. खुद्द डॅडींनीच मला हा संवाद सांगितला. आपल्या वजनदार शरीरयष्टीमुळे शारीरिक हालचालीवर येणाऱ्या साऱ्या मर्यादावर मात करुन निरपेक्ष वृत्तीने अंगिकृत सार्वजनिक कामासाठी जी धावपळ ते करीत असत त्यामुळे त्यांच्याविषयीचा जो आदरभाव त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनामध्ये निर्माण होत असे तसा तो अधिकारी वर्गाच्या मनामध्येसुद्धा निर्माण होत असे हेच जिल्हाधिकाऱ्यांच्या उपरोक्त उद्‌गारावरून दिसून येत नाही काय?

१९. मला एक गोष्ट नमूद केली पाहिजे. गेल्या २४-२५ वर्षामध्ये अनेक लहानमोठी कामे स्थानिक विकास निधीतून पूर्ण झाली आहेत. महत्तम समाधान देणारे एक काम सांगा म्हटले तर मला अकोला शहराच्या तातडीच्या पाणीपुरवठ्यासाठीच्या कूपनलिकांचे काम हेच सांगावे लागेल. या कामाने खूप मानसिक समाधान दिले. अनेकांनी पत्रे पाठवून धन्यवाद दिलेत, विदर्भाचे वयोवृद्ध ज्येष्ठ नेते श्री. अण्णासाहेब कोरपे यांनी धन्यवाद पत्र पाठवून माझे आभार मानले. त्यामुळे मनापासून आनंद वाटला. एवढ्या महत्वपूर्ण व बिनचूक कामासाठी एवढा मोठा निधी देण्याचा निर्णय घेण्यामागे डॅडींची या कामासाठीची तळमळ, याही वयात त्या कामासाठी घ्यावी लागणारी मेहनत घेण्याची त्यांची तयारी यांचा मुख्य वाटा होता हे नमूद करणे मला आवश्यक वाटते.

२०. उन्हाळा संपला होता. पावसाळा सुरू झाला होता. (जुलै २००५) १९ तारखेला रात्री उशिरापर्यंत डॅडी देशमुख यांनी दुसऱ्या दिवशीच्या बैठकीची तयारी केली. बरीच कागदपत्रे व फाईल घेऊन ते या बैठकीसाठी आले होते. रात्रौ बऱ्याच उशिरापर्यंत आम्ही दोघेही मांडावयाच्या मुद्यांची व अपेक्षित निर्णयाची चर्चा करीत होतो. याच चर्चेमध्ये मी तापी डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाची कल्पना सांगितली तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. २० तारखेला दुपारी ४.०० वाजता पाटबंधारे राज्यमंत्री डॉ.सुनिल देशमुख यांच्या विधानभवनातील दालनामध्ये ही बैठक सुरू झाली. लोकप्रतिनिधी म्हणून विधानसभा सदस्य श्री.तुकाराम बिडकर, श्री. वसंतराव खोटरे व मी या बैठकीला उपस्थित होतो. पाटबंधारे विभागातील ज्येष्ठ व क्षेत्रीय अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

२१. डॅडी देशमुख यांनी सर्वात महत्वाचा मुद्दा बैठकीत मांडला तो असा की, "आम्ही उन्हाळ्यात टॅंकरने पाणी विकत घेतो व पावसाळ्यात मोर्णेचे पाणी आमच्या गावातून पार वाहून जाते. शहराच्या वरच्या बाजूला अकोला पूरनियंत्रण योजनेचा भाग असलेले उर्ध्व मोर्णा, ब्राम्हणवाडा, सुखांडा हे लहान लहान प्रकल्प पूर्ण होत आले असतांना 'दगडपारवा लघुपाटबंधारे प्रकल्प' मात्र निधीच्या अभावी अपुऱ्या अवस्थेत आहे. १८-१९ कोटी रुपयाचा हा मुळातील प्रकल्प आता ४० कोटी रुपयांच्या वर गेला आहे. त्याला एकमुस्त ५-७ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला तर निदान धरणात पाणी थांबेल व ते अडचणीच्या वेळी कामी येवू शकेल." बरीच चर्चा झाली, बराच वेळ चर्चा झाली. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत जी वेळ अकोला शहरावर आली ती लक्षात घेता दगडपारव्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठीची नस्ती तत्परतेने तयार करण्याचे आदेश राज्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

२२. मा. राज्यमंत्र्यांकडील ही चर्चा चालू असतांना विधानसभेत विरोधी पक्षाने पुरवणी मागण्यांवर मतदानाची मागणी केली, त्यामुळे दहा मिनिटांची 'अखंड पोल बेल' वाजायला लागली. अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली. बैठक तहकूब करुन राज्यमंत्री डॉ.सुनिल देशमुख व विधानसभा सदस्य श्री. तुकाराम बिडकर हे मतदान आटोपून आल्यावर आमची बैठक पुन्हा पुढे सुरू झाली. बैठकीत मुख्यत्वे शहराच्या वर असलेला विद्रुपा व मोर्णेचा उर्वरित येवा अडविण्याबाबत विचार झाला. काही निर्णय झाले.

२३. अकोला शहराच्या पाणीपुरवठ्याचा कायमस्वरूपी विचार समोर ठेवून मी "तापी डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाचा" विचार मांडला. वस्तुतः मी अमरावती जिल्ह्याच्या, जिल्हा नियोजन व विकास परिषदेमध्ये यापूर्वी दिनांक २५ जुन २००५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये याबाबतचा एक प्रस्ताव मांडला होता. पाटबंधारे विभागाच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या टिप्पणीच्या आधारे त्याबाबतचा ठराव त्यादिवशी एकमताने मंजूर सुद्धा करण्यात आला होता. पाटबंधारे राज्यमंत्री हे अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने त्यांना याची कल्पना होती. स्वाभाविकपणे "हा तोच प्रस्ताव आहे का?" अशी त्यांनी विचारणा केली. "तो प्रस्ताव वेगळा होता, हा प्रस्ताव वेगळा आहे. तापी नदीवर खारीया गुटीघाट धरण झाले तर बुलढाणा, अकोला व अमरावती या तीन जिल्ह्यांना ८४ हजार हेक्टरची सिंचन क्षमता त्यातून प्रवाही सिंचनाने मिळू शकेल असा तो प्रस्ताव होता. आता माझा या शहरासाठी प्रस्ताव असा आहे की, खारिया गुटीघाट धरण होवो अथवा न होवो, वर्धा डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाप्रमाणे तापीवर एक लहानसे स्ट्रक्चर घेऊन हे पाणी कॅनॉलद्वारे प्रवाही पद्धतीने अकोल्यापासून ३० ते ४० किलोमीटर अंतरावर एका किंवा जास्त ठिकाणी ३० ते ३५ हजार हेक्टरचे सिंचन होईल अशा रीतीने साठवावे त्या प्रकल्पात १० ते १५ टक्के पिण्याच्या पाण्यासाठी शासननिर्णयाप्रमाणे राखीव ठेवावे म्हणजे अकोल्याचा प्रश्न सुटू शकेल." असा विचार मी मांडला. १५ ऑगस्ट २००५ पर्यंत या प्रस्तावाबाबत मानचित्रावर आधारित अभ्यास विभागाने सादर करावा असे आदेश मा. राज्यमंत्र्यांनी दिले.

२४. दिनांक २० जुलै रोजी आमची ही बैठक पाच साडेपाच वाजताच्या दरम्यान आटोपली. पहिल्या माळ्यावरील राज्यमंत्र्यांच्या कार्यालयातून तळमजल्यावर आम्ही चालत आलो. येतांना डॅडी सहज मला म्हणाले "भाऊ! खरच हा तापी डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्प शक्य आहे काय?" मी म्हणालो "डॅडी! तीन वर्षापूर्वी आम्ही काही लोकप्रतिनिधींनी वर्धा डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाच्या चर्चेला सुरुवात केली तेव्हा असाच प्रश्न विचारला जात होता. पण ते स्वप्न आता प्रत्यक्षात उतरते आहे. आपला अनुशेष फार मोठा आहे. सिंचनाच्या प्रश्नात पिण्याचा पाण्याचा प्रश्न गुंतलेला आहे. पाटबंधारे राज्यमंत्री विदर्भातील आहे. गुणवत्तेवर व खमकेपणाने निर्णय घेणारा मंत्री खात्याला लाभला आहे. आपले प्रश्न आपण सर्व स्तरावरून मांडलेच नाहीत तर ते कसे सुटतील? आपण प्रयत्न करू".

२५. बैठकीतील चर्चेने डॅडी बरेच खूष होते. विधानभवनाच्या मागच्या आवारात आम्ही आलो तर तेथे सर्वश्री. मदन भरगड, उदय देशमुख व श्री. चंद्रशेखर इटावा हे उभे दिसले. त्यांच्याशी बोलणे झाले. ही सर्व मंडळी त्याच दिवशीच्या (२०.७.२००५) रात्रीच्या गाडीने निघून सकाळी अकोल्याला आली. अकोल्यात आल्यावर त्यांना डॅडींच्या दुःखद निधनाची बातमी कळली. विधानभवनमध्ये अगोदरच्या दिवशी झालेल्या भेटीचा वृत्तांत नमूद असलेले ज्येष्ठ पत्रकार श्री. चंद्रशेखर इटावा यांचे "तो नमस्कार अखेरचा ठरला" या मथळ्याखाली शब्दबद्ध केलेले एक लहानसे वृत्तीय प्रसारण २२ जुलै २००५ च्या

मातृभूमीमध्ये प्रसिद्ध झाले आहे. ते शब्दशः पुढील प्रमाणे :-

“अकोला दि. २१ :- अकोला महानगर व जिल्ह्याची समस्या उग्र स्वरूप धारण करीत असल्याचे चित्र सर्वत्र उभे असल्याचे पाहावत नसल्यामुळे त्याकरिता आपल्या स्वभावानुसार ह्या नागरी समस्येसाठी झटणाऱ्यांमध्ये डॅडी देशमुख हे एक व्यक्तिमत्व होते, ज्याला आज निर्दयी काळाने आमच्यातून हिरावून नेले.

काल बुधवार, २० जुलै रोजी सायंकाळी त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दिवशी त्यांची भेट मुंबईत विधानभवनासमोर झाली. त्यावेळी ते आणि आमदार प्रा.बी.टी.देशमुख हे दोघे जण बाहेर विधानभवनासमोर उभे होते. आम्ही विधान भवनातून बाहेर येताच त्यांना दोघांना नमस्कार केला. तुम्ही कधी आलात, काय विशेष अशी त्यांनी आमची आस्थेने विचारपूस केली. त्यानंतर अकोल्याच्या पिण्याच्या पाणी समस्येचा विषय. आम्ही ४० लक्ष रुपये दिल्याबद्दल आ.बी.टी.चे डॅडीसमोर आभार मानले. त्यामुळे डॅडींच्या पुढाकाराने व आपल्या सहकार्याने आ. गोपी बाजोरियांच्या सहकार्याने शहराच्या पाणी समस्येवर बहुतांशी मात करणे शक्य होऊ शकल्याचे सांगितले. डॅडींनी लगेच येथील सर्व पत्रकारांनी दिलेल्या सहकार्याचे बी.टी.ना सांगत पत्रकारांचे आभार व्यक्त केले. ना. सुनिल देशमुख यांचेशी झालेल्या चर्चेत पूर संरक्षण योजनेसह जिल्ह्यातील निधीअभावी प्रलंबित किंवा अर्धवट असलेली धरणे पूर्ण करण्यांसह आणखी दोन धरणांची आवश्यकता असल्याचे त्यामध्ये नमूद केल्याचीही माहिती त्यांनी दिली. ही चर्चा करतांना सायंकाळच्या साडेचार चे साडेपाच कधी झाले ते कळलेच नाही.

डॅडी, आ.बी.टी.देशमुख, मदन भरगड, प्रा.उदय देशमुख आणि मी आम्ही सोबत बोलत बोलत विधानभवनासमोर बाहेर गेटपर्यंत आलो. रस्त्याच्या कडेला पुन्हा थांबलो आणि ५ मिनिटे चर्चेनंतर डॅडी व बी.टी. मंत्रालयाच्या रस्त्याने निघाले. आम्ही मनोऱ्याच्या. तत्पूर्वी आम्ही सर्वांनी त्या दोघांना हात जोडून नमस्कार केला. त्यांनीही प्रत्युत्तरात नमस्कार केला. पण हे कोणाला माहीत होते की डॅडींचा तो अखेरचा नमस्कार असेल. खरोखरच जीवन एक पाण्याच्या बुडबुड्यासारखे आहे. हे मान्य करावे लागेल. शहरवासीयांना पाणी मिळवून देण्यासाठी चंग बांधून डॅडींनी काही महिन्यापूर्वीच आ. सुधाकरराव गणगणे यांच्यासह वार्ताहर बैठक घेऊन गैरराजकीय लढा उभारण्याचे आवाहन केले होते. हे आवाहन पूर्ण करण्यासाठी मुंबईत ठाण मांडून बसलेल्या डॅडींवर काळाने झडप घालावी यापेक्षा या शहराचे दुर्दैव तरी काय?”

२६. दिनांक २० रोजी सायंकाळी मॅजेस्टिक आमदार निवासामध्ये आम्ही टॅक्सीने परत आलो. संध्याकाळी थोडावेळ आराम करुन रात्री सात साडेसात वाजता ते मला म्हणाले. “आपण जेवायला जावू. तुम्ही जेवण करा. मी फळांचा रस घेतो. मला काही फारशी भूक नाही.” त्यावर मी त्यांना म्हणालो “आजचे माझे जेवण रद्द करू व आपण दोघेही रसाहारच करू” खाली ‘कॅन्टिना’मध्ये रसपानानंतर थोडेसे फिरून नऊ साडे नऊ वाजता लिफ्टने मी पहिल्या माळ्यावर उतरलो. “मी, श्री. दिलीप इंगोले व श्री. सुमंतराव बोंडे यांच्याशी बोलून उद्या पुण्याला जाण्याचा कार्यक्रम पक्का करतो.” असे म्हणून ते दुसऱ्या माळ्यावर श्री. वसंतराव खोटरे यांच्या खोलीवर गेलेत.

२७. रात्रौ अकरा साडेअकरा वाजता ते परत आले. माझ्या बाजूच्याच खोलीत माझे स्वीय सहाय्यक श्री. अविनाश देशमुख त्यांच्या सोबतीला होते. त्यांनी पिण्यासाठी पाणी मागितले व पाण्याचे भांडे बाजूला ठेवायला सांगून ते झोपी गेले. सकाळी ७ वाजता उठवून देण्याच्या सूचना या तिघांनीही एकमेकांना दिल्या होत्या. डॅडींनी अविनाशला सुद्धा तशी सूचना दिली होती.

२८. २१ तारखेला सकाळी साडेसहाच्या दरम्यान अविनाशने माझ्या खोलीत येवून “साहेब! डॅडीसाहेबांनी सात वाजता उठवून द्यायला सांगितले होते, मी त्यांना उठवतो पण ते उठतच नाहीत.” असे मला सांगितले. ताडकन उठून बाजूच्या खोलीत जावून मी पाहिले तर डॅडी उजव्या खांद्यावर मान ठेवून शांतपणे झोपावे अशा स्थितीत दिसले. हालचालींच्या संपूर्ण अभावामुळे हा प्रकार काही खरा नाही हे लक्षात आले पण एक आशा म्हणून पहिला फोन डॉक्टरांना लावला व त्यानंतर भराभर इतरांना फोन लावले.

२९. पाच मिनीटांच्या आत दुसऱ्या मजल्यावरून श्री. वसंतराव खोटरे, दिलीपबाबू इंगोले व सुमंतराव बोंडे आले. खोलीत आम्हा चौघांनाही काय झाले आहे हे कळत असूनसुद्धा डॉक्टर येईपर्यंत वाट पहाणे आवश्यक होते. पुढल्या ५-१० मिनिटात डॉ. सुनिल देशमुख, तुकाराम बिडकर, श्री. मदनराव भोसले येवून पोचले. त्यांच्या काही मिनिटे अगोदर मॅजेस्टीक आमदार निवासात ड्यूटीवर असलेले डॉक्टर येवून पोचले होते. त्यांनी दोन मिनिटात निर्णय सांगितला. “मी ज्युनिअर डॉक्टर आहे. घटना दुःखद आहे. मला तसे घोषित करण्याचा अधिकार नाही. आमचे सिनिअर डॉक्टर येण्यातच आहेत. तेच याबाबत घोषणा करतील.”

३०. पुढच्या १५-२० मिनिटात जी.टी. रुग्णालयाचे सिनिअर डॉक्टर येवून पोचले. पाच मिनिटातच त्यांनी दुःखद घटना ही वस्तुस्थिती असल्याची औपचारिक घोषणा केली. आतापर्यंत आम्ही सर्वजण अंदाजाने ‘हृदयविकाराचा आघात’ हेच कारण समजत होतो. डॉक्टरांनी निःसंदिग्धपणे ‘ब्रेन हॅमोरेज’ हे कारण असल्याचे सांगितले व अधिकृत कागदोपत्री तशा नोंदी केल्या. आम्ही सारेचजण आता पुढील कामाला लागलो.

३१. १०.३० वाजताच्या दरम्यान मा.मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख मॅजेस्टीक आमदार निवासात आले. आल्या आल्याच मॅजेस्टीकच्या मुख्य दारातच “बी.टी.! परवा तर आपली बैठक झाली. तसे काही वाटले नाही. एकाएकी हे कसे काय झाले?” असे उद्‌गार काढले. झालेला घटनाक्रम मी त्यांना सांगितला. त्यांनी अंत्यदर्शन घेतले. डॅडींच्या पार्थिवाला पुष्पचक्र अर्पण केले. मदनराव भोसले यांचे सांत्वन केले. उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांना व मेडिकल अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

३२. सर्व औपचारिकता आटोपण्यामध्ये २-३ तासाचा वेळ लागला. दुपारी एक वाजता मॅजेस्टीक आमदार निवासातून एका ॲम्बुलन्स वाहनातून डॅडींच्या पार्थिवाचा प्रवास अकोल्याकडे सुरू झाला. एका वाहनातून मदनराव भोसले व त्यांचे सहकारी, दुसऱ्या वाहनातून शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले व सचिव श्री. सुमंतराव बोंडे हे सोबत निघाले. शुक्रवारी सकाळी ४ ते ५ च्या दरम्यान डॅडींचे पार्थिव रणपिसे नगरला त्यांच्या निवासस्थानी पोचले. समाजहितबुद्धीने भारित कार्यतत्पर अशा कृतिशिल पाऊलांनी खचाखच भरलेल्या त्यांच्या ७० वर्षांच्या जिवनाची वैभवी वाटचाल संपुष्टात आली. डॅडींच्या अंतिम प्रवासातील शेवटच्या २ दिवसातील ही हकीकत नमूद करण्याचे नियतीने सोपविलेले हे काम मी कर्तव्यबुद्धीने पार पाडलेले आहे.

३३. डॅडींच्या प्रत्येक कामाला सार्वजनिक हितबुद्धीची एक किनार लाभलेली असे, त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक प्रेमादरजन्य दरारा निर्माण होत असे, या दराऱ्याचा सुद्धा एक वचक असे, वचक या शब्दाने जाणवणाऱ्या वचकापेक्षा या वचकाची जातकुळी वेगळी असे, असा काही वचक आहे याची जाणीवसुद्धा त्यांच्या सहकाऱ्यांना होत नसे. अकोला पूरनियंत्रणासाठी किंवा अकोला पाणीपुरवठा योजनेसाठी विधानपरिषदेत काही तरी करा असे नुसते सांगून ते मोकळे होत नसत, झालेल्या चर्चेची अधिकृत प्रतिवेदने आग्रहाने मागून घेत, वाचून काढत, शाबासकी देत. एवढ्याने त्यांचे समाधान होत नसे, तर हे सर्व लोकांना कळले पाहिजे म्हणून फिरून, दहा जाहिराती गोळा करुन, या चर्चा प्रकाशित करणारा ‘नुटा बुलेटीन’चा अंक काढून, तो सर्वांना वाटण्यात त्यांना आनंद वाटत असे. आपल्या सहकाऱ्यांच्या कामावर अपार प्रेम करण्याच्या त्यांच्या या गुणाच्या पोटी जन्माला आलेला वचक, पारंपारिक वचक या जातकुळीचा नसला तरी तो वचकच असे.

३४. चित्रपटातून खोऱ्याने पैसे ओढण्याच्या त्या काळात त्यांनी चित्रपट काढला तो सुद्धा समाज प्रबोधनासाठी. ‘देवकीनंदन गोपाला’ पाहिल्यानंतर तत्कालीन थोर चित्रपती व्ही. शांताराम यांनी डॅडींना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. मुंबई येथे व्ही. शांताराम यांच्या निवासस्थानी ही भेट झाली. चांगला चित्रपट काढल्याबद्दल डॅडींचे अभिनंदन करुन व्ही. शांताराम यांनी पहिला प्रश्न कोणता विचारला असेल? तर तो असा की “डॅडी! या चित्रपटातील ‘मॉबसिन’साठी तुम्हाला किती खर्च आला?” डॅडींनी झालेल्या खर्चाचा काही हजार रुपयांचा आकडा त्यांना सांगितला. व्ही. शांताराम चकीत झाले, म्हणाले “या कामासाठी आम्हाला इतके लाख रुपये खर्च आला असता. गाडगेबाबांच्या अंत्ययात्रेचे गर्दीभरे दृश्य चित्रित करतांना हे इतके ‘प्रोफेशनल्स’ तुम्ही आणले कुठून? आणि हे इतके वास्तव चित्रण झाले कसे?” डॅडींनी त्यांना सहजपणे सांगितले. “ज्या दिवशी चित्रिकरण होते त्यांच्या अगोदरच्या दिवशी आम्ही आजुबाजूच्या सर्व खेड्यात हँडबील वाटले. असा असा चित्रपट मी काढत आहे. उद्या अंत्ययात्रेचे चित्रिकरण करावयाचे आहे. तेव्हा तुम्ही सर्वांनी यावे.” गाडगेबाबांवर चित्रिकरण आणि तेही आपल्या भागात. हजारोंच्या संख्येनी लोक आलेत.

डॅडींनी त्या सर्व लोकांची सभा घेतली. त्यांच्यासमोर भाषण दिले. “गाडगेबाबांचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. त्यांच्यावरचा हा चित्रपट आहे. त्यांचे निधन झाल्यानंतर निघालेल्या अंत्ययात्रेचे हे दृश्य आहे. तेव्हा आपण अंत्ययात्रेत कसे वागतो? तसे तुम्ही वागले पाहिजे. कॅमेरा समोरून असला तर चेहऱ्यावर हसण्याचा किंवा तत्सम भाव दिसता कामा नये. तुमच्या मागून कॅमेरा असेल तर मागे वळून पहाता कामा नये.” करीत असलेल्या कामाला सार्वजनिक हितबुद्धीची किनार असल्यामुळे निर्माण होणारा दरारा काही और असतो. लोक म्हणाले “आता तुम्ही सुरू करा.” आणि ‘ॲक्शन’ म्हटल्याबरोबर ती गर्दी खऱ्या अंत्ययात्रेत सहभागी झाल्यागत चालू लागली. पहिल्याच झटक्यात ‘शॉट ओके’ झाला. प्रेमादरापोटी प्राप्त होणारा हा दरारा ही डॅडींची फार मोठी मालमत्ता होती. हा दरारा इतका की खुद्द डॅडींच्या अंत्ययात्रेत मोहता मिल स्मशानभूमी जवळ आली असतांना डाव्या बाजूच्या मोर्णेतून खळखळ करीत वाहून जाणारा पाण्याचा प्रवाह पाहिल्यानंतर “भाऊ! उन्हाळ्यात आम्ही पाण्याचे टँकर लावतो आणि पावसाळ्यात आमच्या नाकावर टिच्चून हे मोर्णेचे पाणी पुढे वाहून जाते. विधानपरिषदेत यासाठी काही करता येणार नाही काय?” असे डॅडी आपल्याला विचारत आहेत असे क्षणभर मला वाटले. क्षणात आपण डॅडींच्या अंत्ययात्रेत आहोत हे लक्षात आले. प्रेमादरयुक्त दरारा दुरुनसुद्धा दिसणे दुर्मिळ झाल्याच्या आजच्या काळात निकोप सार्वजनिक जीवनासाठी आवश्यक असणारा हा आरोग्यदायी दरारा डॅडींच्या निधनाने आमच्यातून निघून गेला आहे, हे आमच्या समाज जीवनाचे झालेले मोठेच नुकसान होय.

******

# 'डॅडीं'चे एकसष्टीत पदार्पण

*संघटनेचे ज्येष्ठ नेते, अकोल्याचे माजी नगराध्यक्ष व अकोल्याच्या श्री.शिवाजी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री.बी.एस.उपाख्य डॅडी देशमुख यांच्या लौकिक जीवनाच्या अंतिम प्रवासातील शेवटच्या दोन दिवसातील घटनाक्रमाचा आढावा नमूद असलेला प्रा.बी.टी.देशमुख यांचा लेख या अंकात दिलेला आहे. डॅडींच्या षष्ठ्यब्दिपूर्ती निमित्त सन १९९६ च्या नुटा बुलेटीनमध्ये त्यावेळी प्रसिद्ध झालेला लेख येथे पुनर्मुद्रित केलेला आहे.* - ***संपादक***

"प्राचार्य डॅडी देशमुख यांनी एकसष्टीत पदार्पण केल्याबद्दल त्यांचा षष्ठ्यब्दिपुर्ती सोहळा योजिला आहे. समारोहास सोबत दर्शविलेल्या मान्यवरांची उपस्थिती लाभत आहे. या आनंद सोहळ्यात आपण अगत्यपूर्वक सहभागी व्हावे अशी विनंती" करणाऱ्या अकोला नगराध्यक्षांच्या व समारोह समितीच्या सदस्यांनी दिलेल्या या निमंत्रणपत्रिकेमध्ये २३ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता होणाऱ्या या समारोहास उपस्थित रहाणाऱ्या मान्यवराच्या यादीत माझेही नाव होते व ते माझ्या पूर्वसंमतीनेच टाकण्यात आले होते पण मला त्या दिवशी उपस्थित रहाता आले नाही.

"अमरावती विद्यापीठाचे शिक्षक भवनाच्या वास्तूबाबत विद्यापीठ अधिनियमाचा भंग झाल्याचा शासनाचा आरोप" या विषयावरील लक्षवेधी सूचनेवर गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर १९९५ रोजी विधानपरिषदेत झालेल्या अनुपुरक चर्चेमध्ये "ही कायदेशीर बाब आहे म्हणून विधी व न्याय विभागाला दाखवून याबाबत लवकर निर्णय घेवू..... या सबंधी २२ तारखेनंतर १५ दिवसाच्या आत कायदेशीर बाबी पाहून निर्णय घेण्यात येईल" अशा प्रकारचे आश्वासन मा. राज्यमंत्रिमहोदयांनी दिले होते. १५ दिवस होवून गेले तरी याबाबत शासनाचा कोणताही निर्णय झाला नव्हता. उपरोक्त आश्वासनांच्या पूर्ततेबाबत शासनाने केलेल्या कारवाईची विवरणपत्रे दाखल झाली नव्हती. दिनांक ९ जानेवारीच्या बैठकीमध्ये विधान परिषदेच्या आश्वासन समितीने याबाबत उच्च व तंत्रशिक्षण तसेच विधी व न्याय विभागाच्या सचिवांची संयुक्त साक्ष घेण्याचे ठरविले होते व या उभय सचिवांची साक्ष आश्वासन समिती समोर २३ जानेवारीला दुपारी ३.३० वाजता ठेवण्यात आली होती. मी स्वतः या आश्वासन समितीचा सदस्य असल्याने ही बैठक टाळणे मला योग्य वाटत नव्हते.

एकाच दिवशी दोन कार्यक्रमांचा क्रम ज्यावेळी आमनेसामने उभा रहातो त्यावेळी परस्पर प्राथम्य क्रम ठरवून त्यातील "एक करावा, एक सोडावा" चा निर्णय सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला घ्यावा लागतच असतो. सोडाव्या लागलेल्या कार्यक्रमाबाबतची थोडीफार हुरहूर व खंत सुद्धा मनाला कमीजास्त प्रमाणात वाटतच असते. या समारोहाला उपस्थित रहाण्याचे मला सोडावे लागल्यामुळे मला वाटणारी खंत महत्तम होती हे नमूद करणे मला आवश्यक वाटते.

दोन तीन दिवसापूर्वी मी स्वतः डॅडींना ज्यावेळेला आश्वासन समितीसमोरील कामाची कल्पना देवून अकोल्याला अनुपस्थित रहाण्याची परवानगी मागितली तेव्हा अत्यंत उदारपणे त्यांनी मला ती दिली, इतकेच नव्हे तर "तेथे तुमची उपस्थिती आवश्यक आहे. ते काम महत्त्वाचे आहे" असे उलट मलाच सांगितले. केवळ त्यांनी हे मला सांगितले असे नव्हे तर त्यांनी आपल्या सहकाऱ्यांनासुद्धा त्या कामाची कल्पना दिली असे माझ्यानंतर लक्षात आले. दिनांक २२ जानेवारीला दुपारी विदर्भ एक्स्प्रेसने मुंबईला रवाना होण्याच्या दोन तासापूर्वी प्रा.विठ्ठल वाघ यांचा फोन आला "काहो मंग काय ठरल मुंबईच? इवून राह्यले का जावून राह्यले?" मी "जावून राह्यलो" असं सांगितल तर विठ्ठल वाघांनी मलाच उलट मुंबईच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या.

२३ तारखेला मुंबईचे काम आटोपून मी २४ तारखेला अमरावतीला परत आलो तर अकोल्याच्या या समारंभाचा जो अहवाल उपस्थित असलेल्या सहकारी मित्रांनी सांगितला व वृत्तपत्रातून वाचला, त्यामुळे आपण अनुपस्थित असण्याची खंत आणखीच वाढली. संघटनेच्या कामामधील डॅडींचा सहभाग लक्षात घेता संघटनेचा अध्यक्ष या नात्याने या समारोहाला आपल्याला उपस्थित रहाता आले नाही यामुळे मनाला खूपच अपराधी पणासारखे वाटले. नुटाच्या स्थापनेनंतर डॅडी हे अगदी पहिल्या वर्षापासून या कामात सहभागी होते असे त्यावेळचा रेकॉर्ड सांगतो. १७ मार्च १९६३ ला संघटनेची स्थापना झाल्यानंतर १९६३-६४ च्या कामकाजाचा पहिला वार्षिक अहवाल विचारात घेण्यासाठी रविवार, दिनांक २९ मार्च १९६४ रोजी "युनिव्हर्सिटी युनियन बिल्डिंग, नागपूर" येथे झालेल्या नुटाच्या आमसभेला जे ३१ सदस्य हजर होते त्यात डॅडींची (बी.एस.देशमुख) उपस्थिती आहे. त्यावेळी ते धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये अधिव्याख्याता म्हणून काम करीत होते.

डॅडींच्या विविधांगी जीवनामध्ये संघटनेचे काम हे एक अंग होते हे खरे आहे. पण संघटनेतील प्रत्येक मोक्याच्या व आणीबाणीच्या प्रसंगात डॅडी आघाडीवर होते. अनेक महिने पगार न होणाऱ्या चमत्कारिक समस्येने विदर्भातील उच्च शिक्षण क्षेत्र व्यापुन टाकले होते. नुटाने ५ सप्टेंबर १९७७ पासून बेमुदत संपाचा कार्यक्रम सुरू केला. अमरावती येथे नमुन्यातील कोल्हटकर मंगल कार्यालयामध्ये सत्तारूढ पक्षाचे एक शिबिर पुढील निवडणुकीच्या तयारीसाठी आयोजित करण्यात आले होते. नानासाहेब वैराळे हे प्रमुख अतिथी म्हणून या शिबिराला उपस्थित होते. ४००-५०० प्राध्यापकांची खूपच उग्र निदर्शने शिबिर बंद पडेपर्यंत सुरू होती. समोरच्या फळीमध्ये असलेल्या निदर्शकांमध्ये आमची काहींची ऊंची बरी होती तर रुंदी कमी होती काहींची रुंदी बरी होती तर ऊंची कमी होती. उंची व रुंदी या दोन्हीचा लाभ असलेले डॅडी त्या निदर्शकांमध्ये उठून दिसत होते. डॅडींचे पक्षीय विचार व नानासाहेब वैराळे यांच्याशी असलेला त्यांचा वैयक्तिक स्नेह यांच्या पार्श्वभूमीवर या निदर्शनातील त्यांच्या आक्रमक सहभागाने खूपच प्रभाव पाडला. "त्यांचे नक्की काय म्हणणे आहे ते मला माहीत नाही पण आपले काही तरी चुकत आहे" असा निरोप नानासाहेब वैराळे यांनी मुख्यमंत्र्यांना दिला. शासनाने चर्चेसाठी बोलाविले. १० सप्टेंबरला चर्चेसाठी नुटाच्या सहा सदस्यांचे जे शिष्टमंडळ मुंबईला गेले त्यात डॅडी होते. ब्लॉक ग्रँट, डेफिसिट ग्रँट इत्यादी बाबी फारशा कळत नसलेल्या आम्हा मंडळींना डॅडी देशमुख व प्राचार्य अण्णासाहेब वैद्य यांची त्यावेळी खूपच मदत झाली. सॅलरी स्कीम लागू झाली.

१९८७ मध्ये झालेल्या प्रदीर्घ संपानंतर जे मान्य केले ते अमलात आणण्यास शासनाने नकार दिला तेंव्हा १२ डिसेंबर १९८८ पासून पुन्हा एका प्रदीर्घ संपाला सुरुवात झाली. सुरू झालेले संप आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय १८ डिसेंबर १९८८ रोजी नागपूर येथे झालेल्या बैठकीत महाराष्ट्र प्राध्यापक संघाच्या कार्यकारी मंडळाने घेतला. राज्यात कोठेही "शिक्षणमंत्री उपस्थित रहाणार असतील त्या सर्व ठिकाणी निदर्शने" करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला. आंदोलन तीव्र करण्याच्या या निर्णयानंतर विदर्भात पहिला योग अकोल्यामध्ये आला. तत्कालीन शिक्षणमंत्री काही कार्यक्रमानिमित्त अकोल्यामध्ये आले. ३०० प्राध्यापकांना सोबत घेऊन निदर्शने करणाऱ्या डॅडींनी प्राध्यापकांसह सर्किट हाऊसचे फाटक अडविले. डॅडी त्यावेळी प्राचार्य होते, नगराध्यक्ष होते. जानेवारी १९८९ च्या सुरुवातीला शासनाशी मुंबईमध्ये चर्चा चालू असतांना अकोल्यातील व दरम्यान त्याचवेळी पुण्यात घडलेल्या या प्रकारानंतर एकदम वातावरण बदलले. कुठेतरी मिटल पाहिजे ही भावना निर्माण झाली. सुरुवातीला शासन बोलायलाच तयार नव्हते. बोलायला तयार झाले तर ऐकायलाच तयार नव्हते. ऐकायला तयार झाले तर समजून घ्यायलाच तयार नव्हते. आमचे युक्तिवाद वाया जात आहे हे आमच्या लक्षात येत होते. आमचे युक्तिवाद हे आता ऐकले जाऊ लागले, लक्षात येऊ लागले. युक्तिवादाची शक्ती ज्यावेळी प्रभावी ठरत नाही त्यावेळी शक्ती प्रदर्शन हाच प्रभावी युक्तिवाद असतो. (When argument ceases to be a strength, strength is the only argument) या राज्यशास्त्रातील प्रमेयाचा एवढा प्रत्ययकारी प्रत्यक्ष आविष्कार त्यापूर्वी मी कधीही पाहिला नव्हता.

संघटनेतील डॅडींच्या सर्व कामाचा आढावा घेण्यासाठी हे दोन शब्द लिहिलेले नाहीत. संघटनेच्या बाहेरील त्यांच्या कामाचा आवाका तर स्वतंत्र लिखाणाचा विषय आहे. स्वतःचे घर बांधतांना सुध्दा डॅडींनी आपला सारा ग्रुप बरोबर घेतला. आंतरराष्ट्रीय पारितोषकास पात्र ठरलेला "देवकी नंदन गोपाला" घडवितांना आपल्या अनेक सहकाऱ्यांना त्यांनी चंदेरी पडद्यावर आणले. म्हणून कळणावत म्हणतात तेच खरे आहे. "त्याचा एकट्याचा फोटो काढू म्हटल तरी ग्रुप फोटोच कां निघतो?" या प्रश्नाचे उत्तर सर्वांना घेवून चालण्याचा त्यांच्या या कलेत आहे.

२६.०१.१९९६ - *प्रा.बी.टी.देशमुख, अध्यक्ष ''नुटा''*

# समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांनी ५० टक्के महागाई भत्ता वेतनात समाविष्ट करुन अदा केलेल्या रकमेची रिकव्हरी काढण्याचे आदेश निर्गमित करणे

*दुसरे अधिवेशन, २००५ : महाराष्ट्र विधानपरिषद*
*गुरुवार, दिनांक २१ जुलै, २००५*

**श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री.जी.एल.अैनापूरे,** वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना :-

**श्री.व्ही.यु.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) :** सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक १९ जुलै २००४ च्या एकाच शासननिर्णयान्वये राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करण्याचे शासन आदेश निर्गमित होणे, त्यानुसार विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना या शासन आदेशानुसार गेले ११-१२ महिने वेतन अदा होणे, मात्र समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी त्यांच्या ६ जून २००५ च्या पत्रान्वये अशा रीतीने अदा केलेल्या रकमेची रिकव्हरी काढण्याचे आदेश निर्गमित करणे, **"पेन्शन योजना लागू नसल्याने त्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ट करू नये"** अशी शासन निर्णयात नसलेली भूमिका विभागीय समाजकल्याण अधिकारी यांनी घेणे व ती फक्त नागपूर विभागालाच लागू करणे, नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) उपाध्यक्षांनी दिनांक ४ जून २००५ रोजी किंवा त्यादरम्यान मा. मंत्री सामाजिक न्याय यांचेकडे (विभागीय समाजकल्याण अधिकारी नागपूर यांचेमार्फत) निवेदन सादर करुन सुद्धा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया"

**श्री. धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) :** सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

सामाजिक न्याय विभागांतर्गत सद्यःस्थितीत एकूण ५२ समाजकार्य महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयांमधून बी.एस.डब्ल्यु. व एम.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रम शिकविण्यात येतो. यापैकी ४५ समाजकार्य महाविद्यालये अनुदान तत्त्वावर आहेत. उर्वरित ७ समाजकार्य महाविद्यालयापैकी १ महाविद्यालय बंद आहे. (प्रकरण न्यायप्रविष्ट), ६ महाविद्यालये "ड" वर्गामध्ये असल्याने मान्यता रद्दचे आदेश काढण्यात आले आहेत (प्रकरण न्यायप्रविष्ट) सदर समाजकार्य महाविद्यालयांना मान्यता व अनुदान देण्याबाबत सुधारित नियम शासन निर्णय, क्र. सीएसडब्ल्यु-१०९८/प्र.क्र. २८६/ सुधार-१, दि. २.२.१९९९ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार विना अनुदान तत्त्वावर मान्यता दिल्यापासून तीन वर्षापर्यंत शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान दिले जात नाही. तीन वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर शाळा/संस्थेचे मागील तीन वर्षाचे कामकाज समाधानकारक असल्याबाबत निरीक्षण अहवाल विद्यापीठ/ जिल्हा समाजकल्याण अधिकारी/ विभागीय समाजकल्याण अधिकारी/ संचालक, समाजकल्याण यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर खर्चाचा भार विचारात घेऊन अनुदान तत्त्वावर मान्यता देण्याबाबत निर्णय घेण्यात येतो. सद्यःस्थितीत अनुदानाचे अनुदान सूत्र खालीलप्रमाणे आहे:-

१) शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर १०० टक्के अनुदान

२) इमारत भाड्यापोटी ५० टक्के अनुदान

३) आस्थापना खर्चाकरिता मागील वर्षाच्या खर्चाच्या ८ टक्के अनुदान

शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांसाठी पाचवा वेतन आयोग लागू केल्यानंतर दि. २९ मार्च २००१ च्या शासन निर्णयान्वये समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षकांना तसेच दि. ४ ऑगस्ट २००१ च्या शासन निर्णयान्वये शिक्षकेतर

## महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विलंबाने होत असलेले वेतन

*दुसरे अधिवेशन, २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*
*शुक्रवार, दिनांक १५ जुलै, २००५*

(८८) * ५९५७ **श्री. नानासाहेब बोरस्ते, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) ५० टक्के महागाई भत्ता मुळ वेतनात विलीन करणे, थकित महागाई भत्त्याची रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करणे, वाढीव महागाई भत्ता लागू करुन विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापकांचे दिनांक २१ सप्टेंबर, १९७७ च्या शासन निर्णयाधीन वेतन योजनेप्रमाणे वेतन नियमित होण्याची सद्य:स्थिती काय आहे,

(२) सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे आठमाही वेतन अनुदान वित्त विभागाने उपलब्ध करुन न दिल्यामुळे वेतन वितरण व्यवस्था राबविण्यात अडचणी निर्माण होत आहे असे मा. संचालक उच्च शिक्षण यांनी दिनांक २० मे, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान शासनास कळविले हे खरे आहे काय,

(३) खरे असल्यास, वित्त विभागाकडून याबाबत वारंवार अडथळे येवू नयेत म्हणून काय उपाययोजना करण्यात आलेली आहे,

(४) उपाययोजना करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करणे, थकित महागाई भत्त्याची रक्कम भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करणे, वाढीव महागाई भत्ता लागू करणे, यासाठी रु.८५.६६ कोटीची तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली असून मे, २००५ पासून सुधारित दराने वेतन अदा करण्यात येत आहे.

(२) नाही.

(३) व (४) सन २००५-२००६ या वर्षाचा अर्थसंकल्प मंजूर झाला आहे. तसेच अशासकीय महाविद्यालयांचे वेतन नियमित स्वरुपात करण्यासाठी विभागीय सहसंचालकांना वेळेत तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

******

## UNIVERSITY GRANTS COMMISSION

BAHADUR SHAH ZAFAR MARG : NEW DELHI-110 002

No. F-2-8/99 (PS)Dated July, 2005

To,

The Registrar, All Universities

The Education Secretaries

All State Governments & Union Territories

The Officer Incharge, All Regional Offices of UGC

Sir/Madam

I am directed to inform you that on receipt of various representations, the issue of extension of the date beyond 31.12.2004 for participation in orientation / refresher courses in respect of eligible teachers for the purpose of promotion / placement under Career Advancement Scheme was considered by the Commission at its meeting held on 29.6.2005. The Commission resolved as under :-

"The Commission considered and approved the extension of the date beyond 31.12.2004 upto 31.12.2005 for participation in Orientation / Refresher Courses in respect of eligible teachers for the purpose of promotion / placement under Career Advancement Scheme."

This is for your information and necessary action.

The above decision may also be brought to the notice of Colleges affiliated to your University Urgently.

Yours faithfully,
(Mrs. Shashi Munjal)
Under Secretary : Ph. :23238872

कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली आहे. **याच अनुषंगाने वित्त विभागाने त्यांच्या दि. १९ जुलै २००४ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचारी यांना महागाई भत्त्यातील मूळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई मूळ वेतनामध्ये विलीन करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.** समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केला असल्याने हे आदेश मा. समाजकार्य महाविद्यालयांनाही लागू आहेत. तथापि, विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांनी विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर यांना दि. ६.६.२००५ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, सामाजिक न्याय विभागातून अनुदान घेणाऱ्या मान्यताप्राप्त समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती लाभ (पेन्शन) शासनाने लागू केली नसल्याने त्यांचे मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ट करण्यात येऊ नये. जर उपरोक्त समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता (तो ज्या महिन्यापासून) मूळ वेतनात समाविष्ट करता येत नसल्याने याबाबत अदा केलेल्या रकमांची त्वरित वसूली करण्यात यावी. या अनुषंगाने नागपूर युनिर्व्हसिटी टिचर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा. अनिल ढगे यांनी विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांचे आदेश हे शासनाच्या दि. १९.७.२००४ च्या मूळ शासन निर्णयाशी संपूर्णपणे विसंगत असल्यामुळे मागे घेण्याची विनंती केली होती. त्याचप्रमाणे संघटनेने जुलै २००५ च्या दुसऱ्या आठवड्यात संचालनालयाशी यासंबंधात संपर्क साधला होता. **प्रस्तुत प्रकरणी शासनाने संचालक, समाजकल्याण यांना दि. ५.७.२००५ च्या पत्रान्वये "वित्त विभागाचा शासन निर्णय, क्र. मयावा-११०४/प्र.क्र. ५/सेवा-९, दिनांक १९.७.२००४ नुसार समाजकल्याण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यातील मूळ वेतनाच्या ५० टक्के एवढा महागाई भत्ता मूळ वेतनामध्ये वितरित करण्यास अनुज्ञेय आहे" अशा स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत** व त्यानुसार संचालक, समाजकल्याण यांनी विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांना दिलेले दि. ६.६.२००५ चे आदेश रद्दबादल करुन ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करुन अदा करण्याबाबत व कुठल्याही रकमेची वसुली न करण्याबाबत कळविलेले आहे. विभागीय समाजकल्याण अधिकारी, नागपूर यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व समाजकल्याण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा ५० टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात समाविष्ट करुन देयके कोषागारात सादर केलेली आहेत तसेच पूर्वी मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ट केलेला असल्यास कोणतीही वसुली करण्यात आलेली नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात शासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करण्यात आली असून शासन स्तरावर कोणतीही कार्यवाही प्रलंबीत नाही.

**श्री. व्ही.यु.डायगव्हाणे :** सभापती महोदय, हा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा प्रश्न आहे. खरे म्हणजे मी माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो. हे आभार मानण्याबरोबरच या अधिकाऱ्यांच्याबद्दल तुमच्या काय भावना असायला पाहिजेत? त्यांना जरा लाथाडा. १९ जुलै २००४ ला राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांसाठी डीपी योजना लागू केली. ती लागू केल्यानंतर नागपूर विभागाच्या समाजकल्याण अधिकाऱ्यांनी अदा केलेल्या रकमेची रिकव्हरी करण्याचे आदेश काढले. खरे म्हणजे हे समाजकल्याण अधिकारी समाजाचे कल्याण न करता वैयक्तिक लाभ घेणारे झालेले आहेत. या विभागाचे नाव बदलून टाकले पाहिजे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या समाजकल्याण अधिकाऱ्याने असा निर्णय घेतला की, या कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू नाही म्हणून ही डीपी योजना लागू करता येत नाही. समाजकल्याण अधिकारी शासनाचे जी.आर. वाचत नाहीत. पहात नाहीत. १९ जुलै, २००४ रोजी शासनाने सर्व शासकीय कर्मचाऱ्यांसाठी जी.आर. काढला. त्यामध्ये सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा कुठेही उल्लेख नाही हा जी.आर. सर्वांना लागू आहे. परंतु समाजकल्याण अधिकाऱ्यांनी ज्यांना महागाई भत्ता दिला असेल त्यांच्याकडून तो वसूल करा. ज्या कर्मचाऱ्यांना दिला नसेल त्यांना हा भत्ता देऊ नका. अधिकाऱ्याने फतवा काढला आणि विभागातील सर्व अधिकाऱ्यांना तो पाठवून दिला. समाजकल्याण अधिकारी हे वसुली अधिकारी झालेले आहेत. समाजकल्याण अधिकारी म्हणून राहिलेले नाहीत. ६ जून रोजी निर्णय घेतला होता त्यास आपण स्थगिती दिलेली आहे. म्हणजे आपण ही गोष्ट मान्य केलेली आहे. माझे असे म्हणणे आहे की, या समाजकल्याण अधिकाऱ्यांना विनाकारण पोसू नका. या समाजकल्याण अधिकाऱ्यावर काही तरी कारवाई होणे आवश्यक आहे. या अधिकाऱ्याची डिपार्टमेंटच्या माध्यमातून किंवा सी.आय.डी. मार्फत चौकशी करा. या समाजकल्याण अधिकाऱ्याने बरीच संपत्ती जमविली आहे. सदर समाजकल्याण अधिकाऱ्यांनी हा निर्णय का रद्द केला याबाबतीत समाजकल्याण अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी किंवा सी.आय.डी. मार्फत चौकशी केली जाईल काय व ही कारवाई किती दिवसात पूर्ण केली जाईल?

**श्री. धर्मरावबाब आत्राम :** सभापती महोदय, या ठिकाणी काही भ्रष्टाचार झाला असेल तर त्या अनुषंगाने सखोल चौकशी करण्यात येईल. **परंतु आज त्या अधिकाऱ्यांची बदली करण्यात आलेली आहे.** सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचने प्रमाणे संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल.

**श्री. व्ही.यु.डायगव्हाणे :** सभापती महोदय, सदर अधिकाऱ्याच्या बदलीने हा प्रश्न सुटणार नाही. बदली ही काही शिक्षा होऊ शकत नाही. त्या अधिकाऱ्याने जे कृत्य केले त्याबाबतीत त्याला काही तरी शिक्षा द्या. आपण या अधिकाऱ्याची विभागीय चौकशी करणार की सी.आय.डी. मार्फत चौकशी करणार व ही चौकशी कधी पर्यंत पूर्ण केली जाईल याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** सभापती महोदय, संबंधित अधिकाऱ्याची डिपार्टमेंट इन्कायरी करू आणि एक महिन्याच्या आत कारवाई करू.

**श्री. नितीन गडकरी :** सभापती महोदय, प्रस्तुत प्रकरणामध्ये दिनांक ६ जून २००५ च्या पत्रान्वये अशा रीतीने अदा केलेली रक्कम होती ती रिकव्हरी करण्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. पेन्शन योजना लागू नसल्याने त्यांच्या मूळ वेतनात ५० टक्के महागाई भत्ता समाविष्ट करू नये अशी शासन निर्णयात नसलेली स्वतःच्या मतानी विक्षिप्तपणाची भूमिका समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्याने घेतलेली आहे. आणि ती भूमिका नागपूर विभागासाठीच लागू केलेली आहे. नागपूर विभागाकरिता सरकारच्या बाहेर जाऊन स्वतःच्या मर्जीने सरकारचे नियम असताना देखील अशा प्रकारे अधिकारी वागले आहेत हे खरे आहे काय? अशा प्रकारे अधिकारी वागले असतील तर त्यांची केवळ बदली करुन उपयोग नाही. त्यांनी गैरकारभार केलेला आहे हे सिद्ध झालेले आहे. चार गोष्टींचे इव्हीडन्सेस काढावे लागतात त्यावेळी चौकशी केली जात असते. या ठिकाणी अधिकारी अशा पद्धतीने वागले आहे हे सिद्ध झालेले आहे. जर ही बाब सिद्ध झालेली असेल तर अशा अधिकाऱ्यांना सर्व्हीसमध्ये ठेवणे बरोबर नाही. अशा प्रकारे वागणाऱ्या अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई केली पाहिजे. ती कारवाई आपण करणार आहात काय?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** संबंधित अधिकाऱ्याची सगळी माहिती विभागाकडे उपलब्ध आहे या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध डिपार्टमेंट इन्कायरी करू आणि त्या अनुषंगाने पुढे कारवाई करू.

******

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै २००५ पासून महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत*

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

***शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : मभवा ११०४/प्र.क्र. १२/सेवा-९***
***मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ : दिनांक १४ जुलै २००५***

पहा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक मभवा ११०४/प्र.क्र.१२/सेवा-९. दिनांक २४ मार्च २००५

### शासन निर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व महागाई भत्ता अनुज्ञेय असणाऱ्या इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता मंजूर करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक **१ जुलै २००५** पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनाच्या १७ टक्के दराने महागाई भत्ता वाढ **मंजूर करण्यात यावी.**

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे तशाच यापुढेही लागू राहतील.

४. शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्यामुळे येणारा खर्च, हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची घालण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(मीना जोशी)**
शासनाच्या उपसचिव

*****

# वरिष्ठ श्रेणीसाठी अर्हताकारी सेवा मोजतांना व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षकांना भेदभावपूर्ण वागणूक

*दुसरे अधिवेशन, २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*
*शुक्रवार, दिनांक १५ जुलै, २००५*

(७) * ५५८७ **श्री. रामदास तडस , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, प्रा.बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे तारांकित प्रश्न क्रमांक २५४० ला दिनांक २४ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) व्यावसायिक अभ्यासक्रमाकडील अधिक दोन स्तरावरील शिक्षक-निदेशकांना शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकांप्रमाणे नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी मंजुर करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाला आहे काय,

(२) असल्यास, केव्हा, व आदेशाचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील :** (१),(२) व (३) नेमणुकीच्या दिनांकापासून बारा वर्षाची अर्हता प्राप्त सेवा पूर्ण केल्यानंतर वरिष्ठ श्रेणी मंजूर करण्याबाबतचा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि सेवा योजन विभाग क्र.पीटीएस-२२९२/६५६३९/(२३६५)/व्यशि-४, दिनांक २५ मार्च, १९९४ व याबाबतचे शासन सम क्रमांकित दिनांक २२ डिसेंबर, १९९४ चे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक टीएसए-१०९९/(१८८०)/ व्यशि-२, दिनांक १ जानेवारी, २००० च्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** सभापती महोदय, हा प्रश्न या सभागृहात दोन ते तीन वेळा आलेला आहे. शालेय शिक्षण विभागाने कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना नियुक्तीच्या दिनांकापासून १२ वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केली आहे. एमसीव्हीसी आणि बायोफोकलमधील निदेशक आणि शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षकांप्रमाणे नेमणूकीच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी मंजूर करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला नाही. याबाबत दि. २४.०३.२००५ रोजी मा. सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी असा प्रश्न विचारला होता की, "दिनांक १२ डिसेंबर १९९४ च्या शुध्दीपत्रकाप्रमाणे जी दुरुस्ती केली, ती दिनांक १.१.२००० मध्ये केली नाही हे खरे आहे काय?" या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी 'होय' असे उत्तर दिले आहे. त्यानंतर पुन्हा माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी असा प्रश्न विचारला होता की, "येत्या ८ दिवसामध्ये, १०-१५ दिवसामध्ये यासंबंधीचा आदेश निघणार आहे काय?" असा प्रश्न विचारला होता. त्याला माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, "अधिवेशन संपल्यानंतर इमिजिएट हे आम्ही करु." माननीय मंत्रिमहोदयांनी हे उत्तर २४ मार्च २००५ रोजी दिले आहे. आता सातवा महिना उजाडला आहे. आता नऊ महिन्यापर्यन्त आपण थांबणार आहात काय ? माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी त्यावेळी पुन्हा असा प्रश्न विचारला होता की, "अधिवेशन संपल्यानंतर ८ दिवसात, १० दिवसात, १५ दिवसामध्ये दुरुस्ती करणारा शासन निर्णय निघेल काय?" या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले आहे की, "७ दिवसामध्ये आम्ही करु." एमसीव्हीसी आणि बायोफोकलमधील शिक्षक आणि निदेशकांचा हा प्रश्न आहे. अधिवेशन संपल्यानंतर सात दिवसामध्ये या बाबतची कार्यवाही पूर्ण होणार होती. आता तरी हे अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतची कार्यवाही पूर्ण होईल काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, आम्ही सुरुवातीलाच ही बाब मान्य केली आहे. ही बाब आम्ही करणार आहोत. परंतु हे काम पूर्ण करण्यासाठी कमीत कमी तीन महिने लागतील.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** सभापती महोदय, हा सभागृहाचा अवमान आहे. हे काम करण्यासाठी तीन महिन्याचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, कमीत कमी तीन महिने लागतील असे मी सांगितले आहे. तीन महिन्याच्या आत हे काम करणार आहोत.

**श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :** यापूर्वी टाईमबाऊंड आश्वासन माननीय मंत्रिमहोदयांनी दिले असतानाही आता तीन महिन्यांचा कालावधी का लागत आहे ? सभापती महोदय.....

**श्री. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, मला या ठिकाणी एक गोष्ट सदनाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे. चुका सुध्दा रिपीट करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय ? चवथ्या वेतन आयोगाच्या वेळी शालेय शिक्षण विभागाने जी चूक केली होती, ती आता या विभागाने केली आहे. चवथ्या वेतन आयोगाच्या वेळी शालेय शिक्षण विभागाने प्रशिक्षणापासून सेवा धरली होती. ती नेमणूकीपासून धरायला पाहिजे होती. त्यानंतर शालेय शिक्षण विभागाने आपली चूक दुरुस्त केली आहे. आता शालेय शिक्षण विभागाने जी चूक केली नाही, ती तंत्रशिक्षण विभागाने केली आहे. सभापती महोदय, २२ डिसेंबर १९९४ रोजी शुध्दिपत्रक काढण्यात आले तसेच शुध्दिपत्रक काढण्यामध्ये आपल्याला अडचण काय आहे? आणि नेमके काय विचाराधीन आहे? २२ डिसेंबर १९९४ ला जे शुध्दिपत्रक चौथ्या वेतन आयोगात काढण्यात आले, ते आता पाचव्या आयोगाच्या वेतनश्रेणीत शुध्दिपत्रक काढण्यात काय अडचण आहे? माझे असे म्हणणे आहे की, हे विचाराधीन आहे असे म्हणण्यापेक्षा सुरुवातीपासून धरायचे की, प्रशिक्षणापासून धरायचे एवढाच प्रश्न आहे. सभापती महोदय, हळू हळू ही एक फॅशन व्हायला लागली आहे. या ठिकाणी फक्त दुरुस्ती करावयाची आहे. ती करण्यामध्ये आपल्याला निश्चित अडचण अशी काय आहे? आणि ती अडचण येणार नसेल तर आपण एक महिन्यात करणार काय?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, हे दोन हजार शिक्षक आहेत आणि ९५८ संस्था आहेत. त्यांच्याकडून सर्व माहिती घ्यावी लागेल व ती तपासावी लागेल, त्यासाठी वेळ लागेल. त्यामुळे कमीत कमी आणि जास्तीत जास्त तीन महिन्यामध्ये आम्ही ही प्रोसेस पूर्ण करु.

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, मंत्रिमहोदय दुर्दैवाने या ठिकाणी चुकीची माहिती देत आहेत. इथे माणसे मोजायचा प्रश्न नाही. माणसे मोजण्याचा प्रश्न ॲरिअर्स देतांना आणि पे फिक्सेशन करतांना येतो. नेमणुकीपासून धरायचे की प्रशिक्षणापासून धरायचे याचा मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाला आहे. इथे धोरणाचा प्रश्न आहे. तुम्ही चौथ्याच्या वेळेला क्लॅरिफिकेशन काढले..

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, फक्त इंम्प्लिमेंटेशन करण्याचा प्रश्न आहे. त्यासाठी आम्ही तीन महिन्यांचा कालावधी मागत आहोत.

**प्रा. बी. टी. देशमुख :** तसे असेल तर बरोबर आहे. आम्ही आपल्याला इंम्प्लिमेंटेशन करण्यासाठी तीन महिन्यांचा वेळ देतो. परंतु क्लॅरिफिकेशन आपण किती महिन्यात काढणार? क्लॅरिफिकेशन एक महिन्यात निघेल काय?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, होय.

******

नोट : या विषयावर तारांकित प्रश्न क्रमांक २५४० वर गुरुवार, दिनांक २४ मार्च २००५ रोजी झालेली तपशिलवार अनुपूरक चर्चा सन २००५ च्या 'नुटा बुलेटीन'मध्ये पृष्ठ ४३ वर यापूर्वीच प्रसिद्ध केलेली आहे. - **संपादक**

# वरिष्ठ श्रेणीतून निवडश्रेणीत स्थाननिश्चिती देतांना शासन निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण संचालकांनी काढलेले परिपत्रक

*दुसरे अधिवेशन, २००५ : : महाराष्ट्र विधानपरिषद*
*शुक्रवार, दिनांक १५ जुलै, २००५*

